# मिरा भाईंदर महानगरपालिका

## स्थायी समिती सभा दि. १५/०६/२००६

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा गुरुवार दिनांक १५/०६/२००६ रोजी सभा सुचना क्र. ०४ दि. ०९/०६/२००६ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

### उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे | सभापती |
| २) | श्री. मोहन मधुकर पाटील | सदस्य |
| ३) | श्री. जयंत महादेव पाटील | सदस्य |
| ४) | श्री. मिलन गोविंदराव पाटील | सदस्य |
| ५) | श्री. केशव रामभाऊ घरत | सदस्य |
| ६) | श्री. प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| ७) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| ८) | श्रीम. प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |
| ९) | श्रीम. जानी कैलाशबेन दिनेशचंद्र | सदस्या |
| १०) | श्रीम. ग्रिटा स्टीफन फॅरो | सदस्या |
| ११) | श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस | सदस्या |
| १२) | श्री. रमेश धरमचंद्र जैन | सदस्य |
| १३) | श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | सदस्य |
| १४) | श्री. शफिक अहमद खान | सदस्य |
| १५) | श्री. रतन कृष्णा पाटील | सदस्य |

### गैरहजर सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. सुर्यकांत अनंतराव भोईर | सदस्य |

**मा. सभापती :-**

आजच्या सभेला उपस्थित असलेले सर्व सन्मा. सदस्य, सन्मा. सदस्या, मनपा अधिकारी वर्ग आणि मनपा कर्मचारी वर्ग यांचे मी हार्दिक स्वागत करतो आणि सभा सुरु करावी अशी मी सचिवांना सुचना करतो.

(नगरसचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आम्ही अतिक्रमण विभाग वगैरे सर्व संबंधित विभागाच्या अधिका-यांना बोलवायला सांगितलेले होते. ते अधिकारी कुठे आहेत?

**प्रेमनाथ पाटील :-**

तुम्ही त्या अधिका-यांना उपस्थित रहायला सांगा. आम्हाला त्या अधिका-यांना प्रश्न विचारायचे आहेत.

**एस. ए. खान :-**

अतिक्रमण विभागाच्या अधिका-यांना बोलवा.

**प्रेमनाथ पाटील :-**

आरोग्य विभागाच्या अधिका-यांना बोलवा. माझ्या प्रभागातील शिवशक्ती कॉम्प्लेक्समधील एका मुलाला डेंग्युची लागण झालेली आहे. तुम्ही याबाबत तपासणी करण्यासाठी डॉक्टरांना बोलवा. अजुनपर्यंत जास्त पाऊस पडलेला नाही. ३० तारिख की ३१ तारखेला थोडा पाऊस पडलेला होता. माझ्याकडे डॉक्टरांचा रिपोर्ट आहे.

**मिलन पाटील :-**

मा. उपायुक्त साहेब, आम्ही तुम्हाला प्रत्येक वेळेला सांगतो की संबंधित सर्व अधिका-यांना बोलवा, ही स्थायी समिती आहे. या समितीमध्ये तुमचा अधिकार चालला पाहिजे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

जोपर्यंत अधिकारी येत नाहीत, तोपर्यंत मिटींग तहकुब ठेवा.

**मिलन पाटील :-**

अधिकारी तुमच्या सुचनेचे पालन करित नाहीत. मग कसे होणार?

**नगरसचिव :-**

ज्या अधिका-यांचे विषय असतील त्याच अधिका-यांनी सभेला उपस्थित रहावे अशा मा. आयुक्त साहेबांनी सुचना दिलेल्या होत्या.

**प्रेमनाथ पाटील :-**

जर आयत्यावेळी विषय आला तर तुम्ही काय करणार?

**एस. ए. खान :-**

ज्या अधिका-यांचा विषय असेल त्याच अधिका-याने उपस्थित रहावे असे बंधन नसते.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

आरोग्य विभाग आणि अतिक्रमण विभागाच्या अधिका-यांना बोलवायला पाठविलेले आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

प्रथम आरोग्य विभागाच्या अधिका-यांना यायला सांगा

**जयंत पाटील :-**

प्रथम आरोग्याचा विषय घ्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

अतिक्रमण विभागाचे इन्चार्ज कोण आहेत?

**संजय तायशेट्ये :-**

मी अतिक्रमण विभागाचा इन्चार्ज आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

श्री. संजय तायशेट्ट्ये, शहरामध्ये मोठ्या संख्येने अतिक्रमण वाढलेले आहे. तुमचा अतिक्रमणवर अजिबात कंट्रोल नाही. जेव्हापासून तुम्ही अतिक्रमण विभागाचा चार्ज घेतला तेव्हापासून अतिक्रमण मोठ्या प्रमाणात वाढलेले आहे असा आमचा तुमच्यावर आरोप आहे.

**संजय तायशेट्ये :-**

अतिक्रमणची चालू असलेली कामे मी येण्या पूर्वीपासून चालू आहेत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मग तुमचे काय काम आहे?

**संजय तायशेट्ये :-**

आम्ही त्याच्यावर कार्यवाही केलेली आहे. काही बाबी न्यायप्रविष्ठ असल्यामुळे आम्ही हस्तक्षेप करु शकत नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपली बांधकाम विभागातर्फे बांधली जाणारी बाब न्यायप्रविष्ठ असेल. परंतु, तुम्ही जे २४-२४ फुटाचे गाळे बांधलेले आहेत. त्याच्यावर तुमचा काय कंट्रोल आहे?

**गजानन भोईर :-**

तुम्ही हे गाळे बांधतात. त्याबाबत ठराव केलेला होता. तो ठराव अजुनपर्यंत यांच्याकडे पोहोचलेला नाही असे मला वाटते. कारण कोणाकडून रु. ५०००/- घेतात तर कोणाकडून रु. १०००/- घेतात. जर त्या गाळ्याचे नुकसान झाले असेल तर रु. १०,०००/- प्रति गाळा आणि गावठणमध्ये गाळा असेल तर रु. ५०००/- प्रति गाळा असा ठराव केलेला होता. तुमच्याकडे तो ठराव आलेला आहे का?

**संजय तायशेट्ये :-**

आमच्याकडे तो ठराव आलेला नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

आम्ही सन २००४-०५ च्या बजेटमध्ये हा ठराव मांडलेला होता आणि त्या ठरावाबाबत अंदाजपत्रकामध्ये अमाऊन्ट निश्चित केलेली होती.

**गजानन भोईर :-**

एका गाळेधारकावर रु. १०,०००/- ची पावती फाडली जात नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

एका गाळेधारकाला रु. १०,०००/- लावायचे आणि तो गाळा गावठणमध्ये असेल तर रु. ५०००/- लावायचे अशी अमाऊन्ट ठरलेली होती. अजुनपर्यंत त्याचा ठराव का आला नाही? तुम्ही बजेट फुगवायचे काम केलेले आहे का?

**केशव घरत :-**

या ठरावाची अंमलबजावणी झालेली नाही आणि आमच्याकडे ठराव आलेला नाही असे हे अधिकारी सांगतात. हा काय प्रकार आहे?

**प्रेमनाथ पाटील :-**

सन्मा. सदस्य केशव घरत सांगतात ते बरोबर आहे.

**मिलन पाटील :-**

आपली ही प्रशासकीय आणि उत्पन्नाची बाब आहे. मग तुम्ही ठराव का घेतला नाही? ते श्री. नाकाडी साहेबांना विचारा. जे आपले गाळ्याचे रु. १०,०००/- ठरलेले होते. ती एक उत्पन्नाची बाब आहे. तुम्ही उत्पन्नाच्या बाबीचा ठराव गेलेला नाही असे बोलतात.

**गजानन भोईर :-**

तुम्ही कोणाकडून रु. ५०००/- घेतात आणि कोणाकडून रु. १०००/- घेतात.

**प्रेमनाथ पाटील :-**

परंतु, ही अमाऊन्ट ऑफिशियल घेतात ना.

**गजानन भोईर :-**

ती लोक त्याची पावती फाडून देतात.

**मिलन पाटील :-**

आपण बजेटमध्ये तरतुद करुन आपल्याला एवढ्या एवढ्या लाख-करोड रुपयाचे उत्पन्न होईल असे आपण निश्चित केलेले होते. या ठरावाला आता सहा महिने होऊन गेलेले आहेत. आपण बजेट बनवून सहा महिने होऊन गेलेले आहेत. परंतु, जर ठराव केला असेल तर आम्ही तुम्हाला विचारणार काय? तुम्ही रिव्हिजन करुन आमच्यासमोर कधी ठेवणार आहात? आता जुन महिना येऊन गेलेला आहे. अजुनपर्यंत ठराव रिव्हिजनला आलेला नाही. कायद्याप्रमाणे तीन महिन्यानंतर रिव्हीजन घेणे आवश्यक आहे. परंतु, तुमचा ठराव एकदासुध्दा रिव्हिजनला आलेला नाही. आम्ही याचा काय अर्थ समजणार? वर्षभर हे बजेट असेच करायचे का? आम्हाला ही म्युनिसिपाल्टी चाललेली आहे की नाही हे माहिती नाही. ही म्युनिसिपाल्टी तोट्यामध्ये आहे की कर्जात आहे ते माहिती नाही. म्युनिसिपाल्टीने प्रशासनाला कर्ज केलेले आहे. आपण त्या कर्जातच रहायचे का? वसुली होत नाही. आम्ही आता ऐकलेले आहे की आपल्याला पाण्याचे रु. ४ कोटी भरायचे आहेत. रु. ४ कोटी हे कोणाचे इन्कम आहे हे आपल्याला माहिती नाही. कोणाच्या टॅक्सचा पत्ता नाही. इकडे कुठलेही अधिकारी येत नाहीत. हे काय चाललेले आहे? मा. सभापती साहेब, तुम्ही याच्यावर खंबिर भुमिका घ्या. तुम्ही खंडोबाची भुमिका घेऊ नका. तुम्ही अधिका-यांवर कलम ५६ खाली कार्यवाही करा. तुमचे हात धजत नाहीत का? सहा महिने रिव्हिजन होण्यासाठी पिरियड असतानासुध्दा अजुनपर्यंत रिव्हिजन होत नाही. इकडे रिव्हिजन येत नाही. नागरिकांवर म्युनिसिपाल्टीचा करोडो रुपयांचा बोजा आहे. आता रु. ४ कोटी भरणा आलेला आहे. अजुन त्याच्यावर कार्यवाही होत नाही. रु. १ कोटी इन्कम असल्याचे अधिकारी बोलतात. अधिकारी रु. ४ कोटी कुठून आणणार? तुम्ही शहराच्या विकासाचे काम कसे करणार? आणि लोकांना पगार कसा देणार? तुम्ही सांगता सहा महिने झाले तरी कार्यवाही होत नाही. परंतु, तीन महिन्याचा कालावधी देऊनसुध्दा तुम्ही तीन महिन्यात रिव्हिजन केलेली नाही. आज दीड करोडचे नुकसान झालेले आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

सन्मा. सदस्य मिलन पाटील, प्रथम अतिक्रमण विभागाचा विषय घ्या आणि पाण्याचा विषय नंतर घ्या. कारण विषय डायव्हर्ट होतो.

**मिलन पाटील :-**

तुम्ही प्रथम रिव्हीजनचा विषय घ्यायला पाहिजे की नाही ते सांगा? जर रिव्हीजनचे काम तीन महिन्यात झाले असते तर आपण हा विषय पुन्हा - पुन्हा आणला नसता.

**प्रेमनाथ पाटील :-**

एक विषय पूर्ण झाल्यानंतर दुसरा विषय घ्या.

**मिलन पाटील :-**

जर तीन महिन्यात रिव्हिजन आली असती तर प्रश्न आला नसता.

**केशव घरत :-**

मी घोडबंदरबाबत श्री. भोये यांना विषय दिलेला होता. श्री. भोये कुठे आहेत? त्यांनी महानगरपालिकेचे नुकसान केलेले होते. त्यांनी संपूर्ण महापालिकेचे कंपाउन्ड वॉल तोडलेला होता. तुम्हाला त्यांन निलंबित करायला सांगितलेले होते. परंतु, ते आता परत आलेले आहेत. तेथील लोकांची या वॉल बाबत तक्रार आहे. घोडबंदरच्या नागरिकांनी अर्ज केलेला आहे. परंतु, आता श्री. भोये निघून गेलेले आहेत. या गोष्टीला तीन-चार महिने झालेले आहेत. मी तुम्हालाही सांगितलेले होते. तुम्ही हे काम होणार आहे की नाही ते सांगा? तुम्ही बोलले की मी आता श्री. भोयेंना पाठवतो. हा काय प्रकार आहे?

**प्रेमनाथ पाटील :-**

आपल्या विषयाचे इम्प्लीमेन्टेशन होत नाही. आपण फक्त बडबड करुन मोकळे होतो.

**केशव घरत :-**

हे अधिकारी नको तिथे बरोबर पोहोचतात.

**मोहन पाटील :-**

आपण आपल्या बजेटमध्ये ते प्रावीधान केलेले होते ते अनधिकृत गाळे बांधतात आणि त्याला परमिशन घेत नाही त्याबाबत होते. आपण त्याकरिता नगररचनाकडून ज्या काही रिपेरिंगच्या परवानग्या येतील त्यांच्याकडून रु. १०,०००/- फी घ्यायची आहे. आपण तो विषय बजेटच्या मिटींगमध्ये चर्चेसाठी घेतलेला होता. आपण या विषयावर दुसऱ्या बाजुन कार्यवाही करायला पाहिजे. आपण ठराव करुया. परंतु, तुम्ही प्रस्ताव आणायला पाहिजे. हा विषय नगररचना विभाग किंवा अतिक्रमण विभागाकडून येणे आवश्यक आहे. परंतु याठिकाणी हा विषय आलेला आहे. बजेटमध्ये तरतुद दिलेली आहे याचा अर्थ नगरसेवकांनी बजेटची अमाऊन्ट ठरवायची असे नाही. तुम्ही जे बजेट द्याल, तुम्ही तुमच्या हिशोबाने इम्प्लीमेन्टेशन करायचे आहे. आम्ही ज्या काही सुचना दिलेल्या आहेत की या शहराचा विकास झाला पाहिजे. या शहराच्या विकासात आर्थिक भर पडली पाहिजे. यासाठी सगळे नगरसेवक चर्चा करतात आणि विषय आणतात. तो विषय फॉलो-अप होतो की नाही. मा. उपायुक्त साहेब, ही जबाबदारी कोणाची आहे? बजेटच्या मिटींगमध्ये जेवढी चर्चा होते आणि त्या चर्चेमध्ये जेवढे ठराव होतात तुम्ही ते ठराव आणणे आवश्यक आहे. श्री. संजय तायशेट्ये, आम्ही हे करणार नाही, ते करणार नाही अशी तुम्ही चर्चा कराल तर हे होईल का? आज बजेटची मिटींग झाल्यापासून किती ठरावावर इम्प्लीमेन्टेशन झाले? ते आम्हाला समजले पाहिजे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो.) :-**

या ठिकाणी विषयांतर होत आहे.

**मोहन पाटील :-**

या ठिकाणी विषयांतर कसे होईल? या ठिकाणी विषयांतर बिलकुल होत नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

विषयांतर होत आहे.

**मोहन पाटील :-**

तुम्ही आता पैसे कलेक्ट करा. याच्यापुढे अतिक्रमणामध्ये जी बांधकामे होतात आणि जो सदस्यांनी मुद्दा मांडलेला आहे. तुम्ही त्याचा आढावा घ्या. तुम्ही त्याचे मुद्दे स्पष्ट करा. परंतु, जर तुम्ही आर्थिक बाबतीत अशा पध्दतीने हलगर्जीपणा केला असेल तर त्याच्यावर कोणती कार्यवाही करायला पाहिजे हे मी तुम्हाला या ठिकाणी सांगणार आहे. मागच्या सभेला सन्मा. सदस्य केशव घरत यांनी सांगितले की एका बाजुला वाडा म्हणजे त्याला लाकडाची पट्टी असते. ती काढायला सांगितली तर श्री. भोये यांनी मिरा भाईंदर महानगरपालिकेने रिपेरिंग केलेली वॉल होती ती तोडली.

**प्रभात पाटील :-**

तुम्ही त्यांच्याकडून नुकसान भरपाई घ्या.

**प्रेमनाथ पाटील :-**

श्री. भोये यांच्या पगारातुन कपात करुन घ्या.

**केशव घरत :-**

ज्या कोणी असे केले त्यांना निलंबित करण्याची परवानगी आपल्याकडे आहे.

**रतन पाटील :-**

त्याला रु. २५ लाख नुकसान भरपाई करायला सांगा.

**प्रभात पाटील :-**

तुम्ही त्यांच्या पगारातुन अमाऊन्ट कापून घ्या.

**मोहन पाटील :-**

पुन्हा तेच अधिकारी त्यांना त्याच कामावर नियुक्त करतात याचा काय अर्थ आहे? ज्या अधिकाऱ्यांनी जे काम केलेले आहे. तुम्ही त्या अधिकाऱ्यांमार्फत ते काम तात्पुरते करा. आम्हाला दाखवायला तरी काम करा. तुम्ही त्या कर्मचाऱ्याला दुसऱ्या खात्यामध्ये टाकणार आहात का? तो कर्मचारी पुन्हा त्याच खात्यात येऊन ते काम चांगले करेल. असे तुम्ही आम्हाला दाखविण्या पुरते करा. नगरपालिका होती तेव्हा हा वेगळा विषय होता.

**गजानन भोईर :-**

आपल्या अधिकाऱ्यांना किती लोक घाबरतात? याचे मी एक उदाहरण देतो. मी स्वतः श्री. पानपट्टे साहेबांबाबत उदाहरण देतो. श्री. पानपट्टे साहेबांनी स्वतः एकाला एन.ओ.सी.चे दुकान घालायला परमिशन दिली. तो माणूस चारवेळा येऊन गेलेला होता. परंतु, सोसायटीवाल्यांची त्याबाबत कम्प्लेन्ट आहे की, म्युनिसिपाल्टीची माणसे पाठवतात. ती माणसे टाळे लावतात. तो टाळे उघडतो आणि पुन्हा दुकान चालू करतो. असे पाच वेळा झाले. त्या दुकानाला एन.ओ.सी. वगैरे काही नाही. हे दुकानदार अधिकाऱ्यांना किती घाबरतात? हे यावरुन स्पष्ट होते.

**प्रभात पाटील :-**

साहेब, मटणवाल्याची अजुन एक तक्रार आहे.

**गजानन भोईर :-**

मी त्या मटणवाल्याच्या तक्रारीबाबत बोलत आहे.

**रतन पाटील :-**

आता अतिक्रमणचा विषय घ्या.

**मिलन पाटील :-**

मा. सभापती साहेब, शहरात भरपूर बांधकामे चालू आहेत. प्रत्येक सदस्याची कम्पलेन्ट असेल. एका बिल्डींगला दोन मजल्याची परमिशन असतानासुध्दा सहा-सहा मजले बांधले जातात. अतिक्रमण विभागाचे काय लक्ष आहे? ते सांगा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आपला जो काशिमि-याचा पॅरेलल सिल्व्हर पार्कच्या अपोझीटला रोड आहे. तिथे अजुनही बांधकाम चालू आहे. त्या ठिकाणी पत्र्याचे फेन्सिग टाकून बांधकाम चालू आहे.

**मिलन पाटील :-**

साहेब, आम्ही खुप वेळा सांगितले की, टाऊन पार्कमधील झोपड्या हटवा. परंतु, एकही झोपडी उठवली जात नाही. मी वर्षभर ओरडत आहे.

**रतन पाटील :-**

आपण टाऊनपार्कच्या झोपड्यांबाबत सांगितलेले नव्हते. परंतु, टाऊन पार्कच्या बाजुच्या झोपड्या उचलत नाही.

**मिलन पाटील :-**

स्टेडीयमच्या बाजुच्या झोपड्याबाबत मी खुप वेळा सांगितलेले होते.

**प्रेमनाथ पाटील :-**

शहरात झोपड्या वाढत चाललेल्या आहेत ही खरी गोष्ट आहे.

**रतन पाटील :-**

अतिक्रमण विभाग काय करतो? अतिक्रमण विभाग फक्त महासभेत झोपड्या काढू असे सांगतो. परंतु, त्याच्यावर कार्यवाही करित नाहीत.

**मिलन पाटील :-**

अतिक्रमण विभाग फक्त फेरिवाल्यांच्या गाड्या उचलण्याचे काम करतो. परंतु, तुम्ही शहरामध्ये किती झोपड्या तोडल्या त्याचा अहवाल घ्या.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. सभापती साहेब, आम्ही दोन-तीन वेळा सुभाषचंद्र बोसच्या मैदानासमोरील झोपड्यांबाबत विषय काढलेला होता. परंतु, तेथील झोपड्या कमी होण्याऐवजी वाढत चाललेल्या आहेत. शिवाय, त्या झोपड्यांतील लहान मुले रस्त्यावर धावत असतात.

**मिलन पाटील :-**

टाऊन पार्कमधील झोपड्या काढत नाही. तुम्ही रोज बघता की आपल्याला एवढे मोठे टाऊन पार्क विकसित करायचे आहे. आपण त्याचे टेन्डर काढले ते इथपर्यंत आलेले नाही. या अधिका-यांना ते दिसत नाही. मी भाईंदर पूर्वबाबतचे प्रकरण अधिका-यांना दिलेले होते. या अधिका-यांना हे प्रकरण न्यायप्रविष्ठ असून कोर्टात पाठवलेले आहे. असे मी सांगितलेले होते. श्री. अजित पाटील यांनी गुपचुप बसण्याचे उत्तर दिले. आम्ही गप्प बसलेलो आहोत आणि तेसुध्दा गप्प बसलेले आहेत. प्रशासनाचे काम जोरात चालू आहे आणि ती बिल्डींग पूर्ण व्हायला आलेली आहे. सहा माळ्याची परमिशन नसतानासुध्दा सहा मजले पूर्ण झालेले आहेत. त्या बिल्डींगला फक्त दोन मजल्याची परमिशन होती. मा. सभापती साहेब, या बिल्डींगबाबत प्रशासनाला माझे पत्र गेले की नाही ते तुम्ही विचारा. आपण चांगले चांगले वकील नेमलेले आहेत. त्याच्याबाबत विचारा. आपण त्या वकीलांसाठी फी दिलेली आहे.

**मोहन पाटील :-**

तुम्ही एक-एक मुद्दा मांडा.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, प्रथम अतिक्रमणचा मुद्दा घ्या. तुम्ही रस्त्यावरील गाळ्यांची हाईट किती ठेवणार आहात आणि किती गाळे अतिक्रमणने उचलणार आहात? याचा मला प्रथम खुलासा करा.

**मिलन पाटील :-**

तुम्ही अतिक्रमणने किती गाळे तोडले? ते सांगा. श्री. शिवमुर्ती नाईक साहेब असताना पोलीस बंदोबस्त घ्या असे सांगायचे.

**प्रेमनाथ पाटील :-**

गाळ्यांची हाईट केवढी असु शकते?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तुम्ही अतिक्रमण विभागाच्या अनुषंगाने सध्या करत असलेल्या कार्यवाहीबाबत किंवा पंधरा दिवस, महिन्यामध्ये केलेल्या कार्यवाहीबाबत सविस्तर माहिती द्या. आपण एक महिन्यामध्ये अतिक्रमण विभागातुन काय-काय काम केले? त्याचा मुद्यासह अहवाल घ्या आणि पुढे काय करायचे आहे किंवा कोर्टमॅटरबाबत काय करायचे आहे? ते सांगा.

**प्रेमनाथ पाटील :-**

इमारतीवर कोर्टमॅटर आहे. परंतु, गाळेधारकांवर कोर्टमॅटर नसते.

**संजय तायशेट्ये :-**

या विषयावर पुढच्या मिटींगला कार्यवाही केली जाईल.

**मिलन पाटील :-**

पुढच्या मिटींगला कार्यवाही होत नाही.

**रतन पाटील :-**

तुम्ही काय कार्यवाही करणार ते सांगा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

पुढच्या मिटींगला कार्यवाही करा.

**मिलन पाटील :-**

पुढच्या मिटींगला कार्यवाही करु नका. तुम्ही जेवढे वाढीव गाळे असतील तेवढे तोडणार आहात का?

**रतन पाटील :-**

तुम्ही माहिती नाही असे कसे बोलता?

**केशव घरत :-**

जर तुमच्याकडे माहिती नसेल तर आम्ही कोणाकडे माहिती मागायची?

**मिलन पाटील :-**

याला माहिती लागते. हे तात्काळ स्वरुपाचे धोरण आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

तोपर्यंत पुढचा विषय घेऊ नका.

**जयंत पाटील :-**

मा. उपायुक्त साहेब, तुम्ही अतिक्रमण डिपार्टमेन्ट काढून टाका.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सन्मा. सदस्य जयंत पाटील यांचे अतिक्रमण डिपार्टमेन्ट काढून टाका हे म्हणणे बरोबर आहे.

**रतन पाटील :-**

अतिक्रमण डिपार्टमेन्टमुळे यांचे नुकसान झालेले आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

श्री. संजय तायशेट्येना बोलावू नका आणि तुम्ही या शहरातील अतिक्रमण डिपार्टमेन्ट काढून टाका.

**जयंत पाटील :-**

हल्ली अतिक्रमण डिपार्टमेन्टला कोणीही विचारत नाही. कारण अतिक्रमण विभाग आणि बांधकाम विभागाचे लागेबांधे आहेत. तुम्हाला कोर्ट स्टेटस्को देते. स्टेटस्को हे दोघांना दिल जाते. आपण तिकडे स्टेटस्को द्यायचे आणि त्यांनी तिथे बांधकाम करायचे नाही याला स्टेटस्को म्हणतात. परंतु, कोर्टमॅटर असा आम्ही त्याला एकच अर्थ लावलेला आहे. म्हणजे ही पळवाट अतिक्रमणचे अधिकारी आणि महापालिकेचे अधिकारी आम्हाला सांगत आहे. आम्हाला त्याच्यामधील कायदा कळत नाही असा त्याचा अर्थ नाही. पूर्वी नगरपालिकेच्यावेळेला आमचे अधिकारी घमेले, फावडे वगैरे सर्व काही उचलून आणायचे. कॉन्ट्रॅक्टरला दांड्याने चोपायचे. जर त्या ठिकाणी कॉन्ट्रॅक्टर कामावर आला नाही तर काम कसे होईल? तुम्हाला कोर्टाने घमेले आणू नका असे सांगितलेले नाही. घमेले, फावडे, इंजिन किंवा जी काही मशिन असेल ती आणा. मग कामे लवकर होतील. पूर्वी असे व्हायचे. प्रचंड प्रमाणात अतिक्रमण चालू आहे. झोपडपट्ट्या वाढलेल्या आहेत. गरिब लोकांनी त्यांना राहण्यासाठी झोपडपट्ट्या बांधलेल्या आहेत. आपण मानवतेच्या दृष्टीकोनातुन त्यांच्याकडे बघु. परंतु, ईमारतवाले, बिझनेसवाले तुम्हाला फाट्यावर मारुन सात-आठ मजली टॉवर बांधत आहेत. परंतु, आपण त्य ठिकाणी काहीही करु शकत नाही. तुम्हाला त्याबाबत काहीही माहिती नाही असा मी याचा अर्थ घेणार नाही. हे सर्वकाही सगळ्यांना माहिती आहे. त्या तिकडे आर्थिक बोलणी झालेली आहेत. म्हणून शहरामध्ये अशा गोष्टी होतात. आम्ही या शहरामध्ये कडक आहोत असे तुम्ही दाखवा. तुम्ही बिल्डरांना तुमचा हिसका दाखविला पाहिजे.

**गजानन भोईर :-**

दुसरी गोष्ट म्हणजे मी टाऊन प्लॅनिंगच्या लोकांना पत्र दिलेले होते. त्यांनी पत्राचे असे उत्तर दिले की यांना सन १९९० मध्ये परवानगी दिलेली होती.

**प्रेमनाथ पाटील :-**

महानगरपालिकेने परवानगी दिलेली आहे का?

**गजानन भोईर :-**

आम्ही सन १९९० साली परवानगी दिलेली होती. तुम्हाला जे काही करायचे असेल ते करा. महानगरपालिका अशी परवानगी देत आहे.

**जयंत पाटील :-**

आपल्याला प्रत्येक गोष्ट आठवून द्यावी लागते.

**गजानन भोईर :-**

माझ्याकडे अशा रिमार्कचे पत्र आहे.

**जयंत पाटील :-**

तुम्हाला ही गोष्ट आठवून द्यावी लागणार आहे.

**गजानन भोईर :-**

ए.टी.पी.चे अधिकारी उपस्थित आहेत. तुम्ही त्या अधिकाऱ्यांना विचारा. आम्ही तुम्हाला पत्र दिलेले होते. तुम्ही आम्हाला कळविले की याला सन १९९० मध्ये परवानगी दिलेली होती.

**जयंत पाटील :-**

एक वर्षानंतर दिलेली प्रत्येक परवानगी रिन्यु करायला पाहिजे. जर त्यांनी परवानगी रिन्यु केली नसेल तर परवानगी कॅन्सल होते. मग तुम्ही पंधरा वर्षात काय केले? म्हणजे सन १९९० ते आतापर्यंतच्या पंधरा वर्षाच्या काळात काय झाले?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

काशिमिरा रोडच्या सर्व्हिस रोडवर बिनधास्तपणे अतिक्रमण सुरु आहेत. मागच्या वेळेला कमिशनर साहेबांनी अतिक्रमणे थांबवलेली होती आणि महासभेत या विषयावर चर्चा झालेली होती. तरीसुध्दा आता नविन-नविन कामे चालू आहेत. मी सिल्व्हर पार्कच्या एग्झॅक्टली अपोझीट साईडबाबत बोलत आहे. याबाबत सर्व सन्मा. सदस्यांना माहिती आहे. शिवाय, आपल्या अतिक्रमणचे इन्चार्ज मिरा भाईंदरमध्ये राहतात. तरीसुध्दा त्यांना माहिती नाही याचा काय अर्थ आहे?

**मिलन पाटील :-**

सर्व अधिकृत आहे. म्हणून ती जागा सकाळी-संध्याकाळी फेरिवाल्यांना देतात.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो.) :-**

आता सभागृहात उपस्थित झालेल्या मुद्याच्या अनुषंगाने मी सांगू इच्छितो की ऑलरेडी डेव्हलप झालेल्या जागांचा विषय वेगळा आहे. परंतु, आता ज्या जागा व्हॅकेन्ट आहेत. आपण त्या जागांवर अतिक्रमण होऊ द्यायचे नाही. आपण त्यांना नोटिस द्यायची आहे.

**रतन पाटील :-**

आपण प्रत्येक वेळेला नोटिस देऊन काम करायचे का? तुम्ही कार्यवाही करता का?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

श्री. संजय तायशेट्येनी आता असा आरोप केला की टेन्डरमध्ये आमचे नातेवाईक आहेत. तुम्ही स्पष्ट करुन द्या. आमच्या कुठल्या सदस्याचें टेन्डर आहे ते ओपन करुन द्या.

**संजय तायशेट्ये :-**

जर टेन्डर ओपन करायचे असेल तर सगळे टेन्डर ओपन करा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही सदस्यांवर जे काही आरोप करता ते आरोप चुकीचे आहेत. तुम्ही ॲक्सेप्ट करता का? श्री. संजय तायशेट्येनी टेन्डरमध्ये सर्व सन्मा. सदस्यांचे नातेवाईक आहेत असा आरोप केलेला आहे. तुम्ही कुठल्या सदस्यांवर आरोप केलेला आहे? ह्यांनी यांचे शब्द मागे घ्यावेत. तुम्ही सगळे टेन्डर ओपन करा.

**मिलन पाटील :-**

मा. सभापती साहेब, हे अधिकारी तुमच्यासमोर अशा गोष्टी करतात. त्याचा काय अर्थ आहे? तुमच्यासमोर अशा गोष्टी होणे योग्य नाही.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो.) :-**

श्री. संजय तायशेट्ये यांनी नातेवाईकांचा उल्लेख केलेला नाही.

**मिलन पाटील :-**

परंतु, श्री. संजय तायशेट्ये सर्व सभासदांच्या समोर बोललेले आहेत. तुम्हाला कोणाचा पाठिंबा आहे ते सांगा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

श्री. संजय तायशेट्ये साहेब, तुम्ही इन्चार्ज झाल्यापासून मी कधी असा फोन केला का? की तुम्ही यांचे बांधकाम बघा वगैरे. मी तुम्हाला प्रश्न विचारलेला आहे. तुम्ही मला माझ्या प्रश्नाचे उत्तर द्या. तुम्ही इन्चार्ज असताना कोणाचे बांधकाम वाचवा किंवा तोडा असे सांगितलेले नव्हते. मग तुम्ही असे खुले-खुले आरोप कसे करता? याबाबत त्यांनी त्यांचे मत स्पष्ट करावे.

**प्रभात पाटील :-**

इकडे उपस्थित असलेल्या सदस्यांनी त्यांना सांगावे.

**मिलन पाटील :-**

साहेब, आम्ही तुम्हाला कधीही काहीही बोललो नाही. आमच्याकडे जेवढी अतिक्रमणे आहेत. आम्ही तुम्हाला तेवढी अतिक्रमणे दाखवतो. कारण सर्व नगरसेवकांची नांवे तिथपर्यंत जातात. जो कम्प्लेन्ट करणार आहे तो ह्याच्यामध्ये बिलकुल सापडणार नाही.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा‍ो.) :-**

ह्या रस्त्यावर बांधकामाला सुरुवात झालेली नाही.

**मिलन पाटील :-**

आम्ही तुम्हाला अनधिकृत बांधकामाबाबत कार्यवाही विचारलेली आहे. माणसाला पंधरा दिवसात काय कार्यवाही केली? हे लक्षात येत नाही. मग काय म्हणायचे?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा‍ो.) :-**

सभागृहाची अशी भावना आहे की जी कार्यवाही झालेली आहे, तुम्ही ती कार्यवाही नियमाप्रमाणे करित असाल तर वेगळी गोष्ट आहे. आतापर्यंत बांधकाम चालू झालेले नाही. ही बांधकामे नव्याने सुरु होतात. तुम्ही ही बांधकामे व्हायला देऊ नका. याच्यावर कोणाचेही प्रेशर घेण्याची आवश्यकता नाही.

**कैलासबेन जानी :-**

ज्यांचे बांधकाम झालेले आहे. त्यांचे तुम्ही काय करणार आहात?

**मा. सभापती :-**

मी याच्यावर अशी प्रतिक्रिया करतो की, तुम्ही उपायुक्त आहात. तुमची मॅनेजमेन्ट फार चुकीची चाललेली आहे आणि या ठिकाणी अशा घटना घडलेल्या आहेत की ज्या घटना सांगितल्या तर इथे बोंबाबोंब होईल. त्या डिपार्टमेन्टचा टॅक्स न लावता टॅक्स लावला असे लिहून दिलेले आहे. त्या बिल्डींगला ५६० फ्लॅट टॅक्स लावण्यासारखे आहेत. परंतु, त्या बिल्डींगला टॅक्स लावलेला नाही आणि टॅक्स लावला असे लिहलेले आहे. मग ही महानगरपालिका डुबणार की नाही ते सांगा. आम्ही ह्याच्यामध्ये २९० कोटीचे रु. ३५३ कोटीचे बजेट केलेले आहे. आम्ही एवढे बजेट वाढवले तर कसे हाईल.

**मोहन पाटील :-**

मा. सभापती महोदय, तुम्ही पिठासीन अधिकारी आहात. तुम्ही या गोष्टीचा खुलासा करावा. तुम्ही बोलता तो कायदा आहे.

**मा. सभापती :-**

मी तुमच्या नंतर बोलणार आहे. आपल्या महानगरपालिकेत ज्या घटना घडत आहेत. मी तुम्हाला त्याची फाईल आणून दाखवतो. बिल्डींगना टॅक्स लागलेला नाही. परंतु, त्या ठिकाणी बाकी 'नाही' असे लिहलेले असताना ते खोडून 'आहे' असा शब्द टाकलेला आहे. मी त्याच्या फाईल मागवतो. मग तुम्हाला समजेल.

**मिलन पाटील :-**

तुम्ही आताच्या आता फाईल मागवून घ्या. कारण या गोष्टीवर कार्यवाही झाली पाहिजे.

**मा. सभापती :-**

अशा किती तरी गोष्टी घडत असतील त्या गोष्टी नजरेत ठेवा. आपण असा विषय घेतलेला आहे की टॅक्स वाढल्यामुळे आपले बजेट वाढेल. आपण टॅक्सच्या आधारावर बजेट तयार केलेले आहे.

**रतन पाटील :-**

परंतु, इथे तशी भुमिका नाही. इथे टॉवर्स बांधलेले आहेत.

**मिलन पाटील :-**

तुम्ही पिठासीन अधिकारी आहात. तुम्ही टॅक्सच्या कार्यवाहीबाबत डिसीजन घेतला पाहिजे अशी आमची भावना आहे. चारही फाईलमध्ये जो कोणी दोषी असेल तुम्ही त्याच्यावर कार्यवाही करा. कारण तो कोण अधिकारी आहे? काय आहे? हे आम्ही बघितलेले नाही. तुमच्याकडे ज्या फाईल्स आहेत, आज त्या फाईल्सवर कार्यवाही झाली पाहिजे. आज त्या अधिकाऱ्यांवर कार्यवाही झाली पाहिजे. दुसरी गोष्ट म्हणजे मागच्या वेळेला अतिक्रमणबाबत खुप हंगामा झालेला होता. पोलिसांना बोलवा असे सांगितलेले होते. आम्ही पोलिसांचे पैसे सॅन्क्शन करुन दिलेले आहेत. साहेब, पोलिसांचे पैसे सॅन्क्शन करुन दिलेले आहेत का? याबबात तुम्ही आम्हाला सांगा.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

पोलिसांचे पैसे सॅन्क्शन करुन दिलेले आहेत का?

**मिलन पाटील :-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील साहेब, तुम्ही पोलिसांचे पैसे सॅन्क्शन करुन दिलेले आहेत का? श्री. संजय तायशेट्‌ये, तो ठराव तुमच्यापर्यंत आलेला आहे का? आम्ही मागच्या बजेटमध्ये पैसे सॅन्क्शन करुन दिलेले होते.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

याला जबाबदार कोण आहे?

**केशव घरत :-**

आपल्याकडे फक्त ठराव होतात. परंतु, त्या ठरावाची अंमलबजावणी केली जात नाही. मग ठराव तरी कशाला करायचा?

**रतन पाटील :-**

महासभा आणि स्थायी समितीमध्ये होणाऱ्या ठरावावर अंमलबजावणी होत नाही. मग हे ठराव इकडे कशाला करायचे?

**केशव घरत :-**

मा. सभापती महोदय, आपण या ठिकाणी जे ठराव करतो. त्याची अंमलबजावणी होते का?

**प्रभात पाटील :-**

याबाबत सचिवांनी माहिती द्यावी.

**प्रेमनाथ पाटील :-**

जोपर्यंत अधिकाऱ्यांवर कार्यवाही होणार नाही तोपर्यंत प्रश्न सुटणार नाही.

**मिलन पाटील :-**

आपण आता जे काही पोलिसांचे पैसे देणार होतो. मी त्याबाबत बोलत आहे.

**मोहन पाटील :-**

आपण तो ठराव कार्यवाहीसाठी पाठवलेला आहे.

**नगरसचिव :-**

तो ठराव एस.पी.कडे कार्यवाहीसाठी गेलेला आहे. माझ्याकडे पेन्डिग नाही. रितसर कार्यवाहीसाठी गेलेला आहे.

**मोहन पाटील :-**

ठरावाची अंमलबजावणी सुरु आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आम्ही महापालिकेचे उत्पन्न वाढवले. आम्ही जनतेच्या विरोधात जाऊन ठराव पास केला. तरीसुध्दा तुम्ही त्या ठरावाची अंमलबजावणी करित नाहीत आणि हा जो काही लॉस झालेला आहे. या लॉसला कोण जबाबदार आहे? फक्त एवढेच उत्तर द्या.

**रतन पाटील :-**

महापालिकेच्या बऱ्याच उत्पन्नाच्या बाबी आहेत. एक-एक प्रश्न होऊन जाऊ द्या. महापालिकेचे उत्पन्न का वाढत नाही?

**मिलन पाटील :-**

मी सन्मा. सदस्य मोहन पाटील सभापतीपदावर असल्यापासुन मी प्रत्येक वेळेला बोलत आलेला आहे की प्रत्येक डिपार्टमेन्टच्या ठरावावरील इम्प्लीमेन्टेशन बाबतचा विषय घ्यायचा. जेवढे विषय घेणार त्याच्यामध्ये ठरावाच्या अंमलबजावणीचा एकतरी विषय आला पाहिजे. मी खुप वेळा हे बोललो. आम्ही शेवटी बोलून बोलून पुढच्या महिन्यात रिटायर होऊ. तरीसुध्दा या विषयाची बंमलबजावणी होत नाही.

**रतन पाटील :-**

श्री. खतगावकर साहेब, तुम्ही आढावा बैठकीबाबत बोलता. परंतु, आता बजेटची मिटींग होऊन तीन महिने झालेले आहेत. आता आढावा बैठक व्हायला पाहिजे नको होती का?

**मिलन पाटील :-**

सहा महिन्यापेक्षा जास्त कालावधी झालेला आहे.

**रतन पाटील :-**

तुम्ही प्रत्येक डिपार्टमेन्टकडून आढावा बैठकीबाबत माहिती मागवायला पाहिजे होती. आपण महापालिकेचे उत्पन्न वाढविण्यासाठी काय-काय उपाययोजना केल्या त्या बघा. संपूर्ण दुकान किंवा ज्या इंडस्ट्रीज आहेत त्याबाबत अजुनपर्यंत काहीही उपाययोजना केलेल्या नाहीत हा कोणाचा लॉस आहे? हा महापालिकेचा लॉस आहे, की अधिकाऱ्यांचा लॉस आहे ते सांगा. आपण बजेट एवढे फुगवलेले आहे. परंतु, बजेट फुगवून काहीही उपयोग झालेला नाही. आपल्याला हे पैसे ज्या माध्यमातुन मिळणार आहेत, त्याच्यावर उपाययोजना केलेल्या नाहीत. काहीही इम्प्लीमेन्टेशन झालेले नाही. एकही दुकानदार किंवा कारखानदाराची

एन.ओ.सी. दिलेली नाही. नोंदणी चालू नाही. जे नविन टॉवर्स उभे आहेत त्यांना जो टॅक्स लावायचा आहे किंवा त्याचा जो काही सर्व्हे करायचा आहे तो सर्व्हेसुध्दा झालेला नाही.

**मिलन पाटील :-**

आपण त्याच्याकरीता नुसते अधिकारी नेमुन ठेवलेले आहेत. हे अधिकारी काहीही कामाचे नाहीत.

**रतन पाटील :-**

तुम्हीच सांगा की उत्पन्न कुठल्या पध्दतीने वाढवणार?

**मिलन पाटील :-**

आता याठिकाणी मा. उपायुक्त साहेब चर्चा करतात. परंतु, आपण श्री. शिंदे नावाचे एक अधिकारी खास करुन नेमलेले आहेत.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपण ५२० गाळेधारकांना टॅक्स न लावल्याबाबत लिहून दिलेले आहे. जोपर्यंत त्या अधिकाऱ्यावर कार्यवाही होत नाही तोपर्यंत पुढची मिटींग चालू करायला देऊ नये. आता श्री. म्हात्रे साहेबांनी ५२० गाळेधारकांना टॅक्स न लागतानासुध्दा टॅक्स लागला असे लिहून दिलेले आहे. जोपर्यंत तुम्ही त्या अधिकाऱ्यावर कार्यवाही करित नाही तोपर्यंत मिटिंग चालू करु नका.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आम्ही जो ठराव पास केला आणि गाळयाचे पैसे वाढविण्याचा प्रयत्न केला. महापालिकेचासुध्दा आर्थिक फायदा करुन दिला. त्या ठरावावर इम्प्लीमेन्टेशन झालेले नाही. त्या ठरावावर इम्प्लीमेन्टेशन का झाले नाही? कुठल्या अधिकाऱ्याने ठरावावर इम्प्लीमेन्टेशन केलेले नाही. तुम्ही त्या ठरावावर काय कार्यवाही करता? ते सांगा.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपलं उत्पन्न वाढलं पाहिजे.

**रतन पाटील :-**

आपल्या सदस्यांचे उत्पन्न वाढविण्याकडे जरासुध्दा लक्ष नाही.

**मिलन पाटील :-**

सभापती साहेब, आपण हा ठराव मांडतो. परंतु, ठरावावर अंमलबजावणी केली जात नाही. तुम्ही जोपर्यंत या विषयाबाबत अधिकाऱ्यांना विचारत नाही. तोपर्यंत नगरसेवकांच्या पत्राला काहीही किंमत राहणार नाही. मी मागच्या वेळेलासुध्दा असे मत मांडलेले होते. मी हे तिसऱ्या मिटिंगला मांडत आहे. म्हणजे आम्ही अधिकाऱ्यांना एवढे बोलूनसुध्दा काहीही फरक पडत नाही. या तिसऱ्या मिटिंगच्या इतिवृत्तांतामध्ये बघा.

**रतन पाटील :-**

साहेब, तुम्ही अतिक्रमणचा विषय घेतला नाही असे मला वाटते.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सन्मा. सदस्य मिलन पाटील साहेब, माझी तुम्हाला अशी विनंती आहे की तुम्ही उत्पन्न वाढविण्याच्या अनुषंगाने या ठिकाणी जो काही विषय मांडलेला आहे. त्याबाबत त्या अधिकाऱ्यांना स्पेसिफिकली बोलावून घेऊन कार्यवाही का केली नाही? ते समजले असते.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपण मागच्या वर्षाच्या सन २००५-०६ बजेटमध्ये असे ठरविलेले होते की गाळ्यांच्या रिपेरिंगसाठी १४ फुट हाईट द्यायची आहे.

**गजानन भोईर :-**

गाळ्यांची हाईट १४ फुट आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपल्याकडे जे काणी गाळ्याच्या हाईटची परमिशन मागायला येतील आपण त्याला रु. १०,०००/- ची पावती फाडून द्यायची आहे आणि गावठणमध्ये घराच्या दुरुस्तीसाठी रु. ५०००/- द्यायचे आहेत. हा ठराव झालेला आहे आणि आपण मागच्या बजेटमध्ये तसे केलेले होते. त्याप्रमाणे बजेटमध्ये वाढ केलेली आहे. परंतु, आजपर्यंत तसे काहीही झालेले नाही.

**गजानन भोईर :-**

गाळ्याच्या हजार रुपयापर्यंत पावत्या फाडलेल्या आहेत.

**प्रेमनाथ पाटील :-**

अधिकारी जो काही ताबा घेऊन येतात. आपला त्याच्याशी संबंध नाही. दुसरी गोष्ट म्हणजे माझ्या मित्राचा जय अंबे इस्टेटमध्ये गाळा रिपेअर करायचा होता. तो गाळा रोडपासुन तीन फुट आतमध्ये होता. त्याने त्या ठिकाणी भराव करुन तेवढेच तीन फुट उंच केले. म्हणजे त्या गाळ्याची उंची दहा फुट झाली. तिथे आपला एक अतिक्रमणचा अधिकारी गेलेला होता. त्या गाळेवाल्याला सांगितले की जास्त हाईट घ्यायची नाही. म्हणून त्या गाळेधारकाने काम बंद केले. त्या गाळेधारकाने मी सन्मा. सदस्य प्रेमनाथ पाटील याचा मित्र असल्याचे सांगितले. परंतु, तो अधिकारी बोलला की मी सन्मा. सदस्य प्रेमनाथ पाटील यांना ओळखत नाही.

मी त्या गाळेधारकाचे नाव सांगणार नाही. दुसरा विषय असा आहे की भाजी मार्केटमध्ये चोवीस फुटाच्या हाईटच्या गाळ्यांचे काम चालू आहे. तिथे काय करायचे आहे ते तुम्ही मला सांगा. आनंद इस्टेटमध्ये बावीस फुटाच्या हाईटचे काम चालू आहे. तिथेसुध्दा काय करायचे ते सांगा. नर्मदा इस्टेटमध्ये गाळा नं. ४ बाबत काय कार्यवाही केली? ते सांगा.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो.) :-**

गाळ्यांच्या दुरुस्तीला रु. १०,०००/- किंवा रु. ५०००/- घेतात. ती कार्यवाही सुरु केली की नाही? त्याच्यावर इम्प्लीमेन्टेशन व्हायला पाहिजे.

**गजानन भोईर :-**

साहेब, मी त्या दिवशी स्वतः रु. १०,०००/- घेऊन गेलेलो होतो. जर तुम्हाला विश्वास नसेल तर तुम्ही आताच्या आता पावतीबुक आणायला सांगा. तुम्हाला शंभर पावत्या आहेत की किती आहेत? ते आता समजेल.

**मोहन पाटील :-**

विषय असा आहे की आपल्या प्रशासनाकडून तो ठराव आलेला नाही. आपण त्यावेळेला अर्थसंकल्पीय सभेत चर्चा केली की आपल्याला इन्कम सोर्स वाढला पाहिजे. आम्ही त्या अनुषंगाने एक प्रस्ताव मांडला. तो प्रस्ताव मांडल्यानंतर आपल्याकडे त्याबाबतचा ठराव यायला पाहिजे होता. परंतु, प्रशासनाकडून तो ठराव आलेला नाही. त्यांनी ज्या पावत्या फाडल्या त्या पावत्या चुकीच्या नाहीत. परंतु, आपण जो ठराव प्रशासनाकडून आणायला पाहिजे होता किंवा बजेटमध्ये अशा तऱ्हेची वाढ करा. म्हणजे आम्हाला हे करुन ते करता येईल.

**जयंत पाटील :-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील साहेब, माझे असे म्हणणे आहे की स्थायी समितीमध्ये एखादा ठराव केला तर त्या ठरावावर इम्प्लीमेन्टेशन होईपर्यंत तो ठराव कसा जातो? याची माहिती द्या.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो.) :-**

सन्मा. सदस्य जयंत पाटील यांनी एक चांगला मुद्दा मांडलेला आहे की सभागृहामध्ये वेळोवेळी ठराव किंवा प्रस्ताव येत असतात. जर विषयपत्रिकेवर विषय असेल तर काही प्रस्तावांचे ठरावात रुपांतर होते. जर विषयपत्रिकवर विषय नसेल तर येणाऱ्या सभेमध्ये प्रशासनाने त्या विषयाची नोंद घेऊन त्या अनुषंगाने भविष्यामध्ये आपल्याला तो सुझाव महापालिकेच्या हिताच्यादृष्टीने आणि सामान्य नागरिकांच्यादृष्टीने किती आवश्यक आहे ह्याचा आभ्यास करुन मा. आयुक्त साहेबांच्या सहीने तो प्रस्ताव आणायला पाहिजे. तो विषय नगरसचिव साहेबांकडे आल्यानंतर तो विषय सभापती किंवा महापौर साहेबांकडे त्यांच्याकडे विषय येईल. त्याची ऑलरेडी चर्चा झालेली असते. त्याच्यानंतर तो विषय विषयपत्रिकेवर येतो आणि त्या विषयावर धोरणात्मक निर्णय होतो. एकदा धोरणात्मक निर्णय झाल्यानंतर नगरसचिवांमार्फत संबंधित विभागाला तो ठराव इम्प्लीमेन्टेशनसाठी मा. आयुक्त साहेबांची सही घेऊन द्यायला पाहिजे. हा ठराव प्रशासनाच्या प्रारुपप्रमाणे आहे किंवा हा ठराव अंमलबजावणीसाठी नियमाप्रमाणे आहे. म्हणजेच संबंधित विभागाने या ठरावाची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. हे जनरल प्रशासकीय कामकाज आहे. या ठिकाणी महापालिकेचे उत्पन्न वाढविण्याच्या अनुषंगाने सन्मा. सदस्य प्रेमनाथ पाटील किंवा सन्मा. सदस्य मिलन पाटील यांनी जे काही मुद्दे मांडलेले आहेत त्याबाबत चर्चा करण्यासाठी संबंधित विभागाचे विभागप्रमुख श्री. घेवारे यांना आपण बोलावूया. आपण गाळ्यांची साईज वाढविण्यासाठी लम्पसम रु. १०,०००/- दुरुस्ती परवानगीचे घेतो आणि घराच्या दुरुस्तीसाठी रु. ५०००/- घेतो. हा प्रस्ताव त्यांनी येणाऱ्या स्थायी समिती किंवा महासभेत आवश्यकतेनुसार सादर करायला पाहिजे. त्या प्रस्तावाचा अवधी तात्काळ ठरवायला पाहिजे. हा अवधी लागू करण्याच्या अनुषंगाने मी त्यांना कार्यवाही करण्याचे आदेश देतो.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. उपायुक्त साहेब, आपण गेल्या दोन वर्षापासून बजेट वाढवत आहोत.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो.) :-**

महापालिकेच उत्पन्न वाढविण्याच्या अनुषंगाने गाळ्यांची जी काही हाईट मेन्टेन करायची आहे. त्याबाबत मी असे सांगेन की जो काही बारा फुट, पंधरा फुट हाईट मोजतात. त्यांनी असा सुझाव दिलेला होता की अशा स्पेशल केसला आपले धोरण म्हणून रु. १०,०००/- फी भरायची आहे आणि घराच्या दुरुस्तीला रु. ५०००/- फी भरायची. हे दोन्ही प्रस्ताव घ्या. तुम्ही हा प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी दिलेला आहे का? जर तुम्ही हा प्रस्ताव शासनाकडे मंजुरीला दिलेला नसेल तर या प्रस्तावावर कार्यवाही सुरु केलेली आहे का? तुम्ही हा प्रस्ताव माहितीसाठी घ्या. कारण वेगवेगळे नियम आहेत.

**दिलिप घेवारे :-**

परंतु, या सगळ्याचा ठराव असतो.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो.) :-**

महासभेमध्ये असा असा प्रस्ताव मांडलेला होता. आपल्या शहरामध्ये त्या अनुषंगाने अशाप्रकारची कार्यवाही होत आहे. जर ह्याच्यामध्ये एफ.एस.आय. व्हॅल्युएशन होता याबाबी घडत नसतील तर असे वसुल करण्याचे अधिकार महासभेमार्फत आम्हाला देण्यात यावेत. तुम्ही असा प्रस्ताव द्याला पाहिजे होता.

**दिलिप घेवारे :-**

पूर्वी हजार रुपये होते.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

तुम्ही नविन बॉडीला प्रस्ताव द्या.

**दिलिप घेवारे :-**

रु. ५०००/- किंवा रु. १०,०००/- एवढेच ठरलेले आहेत.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

हे गाळ्यांच्या हाईटचे दर वाढविण्याबाबत ऑलरेडी चर्चा झालेली आहे. तुम्ही त्या चर्चेप्रमाणे हा खर्च मंजुरीसाठी येणाऱ्या महासभेत पाठवा. आपल्याला त्याप्रमाणे धोरण अवलंबता येईल.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, या गोष्टीला दोन वर्षे झालेली आहेत. तुम्हाला या विषयाबाबत माहिती पडले नाही का?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

तुम्ही हाईटच्या दराबाबतचा प्रस्ताव येणाऱ्या स्थायी समितीमध्ये आणा.

**मिलन पाटील :-**

तुम्ही येणाऱ्या २० तारखेच्या स्थायी समितीमध्ये हा प्रस्ताव आणा. तुम्ही हा प्रस्ताव खास करुन घ्या.

**प्रेमनाथ पाटील :-**

२० तारखेला महासभा आहे आणि महासभेच्या अजेंड्याचे वाटप झालेले आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

वर्षाकाठी अशी प्रकरणे किती येतील? घर दुरुतीची किती प्रकरणे येतील? अंदाजे किती खर्च होईल? हे सर्व काही प्रस्तावामध्ये व्यवस्थितपणे येणे आवश्यक आहे. तुम्ही त्याबाबत प्रस्ताव द्या.

**गजानन भोईर :-**

श्री. घेवारे साहेब, तुम्ही आता पावती मागवणार आहात. त्याच्यामध्ये ६०-७० लोकांनी एका गाळ्याचे रु. १०००/- भरलेले आहेत. मी स्वतः एका गाळ्याची हाईट वाढविण्याबाबत रु. १०,०००/- भरायला गेलेलो तर मला रु. ५०००/- भरायला लावले.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

जोपर्यंत प्रस्तावाला मान्यता मिळत नाही तोपर्यंत पैसे घेता येत नाही. आपल्या सुचनांची रितसर गाळे बांधुन मान्यता मिळायला पाहिजे.

**दिलिप घेवारे :-**

याचा अर्थ चर्चा करायची नाही.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

विचार मांडणे ही वेगळी गोष्ट आहे आणि ठराव मांडणे ही वेगळी बाब आहे.

**गजानन भोईर :-**

आपण ह्या ठिकाणी कुठे कमी पडलेलो आहोत?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

आपण तो प्रस्ताव आणण्याबाबत सुचना दिलेल्या आहेत. आपण ही महासभा सोडून पुढच्या महासभेला विषय चर्चेसाठी आणूया.

**मिलन पाटील :-**

तुम्ही हा विषय पुढच्या महासभेला न घेता खास सभेमध्ये खास विषय म्हणून घ्या. कारण ही उत्पन्नाची बाब आहे.

**जयंत पाटील :-**

आता हा विषय चर्चेला आलेला आहे.

**मोहन पाटील :-**

आपल्याला हा विषय महासभेच्या खास सभेमध्ये घ्यावा लागेल.

**मिलन पाटील :-**

जर आम्ही 'ज' साठी हा प्रस्ताव पाठवला तर तुम्ही घेणार नाही का?

**प्रभात पाटील :-**

तुम्ही गाळेधारकांना गाळ्यांची हाईट वाढवण्याबाबतचा प्रस्ताव 'ज' खाली घ्या.

**मोहन पाटील :-**

आपल्याला गाळेधारकांच्या गाळ्यांची हाईट वाढविण्याबाबतचा प्रस्ताव आर्थिक मान्यतेसाठी घ्यावा लागेल.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील, तुम्ही हा प्रस्ताव घ्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, बजेट पास करताना स्थायी समितीमध्ये ठराव पास झालेला आहे आणि आपण ॲज इट इज बजेट लास्ट टाईमला पास केलेले होते. याचा अर्थ गाळेधारकांच्या हाईटचा ठराव ऑलरेडी पास झालेला आहे. त्यामुळे पुन्हा ठराव करण्याची आवश्यकता नाही.

**मोहन पाटील :-**

गाळेधारकांच्या हाईटचा ठराव आलेला नाही. आपण तो विषय चर्चेसाठी आणलेला होता.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

परंतु, आता बजेट पास केले त्याच्यावर ठराव झालेला आहे.

**मोहन पाटील :-**

तुम्ही असे कसे म्हणता.

**जयंत पाटील :-**

या विषयावर वॉर्ड समितीमध्ये चर्चा होईल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

बजेट पास झाले याचा अर्थ ठराव पास झाला असा होतो.

**मा. सभापती :-**

दोन्ही वेगवेगळे विषय आहेत.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

प्रथम वेगवेगळ्या मुद्यावर चर्चा होते. त्याच्यावर जोर टाकला जातो. त्याप्रमाणे आपली भविष्यात काम करण्याची ध्येय-धोरणे निश्चित होतात. तशाप्रकारचा त्यांच्याकडून प्रस्ताव यायला पाहिजे.

**मोहन पाटील :-**

आपल्याला आर्थिक वाढ होण्यासाठी स्पेसिफिक ठराव द्यावा लागतो. आपण याला चर्चा म्हणत नाही. चर्चा झाली म्हणजे ठराव होतो असे नाही. आपल्याला ठरावासाठी सुचक व अनुमोदक द्यावे लागतात.

**गजानन भोईर :-**

आपण आता सुचक व अनुमोदक घेऊया.

**मोहन पाटील :-**

आपण सुचक, अनुमोदक आणि संबंधित ठराव पुढच्या महासभेला घेऊया.

**कैलासबेन जानी :-**

साहेब, चक्कीच्या ओन.ओ.सी.बाबत असा प्रश्न आहे की चक्कीवाल्यांचे रु. ७०००/- उत्पन्न आहे. आता ए.टी.पी. डिपार्टमेन्ट त्यांना एन.ओ.सी. देत नाही. एन.ओ.सी. न देण्याचे काय कारण आहे? चक्कीवाल्यांना उत्पन्न का मिळत नाही? दुसऱ्या डिपार्टमेन्टला एन.ओ.सी. चे काम दिले तर रू. ७०००/- उत्पन्न होईल.

**गजानन भोईर :-**

चक्कीला एन.ओ.सी. देताना काय अटीशर्ती आहेत?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

चक्कीला एक एन.ओ.सी. देताना संबंधित भागातील जे रहिवासी आहेत. त्यांची एन.ओ.सी. आवश्यक आहे आणि कमीत कमी तो रेसीडेन्शीयल एरिया पाहिजे. जर इंडस्ट्रीलयल एरिया असेल तर चक्कीला एन.ओ.सी. द्यायला प्रॉब्लेम निर्माण होणार नाही. परंतु, चक्कीला एन.ओ.सी. देताना आजुबाजुचा रेसीडेन्शीयल एरिया असणे आवश्यक आहे. म्हणजेच त्या चक्कीला आजुबाजुंच्या रहिवाश्यांनी संमती देणे आवश्यक आहे.

**कैलासबेन जानी :-**

साहेब, आजुबाजुच्या बिल्डीगने बऱ्याच चक्कीच्या एन.ओ.सी. दिलेल्या आहेत.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

पूर्वी चक्कींना एन. ओ. सी. दिलेल्या आहेत. ही वेगळी गोष्ट आहे. परंतु, या भागामध्ये मिरची कांडप चक्की वगैरे आहेत.

**गजानन भोईर :-**

चक्कीबाबत बांधकाम विभागाचे काही निकष आहेत का?

**कैलासबेन जानी :-**

चक्कीसाठी बांधकाम विभागाचे काही निकष आहेत का?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

चक्कीला एन.ओ.सी. देण्याबाबत शासनाचे काहीतरी धोरण आहे. शिवाय, शासनाचे परिपत्रक आहे. त्याची कॉपी संबंधित विभागाला देण्यात येईल.

**दिलिप घेवारे :-**

विषय असा आहे की तो गाळा कोपऱ्यातील असावा.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

हा गाळा एका साईडचा असावा.

**गजानन भोईर :-**

जर मधला गाळा असला तरी त्याच्यावर बांधकाम नाही.

**दिलिप घेवारे :-**

मधला गाळा असल्यामुळे लोक अफेक्टेड होतात. बाजुचे दोन आहेत ते आपल्या अधिकारात दिलेले आहेत. ते बघायला अधिकारी येतील.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

तुम्ही गाळ्यांच्या कामकाजाची कॉपी मागवून घेऊ शकता.

**कैलासबेन जानी :-**

जर गाळ्याच्या एन.ओ.सी.चे काम बांधकाम विभागाकडून होत नसेल तर दुसऱ्या डिपार्टमेन्टकडून होऊ द्या. आपले रु. ७०००/- उत्पन्न दुसऱ्याला कशाला द्यायचे.

**मोहन पाटील :-**

अशाप्रकारच्या मधल्या गाळ्यांची एन.ओ.सी. देऊ नये असे करा.

**केशव घरत :-**

साहेब, माझा एक प्रश्न आहे. मा. श्री. घेवारे साहेबांना इच्छितो की घोडबंदरजवळ संन्यादेवी मंदिर जवळ, मोबन मिल कॉलनीजवळ एका हॉटेलचे बांधकाम सुरु आहे. त्याने पूर्ण परवानगी घेतलेली आहे का? दुसरा प्रश्न असा आहे की वर्सोवा येथे हॉटेल एक्स्प्रेस इनच्या मागे इमारतीचे काम सुरु आहे. तो भाग सी.आर.झेड. बाधीत आहे का? आणि त्या लोकांनी परमिशन घेतलेली आहे का? याचे मला उत्तर द्या. जर त्यांनी तुम्हाला परमिशन दिलेली असेल तर तुम्ही आम्हाला लेखी उत्तर द्या.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

तुम्ही यांना लेखी उत्तर द्या. ५६० फ्लॅट आहे. अशी एक बिल्डींग आहे की त्या बिल्डींगला टॅक्स लागलेला नाही असे मा. सभापती साहेबांचे म्हणणे आहे आणि आपण त्यांना टॅक्स लावलेला आहे असे लिहून दिलेले आहे. शिवाय, आपले त्या ठिकाणी फार मोठे आर्थिक नुकसान होत आहे.

**विजय पाटील :-**

काल मा. सभापती साहेबांनी माझ्याकडे फाईल पाठवली. परंतु, जेव्हा माझ्याकडे फाईल पाठवली तेव्हा त्याला 'कराची आकारणी झालेली नाही' असे लिहून दिलेले होते आणि आता व्हायटिंग लावून खाडाखोड करुन 'आहे' असे लिहलेले आहे. परंतु, ही चुक आमच्या डिपार्टमेन्टमधून झालेली नाही.

**प्रभात पाटील :-**

मग ही चुक कोणत्या डिपार्टमेन्टकडून झालेली आहे?

**विजय पाटील :-**

ही फाईल आमच्या डिपार्टमेन्टकडून दुसऱ्या डिपार्टमेन्टकडे जाते.

**एस. ए. खान :-**

तुम्ही 'नाही' लिहीले आणि त्या लोकांनी व्हायटिंग लावून 'आहे' केलेले आहे का?

**विजय पाटील :-**

आम्ही 'नाही' लिहलेले आहे आणि त्या ठिकाणी खाडाखोड करुन 'आहे' असे लिहलेले आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

श्री. विजय पाटील साहेब, आपण खाडाखोड केलेली आहे की दुसऱ्या डिपार्टमेन्टने खाडाखोड केलेली आहे ते सांगा.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

त्या पिरीयडला किती टॅक्स लागलेला होता?

**विजय पाटील :-**

ती खाडाखोड कोणी केलेली आहे? ते मी सांगू शकत नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, त्या रिपोर्टची एक प्रत तुमच्या विभागाकडे असते आणि दुसरी प्रत दुसऱ्या संबंधित विभागाकडे असते.

**विजय पाटील :-**

त्याच्याकडे त्या प्रतची झेरॉक्स कॉपी आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

दोन्ही प्रतीपैकी कुठल्या प्रतीवर खाडाखोड झालेली आहे ते बघावे लागेल.

**केशव घरत :-**

दोन्ही प्रतीपैकी कुठली प्रत खोडलेली आहे ते बघुन घ्या.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपण एक प्रत ओ.सी. म्हणून संबंधित विभागाला देतो आणि दुसरी प्रत आपल्याकडे असते.

**विजय पाटील :-**

ही सगळी खाडाखोड पाण्याच्या फॉर्मवर झालेली आहे. ते वाक्य असे आहे की 'सदर इमारतीस कर आकारणी झालेली नाही' आणि खोडून 'आहे' केलेले आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

हा फॉर्म कुठून आलेला आहे?

**विजय पाटील :-**

हा फॉर्म प्रभाग कार्यालयामधून झालेला आहे आणि मी सही केलेली आहे. काल मा. सभापती साहेबांनी जे दाखवलेले आहे. त्याच्यामध्ये 'नाही' त्या जागेवर 'आहे' केलेले आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपल्याला तो फॉर्म बघावा लागेल.

**केशव घरत :-**

तुमच्याकडे सदर फॉर्मची एक प्रत असेल.

**विजय पाटील :-**

आमच्याकडे या फॉर्मची प्रत येत नाही. आम्ही एवढ्या फाईल घेतो. परंतु, त्याचे जसे ओरिजनल असतील तर ते तसेच परत देतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

हॅन्ड राईटिंग बघा. मग कळेल.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तुम्ही हे तात्काळ बघा.

**गजानन भोईर :-**

व्हायटिंग लावून 'नाही'चे 'आहे' केलेले आहे.

**रतन पाटील :-**

साहेब, त्या व्यक्तीने भोगवटा दाखला घेतलेला आहे का? ते बघा.

**गजानन भोईर :-**

'ध'चा 'मा' केलेला आहे ना.

**रतन पाटील :-**

साहेब, हे कोणी केलेले आहे? 'नाही' चे 'आहे' आपल्या अधिकाऱ्यांकडून झालेले आहे की दुसऱ्या कोणी केलेले आहे? ते सांगा. शिवाय, त्याला भोगवटा दाखला लावलेला आहे का?

**प्रेमनाथ पाटील :-**

आपण त्या माणसाला पाण्याचे कनेक्शन दिलेले आहे का?

**विजय पाटील :-**

त्या व्यक्तीला पाण्याचे कनेक्शन दिलेले नाही.

**गजानन भोईर :-**

याचा अर्थ आता हे काम प्रोसिजरप्रमाणे चालणार होते आणि मध्येच अडवलेले आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपण त्या इमारतीला ॲमिनिटीज देतो. तिथे टॅक्स आकारणी केली पाहिजे हा प्रिन्सीपल रुल आहे. हे प्रस्ताव पाणीपुरवठ्यासाठी आहेत. गौरव रेसिडियन्सी रवि ग्रुप येथील तीन फाईल्स आहेत आणि त्या नळ कनेक्शनबाबतच्या संचिका आहेत. त्याच्यासाठी जे कर आवश्यक प्रमाणपत्र लागते. ते कर विभागाचे प्रमाणपत्र थोडे शंका ओरिएन्टेड आहे. त्याच्यामध्ये शंका असल्यामुळे हा विषय सभापती थ्रु घेतलेला आहे.

**गजानन भोईर :-**

तुम्ही बोलता की या चार फाईल आहेत. मग या महानगरपालिकेत चारच फाईल आहेत का?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

महानगरपालिकेत चार फाईल्स असल्याची कोणीच खात्री देऊ शकत नाही. त्या तारखेला टॅक्स लागलेले होते की नव्हते याची खात्री करून घ्यावे लागेल संबंधित माणूस रिपोर्ट घेऊन येईल तेव्हा हे नळ कनेक्शनचे अर्ज कार्यालयाला सबमिट केलेले आहेत का? ते माहिती पडेल.

**मोहन पाटील :-**

त्या अर्जावर अधिकाऱ्याची सही आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

प्रमाणपत्र घेणे हा एक वेगळा भाग आहे. परंतु, श्री. विजय पाटील यांच्या फॉर्मवर 'नाही'चे 'आहे' करणे ही गोष्ट खरे पाहता गांर्भीयाची आहे. याच्यावर कोणाचाही मसुदा नाही किंवा इनवर्ड नंबर नाही.

**मोहन पाटील :-**

याच्यावर इनवर्ड नंबर आहे की नाही याच्यावर चर्चा केली तर तुम्ही गोत्यात याल. इनवर्ड आणि आऊटवर्ड नंबर बाजुला ठेवा. परंतु, या लेटरवर अधिका-याची सही झाली नाही. याचा अर्थ त्याच्यामध्ये काहीतरी गौडबंगाल आहे. तुम्ही इनवर्ड, आऊटवर्ड नंबर मधे आणू नका. ही काय प्रायव्हेट एजन्सी नाही.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

याच्यावर अधिका-यांची सही झालेली आहे का?

**एस. ए. खान :-**

या लेटरवर अधिका-याची सही झालेली आहे.

**जयंत पाटील :-**

जर इनवर्ड केलेले आहे की नाही हे माहिती पडले नसते तर इनवर्ड झाले असते.

**मोहन पाटील :-**

या लेटरवर संबंधित अधिका-याची सही झालेली आहे. तो अधिकारी या ठिकाणी कार्यरत आहे. त्या अधिका-याने रिझाइन दिले किंवा राजीनामा दिला किंवा राजीनामा मंजुर झाला वगैरेसारखा विषय येत नाही. तो अधिकारी या ठिकाणी कार्यरत आहे. याच्यापूर्वी ज्या अधिका-याने चुक केलेली आहे त्या अधिका-यावर काय कार्यवाही केली?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

या पत्रामध्ये इनवर्ड नंबरसुध्दा दिलेला आहे.

**गजानन भोईर :-**

तुम्ही याबाबत योग्य ते उत्तर द्या.

**मोहन पाटील :-**

तुम्ही या लेटरमध्ये सुधारणा केलेली आहे असा याचा अर्थ होतो.

**विजय पाटील :-**

आम्ही या लेटरमध्ये सुधारणा केलेली नाही.

**मोहन पाटील :-**

मग तुम्ही आता काहीतरी नाहीच आहे असे बोलतात.

**विजय पाटील :-**

त्या सदर इमारतीस कर आकारणी झालेली नाही असा मी शेरा दिलेला आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

'नाही' असा शेरा असताना 'आहे' असे केलेले आहे.

**विजय पाटील :-**

'आहे' हा शब्द मालकाने टाकलेला आहे की अन्य कोणत्या व्यक्तीने टाकलेला आहे हे मी कसे सांगू शकणार?

**प्रेमनाथ पाटील :-**

'आहे' 'नाही' केले तरी फाईल तुमच्याकडेच राहणार आहे.

**रतन पाटील :-**

ती फाईल तुमच्याकडून दुस-याकडे कशी गेली? तुम्ही 'नाही'चे 'आहे' केले मग फाईल तुमच्याकडून दुसरीकडे कुठे गेली? ते सांगा.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

ती फाईल पाणी विभागाकडे गेल्यानंतर तुमच्याकडे आली का?

**विजय पाटील :-**

ती फाईल पाणी विभागाकडून माझ्याकडे आली. परंतु, कधी-कधी माझ्याकडे टाऊन प्लानिंग विभागाकडून फाईल येते आणि कधी-कधी पाणीपुरवठा विभागाकडून येते. नंतर ती फाईल पुन्हा पाणीपुरवठा विभागाकडून संबंधित कर्मचारी किंवा नळ कनेक्शन देणारा माणूस किंवा नळ कनेक्शन देणारा बिल्डर असेल तर तो घेऊन जातो.

**प्रेमनाथ पाटील :-**

तुम्ही एक गोष्ट क्लीअर करा की तुमचा रिमार्क झाल्यानंतर शिपाई फाईल घेऊन जातो की ओनर फाईल घेऊन जातो ते सांगा.

**विजय पाटील :-**

ओनरसुध्दा फाईल घेऊन जातो आणि शिपाईसुध्दा फाईल घेऊन जातो. माझ्याकडे फाईल आली तेव्हा मी 'नाही' असा रिमार्क दिलेला होता. परंतु, नंतर कोणीतरी 'आहे' असे केलेले आहे.

**मिलन पाटील :-**

मग तुम्ही एफ.आय.आर. दाखल करा.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो.) :-**

सर्वप्रथम तो टॅक्स लागलेला आहे की नाही ते चेक करा.

**मिलन पाटील :-**

तुम्ही एफ.आय.आर. दाखल करण्याचे रुलिंग द्या.

**मा. सभापती :-**

एका विषयावरुन अनेक घटना घडल्या असतील. आपण सभेमध्ये हसुनखेळून वागतो. परंतु, महानगरपालिकेत करोडो रुपयांचे नुकसान झालेले आहे. याची मला खंत वाटते. आपण रु. ५०,०००/- वगैरेसाठी भांडतो. परंतु, करोडो रुपयाचे नुकसान झाले त्याचे काय? जेव्हा माझ्याकडे तिकडची लोक आमच्याकडे पाणी नाही अशी तक्रार घेऊन आले तर आम्ही म्हटले की तुम्ही पैसे भरलेले आहे का? तर ती लोक बोलली की आम्ही बिल्डरकडे पैसे भरलेले आहेत. विकासकर्ता बोलला की मी सर्व पैसे म्युनिसिपाल्टीकडे पैसे भरलेले आहेत, पैसे भरलेले नव्हते. तो खोटे बोलला होता. मी पाणी विभागातुन पाण्याच्या फाईल मागितल्यावर पाण्याच्या किती फाईल पेन्डिग होत्या ते विचारले तेव्हा चार फाईल पेन्डिग असल्याचे कळेल. मी विचारले की तुम्ही पैसे भरलेले आहेत का? तर त्या लोकांनी पैसे भरलेले नसल्याचे सांगितले मी त्यांना टॅक्स भरला का? असे विचारले तर त्यांनी टॅक्स न भरल्याचे सांगितले मग त्या लोकांनी सांगितले की टॅक्स भरणार नाही. टॅक्स भरायचा असेल तर मी कायद्याने चालणारा माणूस आहे. मी त्या फाईल उघडलेल्या बघितल्यावर लॉक करुन ठेवलेल्या होत्या. मला विषय माहिती पडला नसता. असे करोडो रुपयाचे जे नुकसान झालेले आहे. त्याचे काय करणार? मी तर बोलतो की तुम्ही सगळ्या अधिकाऱ्यांना सस्पेन्ड करा.

**केशव घरत :-**

शेवटी निर्णय तुम्हाला घ्यायचा आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

ह्याच्या आधी किती तरी फाईल अशाच पडलेल्या असतील. आता ह्या फाईल ह्यांच्याकडे आल्या म्हणून बघायला मिळाल्या.

**गजानन भोईर :-**

कर आकारणीमध्ये श्री. विजय पाटील स्वतः गेलेले आहेत. कर आकारणीला फाईल गेलेली नाही. स्वतः गेलेले होते आणि त्यानी स्वतःच्या हॅन्ड राईटिंगमध्ये लिहलेले आहे. वर फॉर्म भरलेले अक्षर खाली आहे.

**मिलन पाटील :-**

तुम्ही यांच्या विरुध्द एफ.आर.आय. दाखल करा.

**मा. सभापती :-**

मी या फाईल संदर्भात सांगू इच्छितो की तुम्ही या फाईलची संपूर्णपणे शहनिशा करा. जर काही आढळले तर गुन्हा दाखल करा आणि ह्याच्यामध्ये जो कोणी अधिकारी दोषी आढळेल त्याच्यावर कायदेशीर कार्यवाही करा.

**मिलन पाटील :-**

मा. सभापती साहेबांनी कुठली फाईल आहे? फाईलवर कोणाचे नाव आहे? हे सगळे लेखी स्वरुपात स्वतःजवळ ठेवा. तुमच्याकडे याचा रेकॉर्ड पाहिजे. तुम्ही फाईल तुमच्याकडे ठेवून त्याचा रेकॉर्ड ठेवा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

एखाद्या इमारतीचे लोक नळ कनेक्शन लावण्यासाठी संबंधित नगरसेवकाकडे गेले आणि सांगितले की तुम्ही आमच्या बिल्डींगला नळ कनेक्शन लावून द्या. तर तो नगरसेवक पाणी खात्याकडे जातो. त्या नगरसेवकाकडून काहीही कार्यवाही होत नाही. हे पाहिजे, ते पाहिजे असे सांगितले जाते. शेवटी तो माणूस थकतो आणि एखादा दलाल ते काम करुन देतो. मग ती लोक बोलतात की आम्ही हे काम करुन आणले.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, असे अनेक डिपार्टमेन्टमध्ये घडत आहे.

**केशव घरत :-**

प्रत्येक डिपार्टमेन्टमध्ये असे घडत आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

एखाद्या नगरसेवकाकडून काम होत नाही आणि एखाद्या दलालाकडून काम होते हे फॅक्ट आहे. अतिक्रमण विभागाकडेसुध्दा तसेच आहे. जर एखाद्या नगरसेवकाचा गाळा असेल तर तो गाळा तोडला जातो आणि एखाद्या दलालाचा गाळा असेल तर तो गाळा बांधला जातो असे प्रुफ करुन दिले तर काय कराल?

**प्रभात पाटील :-**

टॅक्स डिपार्टमेन्टला घरपट्टीबाबत नगरसेवकांची कामे बिलकुल होत नाहीत. मला एकाने सांगावे की टॅक्स डिपार्टमेन्टला ज्या कोणी नगरसेवकाचे काम होत असेल तर त्याने मला सांगावे. मी या ठिकाणी पंधरा वर्षापासून नगरसेविका पदावर कार्यरत आहे. टॅक्स डिपार्टमेन्टला नगरसेवकांचे काम होत नाही. तिथे दलालांचे काम चालते.

**प्रेमनाथ पाटील :-**

टॅक्स डिपार्टमेन्टला एन.ओ.सी. सुध्दा मिळत नाही.

**प्रभात पाटील :-**

इथे श्री. खतगावकर साहेब ऐकून तरी घेतात.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

श्री. खतगावकर साहेब, तुम्ही इथे ऐकून घ्या.

**मिलन पाटील :-**

माझा स्वतःचा गाळा आहे. मी हा गाळा भाईंदर पूर्वेला विकत घेतलेला आहे. माझे एकाकडे पैसे बाकी होते. मला त्याने शिवाय गाळा दिला नगरपालिकेच्या एन.ओ.सी. होत नाहीत. माझ्या गाळ्यानंतर पंचविस गाळ्यांना लाईट लागली. फक्त माझ्या गाळ्याला नगरपालिकेची एन.ओ.सी. बंद केलेली आहे. आमच्या नगरसेवकांसाठी असा कायदा असेल तर मी गाळा तसाच्या तसा टाळे लावून बंद ठेवेन. मग मी भाडे देऊ शकत नाही की दुसरे काही करु शकत नाही. माझ्या गाळ्याच्या नंतरच्या सर्व गाळ्यांना एन.ओ.सी. आहे आणि त्यांना पटापट लाईट मिळतात.

**प्रेमनाथ पाटील :-**

श्री. खतगावकर साहेब, मला अतिक्रमणबाबत उत्तर मिळालेले नाही.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

तुम्हाला अतिक्रमणबाबत उत्तर दिले जाईल.

**प्रेमनाथ पाटील :-**

तुम्ही अतिक्रमणबाबत कधी उत्तर देणार आहात.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

अतिक्रमणबाबत नंतर उत्तर देण्यात येईल.

**प्रेमनाथ पाटील :-**

जोपर्यंत अतिक्रमणबाबत उत्तर दिले जाणार नाही तोपर्यंत पुढची सभा चालू केली जाणार नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही ज्या माणसाला जबाबदारी देता त्या माणसाने जबाबदारी पार पाडणे त्याचे कर्तव्य आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

आज सभागृहामध्ये जी परिस्थिती निर्माण झालेली आहे. त्याची माहिती घेऊन येणे आवश्यक आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

श्री. खतगावकर साहेब, आज तुम्ही तुमचे डिपार्टमेन्ट सांभाळता. तुम्ही ते डिपार्टमेन्ट सांभाळायला लायबल आहात. परंतु, तो माणूस अतिक्रमण विभागाचा इन्चार्ज आहे. तो माणूस रोज त्या रस्त्याने जातो. त्याला हे इललिगल चालू आहे. कारण इथे सर्व्हिस रोड आहे हे त्या माणसाला माहिती आहे तरीसुध्दा तो माणूस कार्यवाही करित नाही. याचा अर्थ काय आहे? याचा अर्थ तो माणूस जबाबदारी सांभाळायला कॅपेबल नाही असा होतो. साहेब, त्या माणसाचे भांडारपाल असतानाचे डायऱ्या वगैरेचे प्रकरण मी बाहेर काढणार आहे. हा माणूस डिपार्टमेन्ट सांभाळण्यासाठी लायक नाही. मी या ठिकाणी असा ठराव मांडले की अतिक्रमण विभागाचे इन्चार्ज श्री. संजय तायशेट्ये यांना तुम्ही दुसरे डिपार्टमेन्ट सांभाळण्यासाठी द्या असा मी ठराव मांडत आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

त्यांचे अधिकार आहेत. ते त्या अधिकारांचे पालन करतात.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, आपल्या कमिटीचे अधिकार नाहीत का? आपल्या कमिटीच्या मेंबरने इथे अतिक्रमणचा सुळसुळाट होतो असे दाखवून दिलेले आहे आणि तुम्ही त्या गोष्टीवर ॲक्शन घेत नाही हे चुकीचे चाललेले आहे. आम्ही तुम्हाला सांगतो की या ठिकाणी इललिगल कन्स्ट्रक्शन चालू आहे. आम्ही कमिटी मेंबर असूनसुद्धा तुम्ही त्याबाबत ॲक्शन घेत नाहीत आणि तुम्ही आम्हाला असे सांगता. तुम्ही कॅपेबल नसेल तर त्याबाबत निर्णय घेण्याचा मा. आयुक्त साहेबांचा अधिकार आहे. मग स्थायी समितीच्या सन्मा. सदस्यांच्या एखादे डिपार्टमेन्ट बदली करण्याबाबत अधिकार नाही का?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

इथे मांडलेले जे मुद्दे आहेत त्या अनुषंगाने त्या विभागाची जी काही प्रतिक्रिया असेल या ठिकाणी त्या प्रतिक्रियेवर चर्चा होणे आवश्यक आहे. त्या अधिकाऱ्याची जी काही प्रतिक्रिया असेल किंवा मत असेल ते त्याने येणाऱ्या सभेत वापर करावे.

**प्रेमनाथ पाटील :-**

तुम्ही त्या अधिकाऱ्याचे मत येणाऱ्या सभेत सादर करा. परंतु, तोपर्यंत गाळे उंच झालेले असतील. त्या गाळ्यांना पत्रे लागलेले असतील. ती कंपनी चालू झालेली असेल.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ह्याच्यामध्ये असे बांधकाम न होण्याबाबत सुचना दिलेल्या आहेत.

**प्रेमनाथ पाटील :-**

ते बांधकाम झाले की नाही याबाबत पुढच्या मिटींगला निर्णय द्या.

**मा. उपायुक्त (मु.) सो. :-**

आपल्याला अहवाल दिल्यानंतर आपण काय तो निर्णय घेउया.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

परंतु, हा अहवाल कधी मिळेल?

**मा. उपायुक्त (मु.) सो. :-**

हा अहवाल पुढच्या मिटींगला मिळेल.

**प्रेमनाथ पाटील :-**

प्रत्येक गाळेधारकाकडून गाळा विक्री करायचा असेल तर प्रति स्क्वेअर फुट रू. १०० असे घेतले जातात. ही एक रियल गंमत आहे. आम्हाला याबाबत ऑब्जेक्शन नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

त्या लोकांनी बिनधास्त कमावले तर आमचे त्याबद्दल काहीही ऑब्जेक्शन नाही.

**मा. उपायुक्त (मु.) सो. :-**

त्याठिकाणी नवीन कामे होऊ द्यायची नाहीत. याबाबत आपण महासभेत धोरणात्मक निर्णय घेतलेला होता. ती त्यांची जबाबदारी होती.

**मोहन पाटील :-**

आपल्याकडे एकूण ७९ नगरसेवक आहेत. जर तुमचा त्याबाबत अधिकार येत असेल तर तुम्ही त्यांना संपूर्ण अधिकार द्या.

**गजानन भोईर :-**

ज्यांनी रू. १०००/- घेउन गाळ्यासाठी परमिशन दिलेली आहे त्यांचे काय करायचे?

**प्रेमनाथ पाटील :-**

माझ्या माहितीप्रमाणे रू. १०००/- देउन गाळ्यांसाठी परमिशन दिलेली नाही.

**केशव घरत :-**

हजार रूपये देउन गाळ्यांना परमिशन देण्याचे धोरण कोणी ठरविले? आपण इथे घेतलेल्या ठरावावर कार्यवाही झालेली नाही.

**गजानन भोईर :-**

माझ्या माहितीप्रमाणे या गाळेधारकांच्या पावत्या फाडलेल्या आहेत याचा अर्थ त्या गाळे धारकांना परमिशन देतात असा झाला.

**केशव घरत :-**

श्री. खतगावकरसाहेब, तुम्ही सांगता की ठराव झालेला नाही. मग हजार रूपये देउन परमिशन घेतात त्याच्यावर कार्यवाही का करत नाही?

**गजानन भोईर :-**

तुम्ही आताच्या आता पावती बूक मागवा. म्हणजे आताच समजेल.

**केशव घरत :-**

परंतु, अशी परमिशन घेणाऱ्या लोकांना असे अधिकार कोणी दिले?

**एस. ए. खान :-**

आपण मागच्या वेळेला टेम्पो पार्किंगबाबत विषय घेतलेला होता. त्या विषयाची अंमलबजावणी झालेली नाही. कुठली टोईंग गाडी घेतली त्याचा काहीही पत्ता नाही.

**रतन पाटील :-**

साहेब, याठिकाणी एक एक विषय घ्या. सुभाषचंद्र बोस मैदानाच्या बाजूला असणाऱ्या झोपडपट्टयां संदर्भात काय कार्यवाही करण्यात आली ते सांगा. त्या कार्यवाहीचे काम होऊन जाऊ द्या.

**प्रभात पाटील :-**

मागच्या वेळेला गाई बाबत विषय आलेला होता. त्या गाईंचे काय झाले?

**रतन पाटील :-**

साहेब, त्याच्यावर कार्यवाही होणार आहे का?

**एस. ए. खान :-**

तुम्ही फक्त बोलता. परंतु, कार्यवाही मात्र होत नाही.

**रतन पाटील :-**

श्री. खतगांवकर साहेब, आज मिरा भाईंदर, बी.पी. रोड, नवघर रोडचे जे फुटपाथ केलेले आहे. त्याच्यावरून चालायला मिळत नाही. तूम्ही आम्हाला सांगा की, त्याच्यावर कार्यवाही होईल की नाही. नाहीतर

आम्ही सभात्याग करून निघून जातो तुम्ही सभा तहकूबीची सुचना मांडा. आम्ही दुसरे काहीही सांगत नाही. तिथे अजुन पर्यंत काहीही कार्यवाही होत नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, बी.पी. रोडला भरपूर गर्दी असते.

**रतन पाटील :-**

आम्ही तिथे कसे राहतो ते आम्हाला माहिती आहे. संपूर्ण रस्ता ब्लॉक झालेला आहे. मग आम्ही कूठून जायचे ते सांगा. तुम्ही त्या ठिकाणी कार्यवाही का करत नाही? तुम्हाला कार्यवाही करण्याबाबत कोणी अडवले का? तुम्ही ठोस कार्यवाही करायला पाहिजे. तुम्ही त्याठिकाणी कसलीही कार्यवाही करित नाही. ह्या सगळ्यावर निर्णय होण्यासाठी आम्ही सभात्याग करतो. आपण हे सगळे कशासाठी करतो? अतिक्रमण विभागचे काय काम आहे? ते सांगा. संपूर्ण मिराभाईंदर मध्ये ठोसपणे असे अतिक्रमण चाललेले आहे. परंतू, काहीही कार्यवाही होत नाही. साहेब, तुम्ही निर्णय घेत असाल तर आम्ही बसतो. अन्यथा, आम्ही सभात्याग करतो.

**जयंत पाटील :-**

सन्मा. नगरसेवक जीव तोडून बोलत आहेत. त्यांचा त्याच्यामागे काहीही स्वार्थ नाही. नवघर रोड, बी.पी. रोड, हे सगळे गच्च झालेले आहेत. तुम्ही तिथे संध्याकाळी या. तुम्ही त्या रोडवरील अतिक्रमण का उचलत नाहीत? ना फेरीवाला क्षेत्रामध्ये खुप वर्षापासून फेरीवाले वगैरे बसतात. आपण ठेकेदार नेमला त्याला दाद देत नाही. ह्या लोकांची एवढी दादागीरी आहे की ही लोकं महापालिकेला विचारत नाही. तुम्ही ह्याच्यावर निर्णय घेणार आहात की नाही म्हणून मी मघाशी बोललो की तुम्ही तुमचा अतिक्रमण विभाग काढून टाका.

**प्रभात पाटील :-**

तूम्ही खरच अतिक्रमण विभाग काढून टाका. राई, मोर्व्याला जायचे झाले तर मला स्वतःच्या मुलाला एकदा तरी गाडी पुढे गेली तर मी माझ्या मुलाला सांगते की या गाडीचा स्पीड २० वर आण. या गाडीच्या खाली कोण गेले तर आपल्याला बेड्या पडतील. पालिकेला काहीही होणार नाही. कारण तिकडे झोपड्यातील मुले एकदम वेडी वाकडी धावत असतात.

**रतन पाटील :-**

महासभेला अशा झोपड्या काढल्या जातील असे सांगितलेले होते.

**प्रभात पाटील :-**

मी स्वतःचे मूल एवढ्यासाठी बोलले की तरूण मूले स्पीडने गाडी चालवत असतात. त्यांना आई - वडील असतील तर ब्रेक लावायला लागतो. त्या मुलांना ती गाडी हळू म्हणजे २० च्या स्पीडने चालव असे सांगावे लागते.

**गजानन भोईर :-**

तरूण मुलांचे काय? मोठी माणसेसुद्धा पडतात.

**प्रभात पाटील :-**

त्याठिकाणी पडायची गोष्ट उद्‌भवत नाही. आपल्या गाडीखाली कोणी आले तर खरे म्हणजे आपल्याला बेड्या पडतील.

**केशव घरत :-**

रस्ता नेहमी ओला असतो.

**प्रभात पाटील :-**

रस्ता ओला असणे ही वेगळी गोष्ट आहे. परंतु, आपल्याला बेडया पडतील.

**रतन पाटील :-**

तिथे कपडे वगैरे सुकत असतात.

**मिलन पाटील :-**

आपण लाखो रूपये खर्च करून जाळ्या टाकलेल्या आहेत त्याचा काहीही उपयोग नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

ते सर्व काही रस्त्यावर पडलेले आहे.

**प्रभात पाटील :-**

अपघात वगैरे झाला तर आपल्याला तुरूंगवास सोसावा लागेल.

**प्रेमनाथ पाटील :-**

शुक्रवारी एक गंमत झाली. संध्याकाळी ७ ते ७.३० वा. अतिक्रमणाची गाडी रस्त्यावरील फेरीवाले वगैरे उचलायला आली. मी त्यावेळेला डॉ. दोशी यांच्या हॉस्पीटल कडे उभा होतो. आपले कर्मचारी त्या गाडीतून आले. ते फेरीवाले बोलायला लागले की सब सामान अंदर लो अतिक्रमण की गाडी आ रही है। विचारले काय झाले? असे मी त्यांना विचारले. ते बोलले की जे रस्त्यावर ट्रॅफीक जॅम झालेले आहे ते हटविण्याचे काम चालू आहे. नंतर मागून अतिक्रमणची गाडी येते म्हणून अंदर जाओ असे ते ओरडत होते. नंतर रस्त्यावर गाडी येते

म्हणून त्या सगळयांना हटविण्यात आले. म्हणजे विचार करा की गाडी येण्यापूर्वी सगळे पळतात आणि गाडी आल्यावर कोणी भेटत नाही. गाडी पास झाली की ते परत बसतात.

**प्रभात पाटील :-**

साहेब, माझे ऑफीस आहे. त्या गल्लीत गाडी शिरायला लागल्या तेव्हा मी त्या दिवशी खाली उतरली तर तिथे भेलपूरी , आईसस्क्रीम पासून सर्व गाड्या लावलेल्या होत्या. तुम्ही ती गल्ली बघा मला जरा शंका आली म्हणून मी खाली उतरली. मी गाडीवाल्यांना विचारले की काय झाले? तर म्युनिसिपाल्टी की गाडी आ रही है असे ते बोलले. मी म्हटल की म्युनिसिपाल्टीकी गाडी किधर है? तर ते बोलले की हम लोगोको म्यूनिसिपाल्टी की गाडी आनेवाली है ऐसा मॅसेज आया था। अब गाडी आ रही है।

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आज सगळ्या सदस्यांचा जोर अतिक्रमणवर आहे म्हणजे काहीतरी प्रॉब्लेम असेल म्हणून बोलत असतील. आज या ठिकाणी एवढे अधिकारी बसलेले आहेत. परंतू, कोणावर रोष नाही. मग फक्त अतिक्रमाणवर रोष का?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

मी मा. आयुक्तसाहेबांकडे वस्तूस्थिती मांडलेली आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही वस्तुस्थिती मांडून त्यांच्यावर काय ॲक्शन घेतली? ती सांगा.

**केशव घरत :-**

जर आपले अधिकारी अकार्यक्षम असतील तर तुम्ही तशा अधिकाऱ्यांना निलंबित करा. अशा अधिकाऱ्यांवर ठोस कार्यवाही झाली पाहिजे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

श्री. शिवमुर्ती नाईक साहेबांच्या कारकीर्दीत श्री. संजय तायशेट्टे डॅशिंग होते. मग आता थंड का झाले? आता अतिक्रमणचा सुळसुळाट वाढलेला आहे. फेरीवाल्यांवर कार्यवाही होत नाही. गाळे झालेले आहे?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

आज सभेत आलेल्या विषयांवर लगेच कार्यवाही करण्यात यावी.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, तुम्ही बोलले होते की आम्ही तुम्हाला पुढच्या मिटिंगला सविस्तर माहिती देउ.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

साहेबांनी तुम्हाला अहवाल देण्याचे कमिटमेन्ट केलेले आहे. त्यामुळे साहेब अहवाल देतील.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

परंतु, मी जो ठराव मांडला त्या ठरावाचे काय?

**मोहन पाटील :-**

आपल्याला असा ठराव मांडता येत नाही. तुम्ही सभेला काय ठराव मांडता?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

या ठिकाणी ठराव येउ शकत नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आपण एवढे मोठे ठराव मांडत असतो.

**मा. सभापती :-**

आपल्याला तो विषय घ्यावा लागेल म्हणून ठराव न मांडता सुचना करा.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपण कुठल्याही अधिकाऱ्यावर कार्यवाही करतो. आपल्याला आता कार्यवाही करण्याचा मोठा चान्स मिळालेला आहे तर कार्यवाही करा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. सभापतीसाहेब, तुम्ही त्याच्यावर कार्यवाही केली पाहिजे. माझ्या मते तुम्ही एक तरी कार्यवाही करा.

**मोहन पाटील :-**

आम्ही तुमच्या ताब्यात फाईल दिलेली आहे.

**केशव घरत :-**

मा. सभापती महोदय, तुम्ही तुमच्या कारकीर्दित एकतरी कार्यवाही करा. मी शिक्षण अधिकाऱ्यांना प्रश्न विचारू इच्छितो की सर्व शिक्षा अभियान अंतर्गत वह्यांचे जे काही वाटप झालेले होते. ते आतापर्यंत का झालेले नाही. आजपर्यंत पुस्तके आलेली नाहीत का?

**प्रेमनाथ पाटील :-**

आता शाळा चालू झालेली आहे. तर त्या विद्यार्थ्यांना ड्रेस मिळालेले आहेत का?

**केशव घरत :-**

महापालिकेच्या विद्यार्थ्यांना युनिफॉर्म मिळालेले नाहीत.

**मिलन पाटील :-**

मार्च महिन्यामध्ये युनिफॉर्म बाबतचा ठराव झालेला होता.

**मोहन पाटील :-**

आपले जेवढे अधिकारी आहेत त्यांना आणि शिक्षण अधिका-यांना याठिकाणी बोलवा. शिक्षण मंडळ स्थापन झाल्यानंतर जे सर्व अधिकारी आहेत. त्या शिक्षण अधिका-यांना शाळेच्या विकासापासून शाळेला पुस्तके देण्यापासून, शाळेला ड्रेस देण्यापासून शिक्षण मंडळाची सहाय्यता आहे. ते सर्व काम शिक्षण मंडळाच्या अखत्यारित चालू होणार आहे.

**गजानन भोईर :-**

आपल्याला हे सर्व काही विचारण्याचा अधिकार आहे.

**केशव घरत :-**

विचारायचे नाही असे कसे चालेल.

**प्रेमनाथ पाटील :-**

स्थायी समितीला हे सर्व काही विचारण्याच्या मेन पॉवर्स आहेत.

**मोहन पाटील :-**

मी फक्त शिक्षण मंडळाबाबत बोलत आहे.

**केशव घरत :-**

याठिकाणी शिक्षण मंडळाच्या आर्थिक मंजुरीचा विषय कसा आला?

**मोहन पाटील :-**

याठिकाणी सभापती उपस्थित आहेत.

**प्रेमनाथ पाटील :-**

तुम्ही तो विषय इथे आणू नका.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

तुम्ही त्या त्या प्रभागातील नगरसेवकांना बोलवा. शिक्षण मंडळाचे पदाधिकारी, अधिकारी वगैरेना बोलावून वह्या, पुस्तक ड्रेसचे वाटप करा.

**प्रेमनाथ पाटील :-**

प्रभागातील नगरसेवकांना सुद्धा बोलावून घ्या आणि वाटप करा.

**मोहन पाटील :-**

शिक्षण मंडळाच्या सभेला मी उपस्थित होतो. मी त्यांना त्याबाबत सांगितलेले आहे की जे काही वह्या पुस्तक आणि ड्रेसचे वाटप करणार त्या वेळेला त्या त्या भागातील नगरसेवक आणि शिक्षण मंडळाच्या सदस्यांना एकत्र येऊन तो कार्यक्रम करावा असे त्यांना को-ऑर्डिनेशन करायला सांगितलेले होते. दुसरा विषय असा आलेला होता की शाळेच्या ज्या जागा भाड्याने देतात. ते सर्व अधिकार त्यांच्याकडे आहेत. याठिकाणी जो काही ठराव मांडलेला आहे. त्याची शिफारस इथे पाठवा. शेवटी शिक्षण मंडळाला जी पुर्णपणे मदत लागेल ती मदत या महापालिकेतून करावी लागणार आहे. म्हणून तुम्ही त्याचा समन्वय साधून को-ऑर्डिनेशन मध्ये राहून तुम्ही ते काम केले तर तुम्हाला त्या कामामध्ये पारदर्शकता राहील आणि या सभेचे सहकार्य मिळेल.

**गजानन भोईर :-**

आपण अजून कोणाला पुस्तक वाटप करायचे आहे?

**प्रेमनाथ पाटील :-**

श्री. खतगावकर साहेब, हे लोक शिक्षकांना नविन पुस्तके देतात.

**ए. एस. सुर्यवंशी :-**

महानगरपालिका आणि खाजगी अनुदानित शाळेतील सर्व मुले आणि अनुसुचित जमातिच्या खालील वर्गाच्या मुलांसाठी मोफत पाठ्यपुस्तक वाटप योजना राहिल.

**गजानन भोईर :-**

साहेब, महानगरपालिकेच्या शाळेत जाणारा मुलगा गरिब असतो. तुम्ही त्याची जात वगैरे न बघता सर्वांना पुस्तकाचे वाटप करा.

**प्रेमनाथ पाटील :-**

सर्वांना वह्या पुस्तक व ड्रेसचे वाटप करा.

**गजानन भोईर :-**

मी नवघरच्या शाळेत सर्वांना पुस्तकांचे वाटप केल्याचे बघितलेले आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

मी तुमच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने याठिकाणी असा खुलासा करतो की सर्व शिक्षा अभियानामध्ये विद्यार्थ्यांना जे धोरण आहे. त्याप्रमाणे पुस्तके आलेली आहेत. या विषयाच्या अनुषंगाने दुस-या शिक्षकांशी चर्चा

केलेली आहे. या विद्यार्थ्यांना शासनाकडून हे लागू नाही. परंतु, आपल्या शाळेत ते विद्यार्थी सर्वसामान्यप्रमाणे शिकत आहेत. ते सर्व महापालिका हद्दीतील विद्यार्थी आहेत. आम्ही असे धोरण काढलेले आहे की ज्या विद्यार्थ्यांना ड्रेस दिले जात नाहीत किंवा जे विद्यार्थी नियमात बसत नाहीत. त्यांना महापालिकेतून अंदा करण्यात येईल.

**गजानन भोईर :-**

आपल्याकडे जे रू. १ कोटी आहेत. ते त्यांना द्या.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा.) :-**

आम्ही या सभेत १ कोटीबाबत प्रस्ताव घतलेला आहे.

**गजानन भोईर :-**

आज जे पत्र दिलेले आहे ते पत्र सर्वांना द्या.

**जयंत पाटील :-**

ते सगळे शासनाचे निर्णय आहेत.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा.) :-**

त्यांचे पत्र वेगळे असेल तर त्यांनी प्रस्ताव तयार केलेला आहे.

**मोहन पाटील :-**

आपण ज्यांना जे पैसे दिलेले आहेत. तो प्रस्ताव सभेमध्ये देणार आहेत. आपण त्यांना सुचना करू.

**गजानन भोईर :-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील, आपण काही विद्यार्थ्यांना जुनी पुस्तके वाटलेली आहेत. माझ्या माहितीप्रमाणे शाळा क्र. १३ मध्ये असा प्रकार घडलेला आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, शाळा क्र. ६ मध्ये सुद्धा जुनी पुस्तके वाटलेली आहेत.

**रतन पाटील :-**

ते विद्यार्थी ती पुस्तके रिटर्न करतात आणि पुन्हा पुस्तकांचे वाटप केले जाते.

**केशव घरत :-**

ती सर्व पुस्तके गोळा करून त्या सर्व पुस्तकांचे पुन्हा वाटप केले जाते.

**प्रेमनाथ पाटील :-**

हे अधिकारी ही सर्व पुस्तके गोळा करून टिचर लोकांना नेउन देतात. हे सर्व टिचर ती नवीन पुस्तके तशीच ठेवतात आणि मागील वर्षाची पुस्तके घेतात आणि त्या पुस्तकांचे वाटप करतात.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा.) :-**

आता आपल्याकडे शिक्षण मंडळ स्थापन झालेले आहे. त्यामुळे पुन्हा असे होणार नाही.

**केशव घरत :-**

आपल्याकडे शिक्षण मंडळ आता स्थापन झालेले आहे.

**एस. एस. सुर्यवंशी :-**

राई, मुर्धा, मोर्वा याठिकाणी स्थानिक नगरसेवक राहतात.

**प्रेमनाथ पाटील :-**

शाळा क्र. ६ मध्ये पुस्तकांचे वाटप झालेले आहे का?

**एस. एस. सुर्यवंशी :-**

आम्ही शाळा क्र. ६ मध्ये मुख्याध्यापकांना स्थानिक नगरसेवक असल्यामुळे शिक्षण मंडळ असावे अशा सुचना देतो.

**प्रेमनाथ पाटील :-**

तुम्ही पुस्तकांचे वाटप केलेले आहे का?

**ए. एस. सुर्यवंशी :-**

आम्ही नगरपालिकेच्या शाळांना पुस्तकाचे वाटप करायला सांगितले आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

मग अजुनपर्यंत पुस्तकांचे वाटप का झाले नाही?

**ए. एस. सुर्यवंशी :-**

२ तारखेला पुस्तकांचे वाटप झालेले होते.

**रतन पाटील :-**

सगळी पुस्तके वाटून झालेली आहेत का? कारण मागच्यावेळेला दोन-तीन महिने पुस्तके आलेली नव्हती.

**ए. एस. सुर्यवंशी :-**

पाचवी आणि पहिलीचा अभ्यासक्रम दिलेला आहे. त्याचे अंडरप्रिंट असल्यामुळे ती पुस्तके मिळालेली नाहीत.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

एक महत्वाचा मुद्दा असा आहे की ज्या विद्यार्थ्यांना पुस्तके मिळत नाहीत. आपण ती पुस्तके आपल्या सर्वांच्या मान्यतेने महानगरपालिकेतर्फे त्यांना देणार आहोत. तुम्ही आम्हाला त्याचा अहवाल तत्काळ द्या.

**केशव घरत :-**

साहेब, आपल्या क्षेत्रात ज्या काही खाजगी अनुदानित शाळा आहेत. त्यांना प्रत्येक वर्षी पुस्तके दिली जातात. त्यांना यावर्षी का दिली नाहीत?

**ए. एस. सुर्यवंशी :-**

जर शाळेसाठी पुस्तके दिली तर त्या पुस्तकांचे शाळेत वाटप झाले पाहिजे.

**गजानन भोईर :-**

श्री. सुर्यवंशीसाहेब तुम्ही या पुस्तकांचे वाटप केले की नाही ते स्वतः बघितलेले आहे.

**केशव घरत :-**

साहेब, तुम्ही सांगता की खाजगी अनुदानित शाळांना पुस्तक वाटप केले जाते. मी आता आमच्या शाळेतून आलो. परंतु, आमच्या शाळेला पुस्तक वाटप झालेले नाही.

**दामोदर संख्ये :-**

तुमच्या शाळेचे नाव काय आहे?

**केशव घरत :-**

आमच्या शाळेचे नाव राजे शिवाजी विद्यालय असे आहे.

**ए. एस. सुर्यवंशी :-**

तुमची शाळा विना अनुदानित आहे का?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

तुमची शाळा अनुदानित आहे का?

**केशव घरत :-**

आमची शाळा अनुदानित आहे.

**ए. एस. सुर्यवंशी :-**

तुमची शाळा कोणत्या बेसवर अनुदानित आहे? इयत्ता पाचवी ते इयत्ता दहावी या माध्यमिक शाळे अंतर्गत तुमची शाळा आहे का?

**दामोदर संख्ये :-**

आपल्याला फक्त अनुदानित शाळांना पुस्तक वाटप करायचे आहे.

**केशव घरत :-**

गेल्या वर्षी पुस्तक वाटप करायला तुम्ही होतात का?

**ए. एस. सुर्यवंशी :-**

गेल्या वर्षी जुन महिन्यात पुस्तकांचे वाटप झालेले होते. मी जुलैला आलेलो आहे.

**केशव घरत :-**

आता आम्हाला तुम्ही जुन महिन्यात आलात की जुलै महिन्यात आलात ते बघावे लागेल. तुम्ही आता पोलिसांसारखे करता. पोलिस ही हद्द आमची आहे. तिकडची हद्द तुमची आहे असे करतात. तुम्ही सुद्धा तोच प्रकार करित आहात. आपल्याला याबाबत पंचनामा करणे आवश्यक आहे. हा पंचनामा कोणी करायचा? हे आपण ठरवूया. परंतु, हे आमच्या इथे येते, ते त्यांच्या इथे येते असा प्रकार चाललेला आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

आपल्या हद्दीत न येणाऱ्या गोष्टी तुम्ही तपासून घ्या.

**केशव घरत :-**

युनिफॉर्मचे काय झाले? विद्यार्थ्यांना युनिफॉर्म मिळणार आहे का?

**ए. एस. सुर्यवंशी :-**

आपला युनिफॉर्मबाबत ठराव मार्च महिन्यामध्ये झालेला होता.

**मिलन पाटील :-**

आम्ही मार्च महिन्यामध्ये ठराव पास करून दिलेला आहे. याचा अर्थ फेब्रूवारी मार्च महिन्यात पैसे सॅन्क्शन झालेले आहेत.

**केशव घरत :-**

युनिफॉर्मबाबतचा ठराव पास झाला तरी कार्यवाही होत नाही ही अयोग्य बाब आहे.

**मिलन पाटील :-**

आम्ही फेब्रूवारी महिन्यामध्ये युनिफॉर्मबाबतचा ठराव पास करून दिलेला होता. फेब्रूवारी महिन्यामध्ये आम्ही म्हणजेच स्थायी समितीने अमुक एक रक्कम पास करून दिलेली होती आम्ही तो ठराव पास करून दिलेला होता. अजुनपर्यंत युनिफॉर्मबाबतच्या ठरावाची अंमलबजावणी का झाली नाही?

**केशव घरत :-**

तुम्हाला ही टिपणी येणार आहे हे माहिती नव्हते का?

**ए. एस. सुर्यवंशी :-**

शिक्षण मंडळाचा ठराव ९ तारखेला आलेला होता.

**मिलन पाटील :-**

परंतु, शिक्षण मंडळ आता स्थापन झालेले आहे आणि आम्ही तुम्हाला युनिफॉर्मबाबतचा ठराव पुर्वीच सॅन्कशन करून दिलेला होता. तुम्ही त्या ठरावाची अंमलबजावणी करायला पाहिजे होती. तुम्ही अंमलबजावणीसाठी शिक्षण मंडळ येण्याची वाट बघत होते का?

**केशव घरत :-**

तुम्ही युनिफॉर्मबाबतच्या ठरावची अंमलबजावणी करायला पाहिजे होती.

**प्रेमनाथ पाटील :-**

तुम्ही शिक्षण मंडळ कधी येईल? याची वाट बघत होते का?

**मिलन पाटील :-**

तुम्ही शिक्षण मंडळ स्थापन होण्याची वाट बघत होते का? आम्ही तुम्हाला फेब्रुवारी महिन्यामध्ये मुलांसाठी ठराव करायला सांगितलेले होते.

**केशव घरत :-**

मे महिन्यात युनिफॉर्म मिळत नाहीत म्हणून आम्ही फेब्रुवारी महिन्यात ठराव केला.

**मिलन पाटील :-**

शिक्षण मंडळाने युनिफॉर्म दिले की नाही ते माहिती नाही. परंतु महासभा आणि स्थायी समितीने फेब्रुवारी-मार्च महिन्यामध्ये ठराव करुन दिलेला आहे आणि हे काय सांगतात तेच समजत नाही.

**केशव घरत :-**

जर आता शिक्षण मंडळ स्थापन झाले नसते तर तुम्ही अजुनपर्यत युनिफॉर्म दिले नसते का?

**मिलन पाटील :-**

आपण पैसे सॅन्क्शन करतो त्याला काय अर्थ आहे? आपले ठरावाचे काम एप्रिल-मार्च महिन्यामध्ये झालेले आहे.

**केशव घरत :-**

जर अजून दोन महिने पुढे गेले असते तर तुम्ही वाट बघत बसले असते का?

**ए. एस. सुर्यवंशी :-**

शिक्षण मंडळ यावर्षी स्थापन झाले आहे. जोपर्यंत शिक्षण मंडळाकडून गणवेश प्राप्त होत नाही तोपर्यंत गणवेश वाटप होऊ शकत नाही.

**केशव घरत :-**

शिक्षण मंडळाचे अधिकारी असे सांगतात. परंतु विदयार्थ्यांना वेळेवर ड्रेस मिळत नाहीत. अशी तक्रार आहे.

**मिलन पाटील :-**

तुम्ही फेब्रुवारी-मार्च महिन्यात ठराव दिलेले आहेत असे का बोलता?

**केशव घरत :-**

शाळा सुरू झाल्यावर सहा महिन्यानंतर विदयार्थ्यांना गणवेश देतात. परंतु, त्याचा काय ऊपयोग आहे?

**मिलन पाटील :-**

जर तुम्ही विदयार्थ्यांना वेळेवर गणवेश देत नसाल तर फेब्रुवारी - मार्च महीन्यात ठराव करुन देण्याला काय अर्थ आहे?

**नगरसचिव :-**

तुम्ही निविदेबाबत बोलता ना?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तुम्ही आता सर्व ठराव वगैरे घेऊन या.

**मिलन पाटील :-**

तुम्ही सचिवांना विचारा. आम्ही फेब्रुवारी - मार्च महीन्यामध्ये पैसे सॅन्क्शन करुन दिलेले आहेत हे त्यांना माहिती आहे. मग तुम्ही अंमलबजावणी का केली नाही? तुम्ही शिक्षण मंडळाची वाट बघत होतात का?

**प्रेमनाथ पाटील :-**

ही लोकं शिक्षण मंडळ स्थापन होण्याची वाट बघत बसले असतील.

**ए. एस. सुर्यवंशी :-**

९ तारखेला शिक्षण मंडळाचा आर्थिक आणि प्रशासकिय मंजुरीचा ठराव आलेला होता.

**मिलन पाटील** :-

शिक्षण मंडळ आता स्थापन झालेले आहे. परंतु, आम्ही तुम्हाला कार्यक्रमाचे आयोजन पुर्वीच करुन दिलेले होते.

**केशव घरत** :-

तुम्ही त्या सर्व कार्यक्रमाची अंमलबजावणी करायला पाहिजे होती.

**ज्युडी डिसोजा** :-

शिक्षण अधिकारी तुम्ही शिक्षकांना जे ट्रेनिंग ठेवले होते त्याबाबत मला असे सांगायचे आहे की माझ्याकडे तीन - चार टिचर्स आलेले होते. एका एका टिचरला रु. ७०/- असा जेवण भत्ता होता. तुम्ही त्यांना एवढीशी पोळी रोज खायला दयायचे. दुसरी गोष्ट म्हणजे तुम्ही ज्युनियर आणि सिनियरच्या शिक्षकांना बसायला बाके दयायचे. कोणाचे शरीर किती मोठे असते आणि कोणाचे शरीर किती छोटे असते याची तुम्हाला कल्पना आहे का? ते सगळे शिक्षक सकाळी १० वाजल्यापासुन संध्याकाळी ५ वाजेपर्यंत त्याएवढयाशा बेंचवर बसायचे. ते शिक्षक आमच्या पाठीत दुखतं असे सांगायचे. तरीसुद्धा तुम्ही त्यांना बसायची सोय केलेली नाही. तिसरी गोष्ट म्हणजे त्यांचा आठ दिवसाचा कार्यक्रम होता. तुम्ही तो कार्यक्रम बारा दिवसाचा ठेवला. तुम्हाला दुसऱ्या टिचर ट्रेनिंग संपल्याबाबत सांगत होत्या. तुम्ही चौथ्या दिवशी दुसऱ्या शिक्षकांना प्रोनाऊन्स केले चौथी गोष्ट अशी आहे की, तुम्ही शिक्षकांना झेरॉक्स काढायला सांगता. एवढी मोठी बंडले असतात. ते टिचर त्यांच्यां पैशाने झेरॉक्स कशाला काढतील. मला माझ्या प्रश्नाचे उत्तर पाहिजे.

**ए. एस. सुर्यवंशी** :-

शासनाचा नियम आहे की, मुख्यालयापासुन आठ किलोमीटरपेक्षा जास्त आत असेल तर तेव्हा दैनिक भत्ता व प्रवास भत्ता देय असतो. शाळा आणि मनपा मुख्यालय आठ किलोमीटपेक्षा जास्त नसल्यामुळे सर्व महापालिकेसाठी शासनाने नियम केलेला आहे की महापालिकेला दैनिक भत्ता आणि प्रवास भत्ता देय नाही. फक्त रु. १५ हा अल्पोपहार भत्ता देय म्हणून प्रत्येक माणसाला प्रत्येक दिवसाचा भत्ता असतो. प्रशिक्षणासाठी त्यात रोज दोन चहा आणि एक नाश्ता असतो. हे माझ्या पहिल्या प्रश्नाचे उत्तर दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर असे आहे की जिल्हा परिषदांच्या शाळांसाठी परिपत्रक हेच प्रमाण असते. मनपा शाळांसाठी उल्लेख होता की मनपा आणि नपा कार्यक्षेत्रातील शाळांतील शिक्षकांना दैनिक भत्ता आणि प्रवास भत्ता देय नाही आणि तो स्विकृतही नाही. फक्त अल्पोपहार आहे. तिसरी गोष्ट म्हणजे आपल्या तालुक्याच्या शाळामधून जे ट्रेनिंग होते, ज्या-ज्या ज्युनियर कॉलेज किंवा महाविद्यालयामध्ये प्रशिक्षण असते. त्याची नोंद घेउन प्रशिक्षणाचे आयोजन केले जाते. आम्ही २२ तारखेचे प्रशिक्षणही मदतनिधी ज्युनियर कॉलेज या ठिकाणी आयोजित केलेले आहे.

**जयंत पाटील** :-

शिक्षण अधिकारी, मला एक माहिती हवी आहे. एका हिंदी वर्तमानपत्रामध्ये एक बातमी छापून आली आहे. भाईंदर सेकंडरी शाळेमध्ये एक कार्यक्रम होता. त्या कार्यक्रमाला तुम्ही उपस्थित होता का? शिक्षणासंबंधी कार्यक्रम होता. त्याच्यामध्ये आमचे शिक्षण सभापती होते. त्या संबंधी बातमी अशी आहे की, उद्घाटन समारंभ होता त्यावेळी सभापती महोदयांना हार घालण्यासंबंधी माजी मुख्याध्यापिका चितराव यांना सांगितले गेले, त्यांनी हार घातला नाही, त्यांनी तिकडे असे सांगितले की, हे विदयार्थी ढ होते. मी त्यांना नापास केलेले आहे अशी पेपरची बातमी आहे. अशा प्रकारचे जर असेल तर हा सभापतींचा अपमान नसून महापालीकेचा अपमान आहे.

**ए. एस. सुर्यवंशी** :-

या उद्घाटनाला चितराव मॅडम नव्हत्या.

**जयंत पाटील** :-

माझ्याकडे पेपरची बातमी आहे.

**ए. एस. सुर्यवंशी** :-

श्रीम. चितराव मॅडमनी दि. ३० मे राजी जो प्रशिक्षण उद्घाटनाचा जो कार्यक्रम केला. त्यावेळी श्रीम. चितराव मॅडम नव्हत्या. त्यावेळेला साहेब हजर होते.

**जयंत पाटील** :-

मला ते माहित नाही. परंतू मी पेपरला बातमी वाचलेली होती. मा. सभापती 'ढ ' आहे , चौथी शिकलेले आहेत की ग्रॅज्युएट आहेत हा विषय होत नाही. कारण ते मा. सभापती आहेत.

**रतन पाटील** :-

आपल्या एकूण २९ शाळा आहेत. आपल्या शाळेतील सर्व वर्गांना शिक्षक आहेत का?

**केशव घरत** :-

या प्रश्नाचे उत्तर शिक्षण मंडळाने द्यावे.

**प्रेमनाथ पाटील** :-

शिक्षण मंडळाने उत्तर द्यावे.

**रतन पाटील** :-

घोडबंदरला चार शिक्षक कमी आहेत.

**ए. एस. सुर्यवंशी :-**

आपण घोडबंदरच्या शाळेमध्ये शिक्षकांची चार पदे रिक्त केलेली होती.

**केशव घरत :-**

परंतु, घोडबंदरला चार शिक्षक कमी आहेत.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपल्याकडे जो रिक्त अनुशेष आहे. आपल्याला तो अनुशेष भरता येतो. त्याप्रमाणे अनुशेष मंजुर करुन घेऊया.

**केशव घरत :-**

ज्या शिक्षिका रिटायर होतात. त्याच्या जागी दुसरे शिक्षक नेमले जात नाहीत.

**रतन पाटील :-**

या २९ शाळांमध्ये किती शिक्षकांची आवश्यकता आहे? ते बघा.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

शिक्षकांची जी पदे रिक्त आहेत. त्या पदांची मागणी करा.

**केशव घरत :-**

आपण शिक्षकांची मागणी करणार आणि शिक्षकांची भरती व्हायला अजुन दोन-तीन महिने जाणार.

**मोहन पाटील :-**

शिक्षण मंडळाला शिक्षकांची भरती करण्याचा अधिकार आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

शिक्षण मंडळाला शिक्षकांची भरती करण्याचा अधिकार आहे.

**केशव घरत :-**

साहेब, आता ह्याच्यावर दखल घ्यायला पाहिजे.

**रतन पाटील :-**

आपण हा प्रश्न ग्रामपंचायत असल्यापासून दररोज मांडत आहे.

**मोहन पाटील :-**

आपल्याकडे तेव्हा अधिकार नव्हता.

**रतन पाटील :-**

तुम्ही त्यावेळेला शिक्षक भरले नव्हते का?

**ए. एस. सुर्यवंशी :-**

आता शिक्षण मंडळ स्थापन झालेले आहे. त्यामुळे शिक्षक भरतीची प्रोसेस चालू आहे.

**रतन पाटील :-**

तुम्ही पूर्वी शिक्षक भरलेले होते की नाही?

**ए. एस. सुर्यवंशी :-**

आपण पूर्वी शिक्षकांची भरती केलेली नव्हती.

**रतन पाटील :-**

तुम्ही शिक्षकांचे एकही पद भरलेले नाही का?

**ए. एस. सुर्यवंशी :-**

आताच शिक्षकांची दहा पदे रिक्त झालेली आहेत.

**रतन पाटील :-**

शिक्षकांची एक-दोन रिक्त पदे भरण्याबाबत प्रत्येक महासभेत हा प्रश्न येत असतो. तुम्ही शिक्षणाला काहीही महत्व देत नाही का? तुम्ही विद्यार्थ्यांना काय शिकवणार आहात?

**ए. एस. सुर्यवंशी :-**

आपण मंजुर पदाप्रमाणे भरती करीत असतो.

**रतन पाटील :-**

शिक्षण मंडळ स्थापन झाले. परंतु, त्याला काहीही महत्व नाही का?

**ए. एस. सुर्यवंशी :-**

आपल्याला नियमाप्रमाणे पदे लगेच भरता येत नाही. आपल्याला त्या पदांसाठी शासनाकडून मंजुरी घ्यावी लागते.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तुम्ही मंजुर पदांचा प्रस्ताव तात्काळ मान्य करा.

**केशव घरत :-**

प्रशासन अधिकारी विद्यार्थ्यांना सकाळी ९.०० वाजता बोलावले जाणार आहे. ते विद्यार्थी संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत थांबवणार आहेत. जर त्या विद्यार्थ्यांना चहा किंवा नास्ता मिळाला नाही तर महापालिका त्या नास्ताचे पैसे भरणार आहे का? साहेब, ११ ते ५ बाबत तुम्ही अजुन माहिती मिळवा.

**प्रभात पाटील :-**

परिपाठ कॅन्सल केलेला आहे का?

**केशव घरत :-**

परिपाठ कॅन्सल केलेला नाही.

**प्रभात पाटील :-**

तुम्ही परिपाठ कॅन्सल केलेला आहे. त्यामुळे अधिकाऱ्यांना त्याबाबत माहिती देऊ दे.

**केशव घरत :-**

विद्यार्थ्यांना सकाळी ९ वाजता बोलावलेले आहे.

**ए. एस. सुर्यवंशी :-**

माध्यमिकच्या विद्यार्थ्यांना बोलावलेले आहे.

**केशव घरत :-**

परंतु, आपल्या शाळा माध्यमिकमध्ये मोडत नाहीत.

**ए. एस. सुर्यवंशी :-**

पहिली ते चौथी किंवा पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांचा प्राथमिक आणि माध्यमिकमध्ये समावेश होतो. परंतु, सर्व विद्यार्थ्यांना बोलावलेले नाही.

**केशव घरत:-**

मला काल विद्यार्थ्यांना बोलावले असे सांगितलेले गेलेले आहे म्हणून मी बोलतो.

**ए. एस. सुर्यवंशी :-**

मी परिपत्रक काढलेले नाही.

**प्रभात पाटील :-**

आठवड्याच्या किती तासिका ठरलेल्या आहेत?

**ए. एस. सुर्यवंशी :-**

आता आठवड्याच्या तासिका वाढलेल्या आहेत आणि या ठिकाणी त्या तासिका तीस मिनिटांच्या आहेत.

**मोहन पाटील :-**

ज्या लोकांकडे गाई आहेत, ती लोक गाई पकडतात आणि सोडतात. ह्याच्यावर निर्णय होणे आवश्यक आहे.

**रतन पाटील :-**

आपण मागच्या वेळेला कार्यवाही केलेली होती.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

गाईंच्या विषयावर चर्चा करण्यासाठी श्री. पानपट्टे साहेबांना बोलवावे लागेल.

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. २७ चे वाचन केले.)

**केशव घरत :-**

पान क्र. ५१ वर मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत रस्त्यांना नांवे देणे, नामफलक बसवणे हा विषय आलेला होता त्याचे काय झाले?

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, रस्त्याला छत्रपती शिवाजी महाराजाचे नाव लावलेले दिसते. परंतु, आपण आता नविन नाव दिले त्याचा फलक कधी बसविणार आहात?

**केशव घरत :-**

रस्त्यांबाबत अगोदर पत्रव्यवहार केलेला होता. त्याचे काय झाले? त्याबाबत काही प्रयत्न केला का?

**प्रेमनाथ पाटील :-**

आपण नामफलकबाबत रु. साडेनऊ लाखाचे टेन्डर काढलेले होते. शिवाय, आपण ते टेन्डर सहा टक्क्यांनी वाढविणार होतो. परंतु, त्याबाबत काहीही कार्यवाही केलेली दिसत नाही. कारण हे नामफलक कुठेही लावलेले दिसत नाही.

**केशव घरत :-**

त्या ठेकेदाराने नामफलक लावण्याचे काम कुठे-कुठे केलेले आहे? ते सांगा.

**प्रेमनाथ पाटील :-**

हे नामफलक कुठे-कुठे बसविले? त्याचा आढावा द्या. पान क्र. ४१ वरील शेवटच्या लाईनवर बघा. आपण त्या ठेकेदाराला साडेतीन टक्क्यांनी टेन्डर वाढवून दिलेले आहे.

**केशव घरत :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीमध्ये रस्त्यांना नावे देणेकामी फलक बसविणे. आपण याबाबत टेन्डर देणार होतो. त्याचे काय झाले? तुम्ही जे फलक लावले होते त्याचे काय झाले? तुम्ही फलक लावलेले आहेत का? कारण आमच्या प्रभागात एकही नामफलक लागलेला नाही.

**कैलासबेन जानी :-**

आमच्या प्रभागात लावलेले सर्व नामफलक तुटले.

**केशव घरत :-**

तुम्ही याच्यापूर्वी टेन्डर दिलेले होते. त्याचे काय झाले?

**प्रभात पाटील :-**

श्री. सुर्यवंशी साहेब, आपल्या शाळेची तासिका किती वेळची असते?

**केशव घरत :-**

एक तासिका ३० मिनिटांची आहे का?

**प्रभात पाटील :-**

आपल्या शाळेची वेळ वाढलेली आहे की तासिका वाढलेली आहे ते सांगा. आपल्या शाळांचे ५२ तासिका आहे का? पाचवी ते सातवी किंवा पहिली ते चौथी अशी दुबार पध्दत असेल तर अशी दुबार पध्दतीची शाळा आहे का? किंवा पहिली ते चौथी ५२ तासिकातुन वगळली आहे का?

**ए. एस. सुर्यवंशी :-**

जर सकाळी ११ वाजताची शाळा असेल तर ११.०० ते ११.३५ अशी पहिली तासिका आहे आणि नंतर ३० मिनिटांची तासिका आहे.

**प्रभात पाटील :-**

तुम्ही प्रथम पान क्र.४ वरील गाई ढकलायच्या आहेत की काय करायचे आहे? ते रुलिंग द्या. तुम्ही मला या ठिकाणी एकाच प्रश्नाचे उत्तर द्या की त्या गाई कोणाच्या असतील? मला त्या व्यक्तीचे नाव समजु द्या. मग माझे समाधान होईल. आपण त्या माणसाला का प्रोटेक्ट करतो?

**मिलन पाटील :-**

पान क्र. ३७ वर आपण रु. २० कोटीचे कॉन्ट्रॅक्ट घेतलेले होते. तो कॉन्ट्रॅक्टर आलेला आहे का? श्री. खतगावकर साहेब, आपण आरोग्याच्या विषयाबाबत बँक गॅरन्टी मागितलेली होती.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सध्या तो विषय घेऊ नका.

**प्रेमनाथ पाटील :-**

आमच्या प्रभागात नामफलक कुठेही लागलेले नाही याकडे लक्ष द्या.

**केशव घरत :-**

नं. ५२ चे जे काम आहे. चेना येथे समाजमंदिर बांधणी ह्यासाठी जागा बघायची आहे. आपल्याला हे समाजमंदिर बांधण्यासाठी जागा उपलब्ध नाही.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा.) :-**

याचा अर्थ असा आहे की आपल्याला समाजमंदिरसाठी फक्त जागा उपलब्ध करुन द्यायची आहे.

**केशव घरत :-**

मी तुम्हाला त्याबाबत पत्र देतो.

(सन्मा. सदस्य श्री. मिलन पाटील ह्यांनी प्रकरण क्र. २७ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**केशव घरत :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. २७ :-**

दि. १७/०३/२००६, दि. २८/०३/२००६ व दि. २९/०३/२००६ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. २८ :-**

दि. १७/०३/२००६, दि. २८/०३/२००६ व दि. २९/०३/२००६ रोजीच्या मा. स्थायी समिती सभांच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्यांनी सुचविलेल्या दुरुस्तीसह व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. मिलन पाटील.** **अनुमोदन :- श्री. केशव घरत.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. २८ चे वाचन केले.)

**जयंत पाटील :-**

श्री. खतगावकर साहेब, विषय आला म्हणून थोडीशी माहिती देतो. ८ तारखेला दुपारी ४ ते ४.१५ वाजता एम.एच.-०४-डी.वाय.-८८६१ ह्या नंबरची कार माल आतमध्ये टाकून पास झाली. तिला रिलायन्स पेट्रोलपंपकडे पकडले. ती कार पकडल्यानंतर तिला ऑक्ट्रॉय नाक्यावर घेऊन गेले. त्या गाडीमध्ये माल होता. तो माल काय होता? ते मी तुम्हाला सांगत नाही. कदाचित, आपल्या दोन नगरसेवकांचे त्यांच्याशी मित्रत्वाचे संबंध असतील ते नगरसेवक तिकडे गेले आणि त्यांनी तिथे तडजोड केली. त्यांनी रु. ६००/- ऑक्ट्रॉय भरला. परंतु, ऑक्ट्रॉय भरल्यानंतर दंडात्मक कार्यवाही व्हायला पाहिजे होती. ती दंडात्मक कार्यवाही झाली का? माझ्याकडे त्या लोकांनी ऑक्ट्रॉय भरल्याचा पावती नंबर दिलेला आहे. मी तो पावती नंबर तुम्हाला देतो. तो पावती नंबर सी/४ २२४१९७ असा आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

परंतु, तुमची नक्की काय तक्रार आहे?

**जयंत पाटील :-**

८ तारखेला रु. ६००/- ची पावती फाडतात. परंतु, जर १० टक्के जकात पकडली तर रु. ६०००/- कार्पोरेशनला भरावे लागतात. ते भरले का?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

संबंधित ठेकेदाराकडून माहिती घेऊन तपासली जाईल. त्यावेळेला काय रियालिटी होती. त्याची माहिती घेऊया. परंतु, याच्यामध्ये ठेकेदाराचा संबंध नाही. आपण दंडात्मक कार्यवाही करणार आहोत आणि ही कार्यवाही महापालिका करणार आहे. ह्याच्यामध्ये दोन गोष्टी आहेत. पहिली गोष्ट म्हणजे आपल्या शहरात माल आणल्यानंतर त्या ठेकेदारांनी ती गाडी पकडलेली आहे. आपण श्री. हेमंत पाटील यांना त्यांच्या तसे निदर्शनास आणले आहे का? हे विचारुया. परंतु, याबाबत ठेकेदाराकडून काहीही तक्रार आलेली नव्हती.

**जयंत पाटील :-**

माझ्याकडे जकात ठेकेदाराबाबत तक्रार येते आणि तुमच्याकडे जकात ठेकेदाराबाबत तक्रार येत नाही ही कमाल आहे.

**मोहन पाटील :-**

परंतु, त्या ठिकाणी मिरा भाईंदर महानगरपालिकेचे अधिकारी असतात. ते अधिकारी काय करतात?

**गजानन भोईर :-**

ते अधिकारी काय करतात?

**प्रेमनाथ पाटील :-**

आपल्याकडे जकातचे दोन अधिकारी नसुन चार अधिकारी आहेत. मग ते काय करतात?

**गजानन भोईर :-**

दोन अधिकारी असले तरी ते येत नाहीत.

**जयंत पाटील :-**

मी तुम्हाला डिटेल माहिती देतो आणि तुम्हाला माहिती मिळत नाही याचा काय अर्थ आहे?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

हे सर्व काही विचारात घेऊन कार्यवाही केली जाईल. त्या ठेकेदाराने दंड आकारला नसेल किंवा आपल्याला नियमाप्रमाणे दंड आकारता येत असेल तर निश्चितच दंड आकारला जाईल.

**मोहन पाटील :-**

तुम्हाला पेनल्टी देण्याची ठेकेदाराची जबाबदारी नाही. आपली पेनल्टी वसुल करण्याची जबाबदारी आहे. आपण बजेटमध्ये तरतुद केलेली आहे. आपल्याला एवढे पैसे मिळतील म्हणून आपण एवढा खर्च वाढवायला पाहिजे. आपण खर्च वाढवताना आपले अधिकारी काय करतात? ती अधिका-यांची जबाबदारी आहे.

**गजानन भोईर :-**

मागच्या वेळेलासुध्दा हा विषय निघालेला होता की, तिथे अधिका-यांचा टेबल लागलेला आहे की नाही ते माहिती नाही.

**केशव घरत :-**

जकात नाक्यावर टेबल ठेवायचा होता. तुम्ही तो टेबल दिला का?

**मोहन पाटील :-**

आपल्याला तिथे कॉम्प्युटर लावायचा आहे. सुचना फलक लावायचा आहे. परंतु, तसे काहीही केलेले नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

मी दोन-दोन पावत्या आणलेल्या होत्या एक पावती हजार रुपयाची फाडलेली होती आणि दुसरी पावती १६ हजाराची फाडलेली होती. आपल्या कार्यालयामध्ये त्या पावत्या जमा न होता ठेकेदाराच्या खिशात जमा होत आहेत. तुम्ही त्या ठिकाणी काय करता?

**जयंत पाटील :-**

त्या ठिकाणी ८ तारखेला ४ ते ४.१५ वाजता कोणकोणते कर्मचारी होते? कारण ती पकडलेली गाडी साधारणपणे ६.१५ वाजता सोडली.

**मोहन पाटील :-**

आपल्याला याबाबत साहेबांचे म्हणणे बघावे लागेल. आपले अधिकारी त्या ठिकाणी असतात. शिवाय, त्या ठिकाणी बाजुला त्यांचे केबीन आहे. एकदा एखादी गाडी पकडल्यानंतर ती गाडी परत येते. आपल्या अधिका-यांनी याबाबत हस्तक्षेप करायला पाहिजे. ती गाडी याठिकाणी पुन्हा का मागवली म्हणून आपण पेनल्टी लावतो. ती पेनल्टीच आहे. आपल्याला ती पेनल्टी ठेकेदाराला द्यायची आहे. आपण बजेटमध्ये विशेष अमाऊन्ट पकडलेली आहे. जनरली दंड वसुली पाहिजे म्हणून आपण बजेटमध्ये विशेष अमाऊन्ट पकडलेली आहे. ही अमाऊन्ट होत नसेल तर तर ती ठेकेदाराची जबाबदारी नाही. ती अधिका-यांची जबाबदारी आहे. मग आपले अधिकारी काय करतात? मी तुम्हाला मागच्या वेळेला बोललो होतो की तुम्ही नाक्यावर टेलिफोन बसवा, हॉट लाईन बसवा, कॉम्प्युटर लावा, बोर्ड लावा हे सगळे करण्यासाठी आपल्या अधिका-यांचे सहकार्य आहे. त्यांना शिफ्टींगसाठी अधिकारी वाढवायला पाहिजे. सन्मा. सदस्य जयंत पाटील यांनी ज्यांनी पावती फाडली त्याबाबत सांगितलेले आहे. त्या पावत्या फाडल्यानंतर असा प्रकार घडलेला आहे. तो प्रकार घडल्यानंतर आपल्याला रु. ६०००/- ची पेनल्टी आलेली नाही. परंतु, त्यासाठी ठेकेदार जबाबदार नाही. आपला अधिकारी वर्ग जबाबदार आहे. आपले अधिकारी काय करतात?

**केशव घरत :-**

अजुनपर्यंत किती दंडात्मक वसुली केली?

**जयंत पाटील :-**

जर कार्यवाही होत नसेल तर ते आपल्या कर्मचा-यांचे काम नाही का?

**गजानन भोईर :-**

ही दंडात्मक वसुली करण्याचे काम आपल्या अधिका-यांचे आहे. मग वसुली का होत नाही?

**प्रभात पाटील :-**

मग अधिका-यांना वसुली करायला सांगा.

**जयंत पाटील :-**

मग असे अधिकारी ठेवायची काय गरज आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

ही वसुली ठेकेदार जमा करतो.

**गजानन भोईर :-**

परंतु, आपले अधिकारी काय करतात?

**कैलासबेन जानी :-**

जकात वसुली व्यवस्थित होत नाही. या गोष्टीला एक वर्ष झालेले आहे.

**केशव घरत :-**

आपल्याला अधिकारी कशाला पाहिजे?

**गजानन भोईर :-**

आपले अधिकारी काय करतात? ते प्रथम सांगा.

**कैलासबेन जानी :-**

एका वर्षात किती पेनल्टी झाली? ते सांगा.

**प्रेमनाथ पाटील :-**

ह्यांची रु. ७५ हजारांपर्यंत पेनल्टी वसुल झालेली आहे.

**जयंत पाटील :-**

त्यावेळेला कोणकोणते कर्मचारी होते? ते प्रथम शोधा. त्यांना तिथुन हकलून लावा आणि चांगले कर्मचारी ठेवा.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

जकात वसुलीवर निश्चितच कार्यवाही केली जाईल.

**कैलासबेन जानी :-**

तुमची एका वर्षात पेनल्टी वसुल होत नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. उपायुक्त साहेब, तो कॉन्ट्रॅक्टर पार्टीकडून दंडात्मक कार्यवाहीसाठी पैसे वसुल करतो. आपण त्याच्यावर काय कार्यवाही करता? तुम्ही ॲग्रीमेंटमध्ये असा क्लॉज टाका की, समजा अशी चुक आढळून आली तर दस पट त्याची रक्कम आपल्या पालिकेत जमा केली जाईल. जर एखाद्या पार्टीची रक्कम ठेकेदाराने वसुल केली तर तेवढीच दहा पट रक्कम आपल्याकडे ठेकेदाराने जमा करावी.

**प्रेमनाथ पाटील :-**

आता त्या ठेकेदाराची कॉम्प्युटराईज पावती येते. ती पावती दंडात्मक पावती नाही. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या पिवळ्या रंगाच्या पावत्या होत्या. त्या टाईपच्या दंडात्मक पावत्या ठेवायच्या तर किती फाईन मारलेला आहे ते समजेल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

दंडात्मक पावती फाडण्यासाठी काहीही राईट्स नाहीत.

**प्रेमनाथ पाटील :-**

परंतु, ठेकेदारसुध्दा दंडात्मक पावती फाडतो.

**मोहन पाटील :-**

आपल्याला ठेकेदाराचे पावत्या चेक करण्याचे काम आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

परंतु, आपले अधिकारी काय करतात?

**मोहन पाटील :-**

तुम्ही दोन-चार अधिकारी वाढवा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

जकातच्या कामकाजासाठी एक कमिटी नेमायची असा आपला मागच्या वेळेला विषय झालेला होता.

**केशव पाटील :-**

एक उपायुक्त म्हणून त्या लोकांची तिकडे नेमणूक करायची होती. त्याचे काय झाले?

**प्रभात पाटील :-**

तुम्ही कितीही उपायुक्त ठेवा किंवा कितीही अधिकारी ठेवा. त्याचा काहीही उपयोग नसतो.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मी सभागृहाला सविस्तर माहिती देतो. शासनाचे जकात अभिकर्ता नेमण्याचे जे धोरण आहे त्याच्यामध्ये महापालिकेचा सेपरेट व्हिजिलंन्स रहावा असे तिळमात्र अपेक्षित नाही. आपला गैरसमज होतो. आपले संपूर्ण जकात वसुलीचे काम खाजगीकरणाने करायचे धोरण आहे. त्यामुळे दैनंदिन कामामध्ये कोणालाही इंटरफेअरन्स करता येत नाही. आपला जो ऑक्ट्रॉय आहे. त्यांनी त्याच्यामध्ये रितसर नियमाने दिलेल्या दराने आणि आपल्या प्रोसेसप्रमाणे जकात वसुली करावी हे अभिप्रेत आहे. एखाद्या व्यापाऱ्याचा किंवा नागरिकाचा दृष्टीकोन जकात बुडविण्याचा असेल तर त्याला आळा घालण्यासाठी ठेकेदाराकडे स्वतः सादर करण्याची जबाबदारी आहे. ठेकेदाराने तसे व्यापारी पकडले असतील तर नियंत्रण करणे हे अधिकाऱ्यांचे प्रथम कर्तव्य आहे. त्यांनी ती बाब समोर आणली पाहिजे. अधिकाऱ्यांनी नियमाने जकात वसुली केली पाहिजे. दंडाची जी काही रक्कम जमा होईल ती रक्कम निश्चितच महापालिकेकडे जमा व्हायला पाहिजे. आपण ज्यावेळेला दैनंदिन प्रोसेसमध्ये प्रॅक्टीकली काम करतो. सन्मा. सदस्य जयंत पाटील यांनी ८ तारखेचा किस्सा सांगितलेला आहे. आम्ही निश्चितच संबंधित अधिकाऱ्यांवर कार्यवाही करु. कधी-कधी एखादी रेप्युटेड फॅमिली किंवा एखादा व्यापारी असतो. ती हे रेप्युटेशनने म्हणत नाही. परंतु, अनावधानाने एखादी केस झाली आणि रितसर व्यापारी असेल तर तो सामोपचाराने ऑक्ट्रॉय घेऊन गाडी सोडली जाते. परंतु, आपण त्या ठिकाणी त्याला बळजबरीने दंडात्मक कार्यवाही करावी असे म्हणू शकत नाही. त्याला जकात देण्यासाठी एखादी पार्टी त्रास देत असेल तर त्याचा विचार मान्य करीत नसेल तर तो प्रॉब्लम आपल्याकडे अपिल व्हायला पाहिजे असे अपेक्षित आहे.

**जयंत पाटील :-**

साहेब, तुम्ही चुकीचे बोलता. जी गाडी ऑक्ट्रॉय चुकवून पैसे देते तिच्यावर कार्यवाही व्हायला पाहिजे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मी या गाडी संदर्भात बोलत नाही.

**जयंत पाटील :-**

मी फक्त दंडात्मक कार्यवाहीबाबत बोलत आहे. मी या गाडीबाबतच बोलतो.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मी या गाडीबाबत मान्य केलेले आहे. आपण या गाडीबाबत चौकशी करुया.

**जयंत पाटील :-**

त्या लोकांनी ऑक्ट्रॉय भरलेला नव्हता. म्हणून रिलायन्स पेट्रोलपंपकडे त्यांची गाडी पकडलेली होती.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मी सभागृहाला जनरल माहिती देतो की आपण या गाडीबाबतची चर्चा पेन्डीग ठेवलेली आहे. आपण या गाडीबाबत कार्यवाही करुया. परंतु, जनरली असे धोरण आहे की आपण त्यांच्या दैंनदीन कार्यवाहीमध्ये व्यत्यय आणू शकत नाही. ती लोक आपल्याकडे जी प्रकरणे आणतील आपण त्याच्यावर निर्णय घ्यायचा आहे.

**मोहन पाटील :-**

तुम्ही बोलता ते बरोबर आहे. परंतू, आपले अधिकारी तिथे असतात. त्यांना इन्टरफेअरन्स करण्यापूर्वी मिरा भाईंदर महानगरपालिकेने तो ठेकेदार नेमलेला आहे.कायदयानुसार हे बरोबर आहे. परंतू आपल्याला

अधिका-यांनी इन्स्ट्रक्शन देण्याचे कारण नाही. ते अधिकारी उपस्थित आहेत. तुम्ही कामाच्याबाबतीत बरोबर आहात. ही गाडी आलेली नाही किंवा आहे तुम्ही असे इन्स्ट्रक्शन दयायला पाहिजे. तुम्ही नोटडाऊन करुन घ्या. आम्हाला जे करायचे आहे ते नंतर बघतो. भाईंदरमध्ये माल येतो आणि तो माल भाईंदरच्या बाहेर जात नाही. आपण ती माहिती काढू शकत नाही. तो माल भाईंदरमध्ये येतो आणि आपण त्याची जकात लावतो भाईंदरमध्ये आलेला माल, पार्टी कोण आहे, कंपनी कोणती आहे, कोणत्या ठिकाणी आहे, कंपनीची गाडी होती का? या सर्व गाष्टींची माहिती मिळणे आवश्यक आहे. आपल्याला ती माहिती अधिका-यांनी दिली तर उपयोग होईल नाही तर या अधिका-यांना ठेउन काहीही उपयोग नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

तुम्ही मघाशी म्हटले होते की अपण जे काही रेट ठरवून दिलेले आहेत त्या रेटनुसार वसुली करायला पाहिजे आता माझ्याकडे बिस्लरीची बाटली आहे. ही बाटली रु. १०/- ला मिळत होती. हे तुम्हाला आणि आम्हालासुद्धा माहिती आहे. परंतू, ही बाटली रु. २०/- ची असल्याचे सांगतात मग तुम्ही याच्यावर काय कार्यवाही करणार.

**गजानन भोईर :-**

दुसरी गोष्ट म्हणजे ऑक्ट्रॉयवाले बसमध्येही चढतात आणि आपले अधिकारी बघत असतात. एखादा ऑक्ट्रॉयवाला गाडीमध्ये चढला की, बॅग उघडतो आणि सामान बाहेर काढतो. हे ऑक्ट्रॉयवाले लोकांची बॅगसुद्धा खाली करतात.

**जयंत पाटील :-**

ऑक्ट्रॉयवाल्यांना दंडात्मक कार्यवाही करण्याचा अधिकार नाही. त्यांचे फक्त ऑक्ट्रॉय न भरणा-या लोकांना पकडायचे काम आहे. त्याप्रमाणे ऑक्ट्रॉयवाल्यांनी पकडलेही आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

परंतू, त्यांच्यावर कार्यवाही झालेली नाही.

**जयंत पाटील :-**

सन्मानीय सदस्य प्रेमनाथ पाटील यांनी विषय आणलेला होता. ही सगळी दंडात्मक कार्यवाही करुन अधिकारी पैसे घेत होते. ते पैसै आपल्या खात्यात जमा झाले जमा व्हायला पाहिजे. आपण आपल्या बजेटमध्ये प्रोव्हीजन केलेले आहे. आम्हाला हया एवढया कार्यवाही दंडात्मक रक्कम मिळणार असे आपण म्हणालो तरी रक्कम मिळत नाही.

**गजानन भोईर :-**

आपल्याला आजपर्यंत किती रक्कम आलेली आहे? आपण दंड वसुलीचा ठेका देउ.

**रतन पाटील :-**

आपण दंड वसुलीचा ठेका देऊ.

**मा. सभापती :-**

आतापर्यंत किती वसुली झालेली आहे?

**कैलासबेन जानी :-**

आतापर्यंत वसुली झालेली नाही.

**रतन पाटील :-**

आतापर्यंत रु. ५४,४१८ एवढी वसुली झालेली आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपल्याकडे व्यापा-यांनी जी तक्रार दयायला पाहिजे आपण ज्याबाबत मागच्या सभेत सुचना दिल्याप्रमाणे आम्ही त्याठिकाणी बोर्ड लावलेले आहेत. आमच्याकडे व्यापारीसुद्धा येतात. सन्मानीय सदस्य मोहन पाटील बोलल्याप्रमाणे आम्ही आपच्या कर्मचा-यांना ॲक्टीव्हेट करु. त्यांनासुद्धा जबाबदारी देऊ.

**जयंत पाटील :-**

तुमच्या कर्मचा-यांना नियम माहिती नाहीत. आपण तिकडे जो कर्मचारी नेमलेला आहे त्यांने काहीतरी करायला पाहिजे. त्या कर्मचा-यांचे काय काम आहे ?

**मा. सभापती :-**

आतापर्यंत अधिका-यांनी रु. ५४ हजार वसुली केलेली आहे.

**गजानन भोईर :-**

तुम्ही नोंदणीनुसार रु. ८० हजाराची दोन दिवसात देता हे योग्य नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ह्याच्यावर रामबाण उपाय म्हणजे आपण आपल्या नगरसेवकांची कमिटी नेमावी. जसे पोलिस स्टेशनमध्ये दक्षता पथक असते, सल्लागार समिती असते किंवा 'शांतता कमिटी' असते आपण जकातीबाबत नगरसेवकांची कमिटी नेमावी असे मला वाटते. तुम्ही तिथे बोर्ड लावा की जर जकाती संदर्भात कोणाच्या काही अडचणी असतील तर याच्यावर अधिका-यांशी संपर्क साधावा किंवा ही कमिटी डिसीजन घेईल.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

मी उपायुक्त पदावर जॉईन्ट झाल्यापासुन आपल्या सुचनेप्रमाणे प्रत्येक ठिकाणी बोर्ड लावले आहेत. ठेकेदाराबाबत किंवा जकातीच्या इतर कोणत्याही बाबींबाबत काहीही अडचण असेल तर तुम्ही अमुक-अमुक प्राधिकरणाला तक्रार दयावी. तिथे बोर्ड लावलेले आहेत. आम्हाला जिथे-जिथे तक्रारी आलेल्या आहेत आम्ही त्या तक्रारी सेटलमेन्ट केलेल्या आहेत.

**मोहन पाटील :-**

स्थायी समितीला विविध समित्या नेमण्याचा अधिकार आहे. आपण आता आणलेला प्रस्ताव घेऊ शकतो. परंतू, हा अधिकाराचा वेगळा विषय आहे. परंतू, स्थायी समितीला कोणतीही समिती नेमण्याचा अधिकार आहे. तुम्हाला जकातीबाबत पेनल्टी मिळत असेल तर तुम्ही त्यासाठी पावत्यांची आवश्यकता असते.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

कोणतीही समिती नेमण्याचा अधिकार स्थायी समितीला नसून महासभेला आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आपण जकातीची एक कमिटी नेमण्याबाबतचा विषय महासभेला घेऊया.

**मोहन पाटील :-**

आपण प्रयत्न करुया.

**मिलन पाटील :-**

तुम्ही बोर्डाबाबत काय कार्यवाही करणार आहात? ते मला सांगा. श्री. खतगावकर साहेब, मागच्या वेळेला हे बोर्ड उलटे लावलेले होते. तुम्ही याबाबत अधिका-यांना विचारा. याठिकाणी जे अधिकारी आणि नगरसेवक बसलेले आहेत. त्यांना तिथे पाठवा आणि बोर्ड उलटे लावलेले आहेत की नाहीत ते बघा. तुम्ही होर्डीगसुध्दा लावा. तुम्ही ते बोर्ड उलटे ठेवून दिलेले आहेत.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील यांनी एक प्रश्न विचारलेले आहे की आपण रु. ५४ हजार वसुली केली. मग तिथे किती कर्मचारी कामाला आहेत? ते सांगा. यांच्यामध्ये 'ना नफा ना तोटा' असे झालेले आहे.

**गजानन भोईर :-**

याच्यामध्ये नफा नाही निव्वळ तोटा आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

जेव्हा कोणताही व्यापारी जकात चुकवून शहरात येतो. तेव्हा आपण त्याला १० पट रक्कम वसुल करतो. जर त्या ठेकेदाराने अशा एखाद्या व्यापा-याकडून १० टक्के वसुली केली तर तो पुन्हा त्या पावतीमध्ये दंड लिहित नाही. अशा ठेकेदारावर काय कार्यवाही करणार? तुम्ही तुमच्या अटीशर्तीमध्ये तो क्लॉज द्या.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

व्यापा-यांनी आपल्याला सहाकर्य करावे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

जर यांनी केस उकरुन काढली तर तुम्ही ठेकेदारावर काय कारवाई कराल?

**मोहन पाटील :-**

आपल्या अधिका-यांनी यामध्ये तशा पध्दतीच्या तक्रारी आणायला पाहिजे ना.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

दंडाची रक्कम वसुल करुन महापालिका खात्यामध्ये जमा करुन घेण्यात येईल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, तुम्ही एखाद्या व्यापा-यावर १० पट दंड आकारता आणि तुम्ही ठेकेदारावर काहीच कारवाई करत नाही. याचा अर्थ काय? ठेकेदाराकडून दंड वसुली केली तर ठेकेदारावर कारवाई केली पाहिजे.

**गजानन भोईर :-**

श्री. हेमंत पाटील यांना तीन महिन्यापूर्वी दंडात्मक वसुली किती होती? असे विचारलेले त्यावेळेलासुध्दा श्री. हेमंत पाटील यांनी रु. ५४ हजार सांगितलेले होते. आजसुध्दा तीन महिन्यानंतर रु. ५४ हजार सांगतात. याच्यामध्ये रु. ५४ हजार प्रिन्टेडमध्ये दिलेले आहे.

**मा. सभापती :-**

अनेक नगरसेवकांच्या तक्रारी एकल्यानंतर कोणाच्या रु. ८० हजार पावत्या आहेत, कोणाच्या रु. ६० हजार पावत्या आहेत, कोणाच्या रु. ८ हजार पावत्या आहेत. रु. १५ हजार पावती आहेत. अशा सगळ्या भानगडी ऐकल्यानंतर मला असं वाटतं की हे अधिकारी सक्षम नाहीत. त्यांची ताबडतोब बदली करावी अशी माझी सुचना आहे.

**प्रभात पाटील :-**

मी या ठिकाणी एकच सांगू इच्छिते की गेली १५ वर्षे तुम्ही आम्ही आणि बरेच नगरसेवक तीन-तीन टर्मपासून आहोत आणि काही नविनसुध्दा आलेले आहेत. परंतु, या महानगरपालिकेच्या कर्मचा-यांच्या बाबतीमध्ये नगरसेवकांची धोरण इतकी उद्दात आहे, इतकी उदार आहेत की तुम्हाला महाराष्ट्रामध्ये अशी

एखादी महानगरपालिका शोधून सापडावी लागेल. नगरसेवक हे महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीमध्ये एवढे उदार आहेत. या ठिकाणी नगरसेवक सतराशे-साठ तक्रारी या शहराच्या विकासाच्या संदर्भामध्ये आणि फायद्याच्या संदर्भामध्ये करत असतात. या ठिकाणी कोणत्याही अधिकाऱ्याने सांगावे की आम्ही या महानगरपालिकेच्या फायद्याच्यादृष्टीने हा प्रस्ताव तुमच्यापुढे ठेवलेला आहे. तुमच्या समोर काही भानगडी उघडी केली असे इथल्या कोणत्याही अधिकाऱ्याने सांगावे. मग या शहराचा ठेका फक्त आम्हीच घेतला आहे का? ही पालिका कायम तुमची आहे आणि तुम्ही इथले राजे आहात. आम्ही काय आले गेले आहोत. पाच वर्षांनी लोकांनी निवडून दिले तर ठिक नाहीतर घरी बसले. परंतु, तुम्ही इथले कायमचे राजे आहात. तुम्हाला या पालिकेचे जरासुध्दा सोयरसुतक नको का? आपण या पालिकेचा पगार घेतो. म्हणून आपण याबाबत विचार करावा.

**मा. सभापती :-**

कोणाचेही पालिकेच्या उत्पन्नाकडे लक्ष नाही.

**प्रभात पाटील :-**

पालिकेच्या उत्पन्नाकडे कोणाचेही लक्ष नाही. ही खंत आहे. तुम्ही मनाली ही खंत थोडीशी लावून घ्या. ही खंत इतके दिवस लावली नसेल तर आजपासून तुम्ही आपल्या मनाला जरा प्रश्न विचारा की आपण ह्या पालिकेच्या हिताची कुठली गोष्ट केली.

**मोहन पाटील :-**

ह्यांना फक्त पगार पाहिजे.

**प्रभात पाटील :-**

मी तेच सांगते. पगार घेता त्याचा थोडा तरी विचार करा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, तुम्ही व्यापाऱ्यांकडूनसुध्दा दहा पट रक्कम घ्या.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो.) :-**

आपल्यासमोर तसं प्रकरण निश्चित यायला पाहिजे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, आपल्या समोर हे प्रकरण आलेले आहे.

**रमेश जैन :-**

साहेब, यह प्रकरण हमारे सामने आया है। मगर उसका प्रुफ नही होता है।

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो.) :-**

आप दोनो तरफसे बात करेंगे तो फिर कैसा होगा? प्रुफ करनाही पडेगा।

**ध्रुवकिशोर पाटील :-**

डॉक्टर साहेब, तुम्हाला प्रुफ करुन देणार. परंतु, तुम्ही त्याच्यासाठी एक कमिटी नेमा. ती कमिटी तुमचं उत्पन्न १०० टक्के वाढवेल. ही आमची गॅरेंटी आहे. तुम्ही चार नगरसेवकांची कमिटी नेमा. तुम्हाला गॅरेंटी देऊन सांगतो की आम्ही तुम्हाला रोजचे रु. एक लाख पॅनल्टी वसुल करुन देऊ.

**गजानन भोईर :-**

श्री. खतगावकर साहेब, आपण ठेकेदाराला अशा अटीशर्ती द्यायच्या का? मा. उपायुक्त साहेब, तुम्ही जी गाडी पकडलेली होती ती इकडे घेऊन या आणि आपल्या कर्मचाऱ्यांनासुध्दा घेऊन या.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो.) :-**

सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील, तुम्ही सांगितल्याप्रमाणे नियंत्रण समिती कार्यन्वित करण्याचे महासभेचे अधिकार आहेत. तुम्ही म्हणाल्याप्रमाणे आपल्याला तसा प्रस्ताव करता येईल.

**मोहन पाटील :-**

तुम्ही तसा प्रस्ताव तयार करा.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो.) :-**

आपण महासभेच्या मान्यतेने जकात नियंत्रण समिती नेमु शकतो.

**मोहन पाटील :-**

आपण महासभेच्या मान्यतेने जकात नियंत्रण समिती नेमु शकतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आज तुम्ही कॉन्ट्रॅक्टरबरोबर ज्या अटीशर्ती करणार आहात. तुम्ही त्याच्यामध्ये असासुध्दा क्लॉजसुध्दा टाका की जर ठेकेदाराने चुकून एखाद्या व्यापाऱ्याकडून अटीशर्तीचे उल्लंघन झाले.

**जयंत पाटील :-**

मग आपण त्याला समन्स द्यायचा.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो.) :-**

दहा पट दंडाच्या वसुलीची जी कारवाई आहे त्यासाठी त्रिसदस्यीय समिती अपेक्षित आहे. आम्ही त्यासाठी प्रस्ताव सादर करु.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

दुसरा मुद्दा असा आहे की तुम्ही कॉन्ट्रॅक्टरबरोबर ज्या अटीशर्ती करणार आहात त्याच्यामध्ये असा प्रस्ताव टाका की जर ठेकेदाराने एखाद्या व्यापाऱ्याकडून नियमबाह्य जास्त वसुली केली तर त्या ठेकेदाराची दहा पट वसुली कार्पोरेशन करेल आणि तेवढी दहापट वसुली कार्पोरेशनला भरावी. या मोबाईलचे बिल रु १५/- आहे आणि त्या कॉन्ट्रॅक्टरने रु. २० लावले तर त्या कॉन्ट्रॅक्टरवर कार्यवाही झाली पाहिजे आणि त्याने जेवढी रक्कम वसुल केली त्याच्या दहापट रक्कम कार्पोरेशनकडे भरावी असा तुम्ही क्लॉज टाका.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपले क्लॉज जे स्टॅन्डर्ड आहेत आणि ऑलरेडी पे डिसाईड आहेत. आपली ॲग्रीमेन्ट कशावर डिसाईड होणार आहेत? हे आपण आपले ओपन मार्केटमध्ये जाहिर केले आहेत. त्याच्यामुळे आपल्याला त्याच्यामध्ये काही करता येणार नाही. त्याच्या आधारे आपण दर मागितलेले आहेत. आपण कारवाईच्या अनुषंगाने जे म्हणता की एखाद्या व्यापाऱ्याकडून त्या ठेकेदाराने जास्तीची रक्कम वसुल केली. त्याच्यापूर्वी इनडायरेक्टली ही चर्चा झालेली आहे. तसा व्यापारी आपल्या समोर यायला पाहिजे. आपल्याला निश्चित कारवाई करता येईल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

व्यापारी आपल्यासमोर येतील.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

एखादा व्यापारी आपल्यासमोर आला आणि आपण निर्णय घेतला नाही अशी बाब आपण पाहू.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, तुम्ही निर्णय काय घेणार?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

व्यापारी आपल्यासमोर आल्याशिवाय आपण निर्णय घेतला नसेल तर आपण तशी बाब बघू.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, तुम्ही निर्णय काय घेणार?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्याची जी रितसर जकात आहे ती त्याच्याकडून वसुल केली जाईल आणि आपल्याकडे दंडात्मक रक्कम जमा होईल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, माझा प्रश्न तुम्हाला कळत नाही.

**एस. ए. खान :-**

त्या कॉन्ट्रॅक्टरने केस केली तर आमची जबाबदारी नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, माझ्या दोन सुचना आहेत की एक म्हणजे कमिटी आणि दुसरी म्हणजे कॉन्ट्रॅक्टकडून जास्तीत जास्त पैसे कसे वसुल केले आणि त्याने केस केली तर आमची जबाबदरी नाही.

**जयंत पाटील :-**

जकातीसंबंधी ठराव मांडण्याअगोदर आपल्या सर्व सन्मा. सदस्यांना माहिती आहे की त्या ठेकेदाराने महापालिकेकडून १ करोड ६२ लाख मिळविण्यासाठी प्रधानसचिवांकडे आपल्या विरुध्द मंत्रालयात केस टाकलेली आहे आणि ते पैसे मिळण्याची मागणी केली आहे. आपण ज्या अटीशर्ती जकात अभिकर्त्याला घातल्या होत्या, त्याचे जकात अभिकर्ता उल्लंघन करतो. नैसर्गिक आपत्तीत काही मिळायला पाहिजे हे त्या अटीशर्तीमध्ये नमुद केलेले नाही. परंतु, तो आपल्या अटीशर्तीच उल्लंघन करुन पैसे मिळविण्यासाठी आपल्याला हैराण करण्याचा प्रयत्न चाललेला आहे. त्या ठेकेदाराला आज निविदा फॉर्म भरायची गरज नव्हती. पण तो फॉर्म भरण्याचा अधिकार त्याला दिला, त्याने तो फॉर्म भरला आणि तो आज पुन्हा आपल्यासमोर येतो. मी काही जणांशी चर्चा केल्यानंतर आम्ही असं ठरवलं की, त्या ठेकेदाराचा ठेका पास करण्यापूर्वी म्हात्रे साहेबांनी त्या ठेकेदाराला बोलावून त्याच्याशी चर्चा करावी. आमच्या सर्व सदस्यांतर्फे म्हात्रे साहेबांनी मागणी करावी की त्याने आमच्यावर जी केस केलेली आहे ती मागे घ्यावी. तसेच आयुक्त आणि उपायुक्त साहेब तुम्ही आमच्या स्टॅन्डीगतर्फे बसून त्यांना तो प्रस्ताव मागे घेण्यास सांगावे.

**प्रेमनाथ पाटील :-**

ते त्याबाबत ॲग्री आहेत का? त्यांना ते मान्य आहे का? ते त्यांना विचारा.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

याठिकाणी प्रशासनाच्यावतीने मा. सभापती यांना परवानगी दिल्याप्रमाणे या ठिकाणी मी खुलासा करतो की गेल्या वर्षी झालेल्या नैसर्गिक आपत्तीमुळे म्हणजेच २६ जुलै २००५ रोजी झालेल्या पावसामुळे त्यांच्या उत्पन्नाचे नुकसान झालेले आहे. सन्मा. सदस्य जयंत पाटील साहेबांच्या म्हणण्यानुसार महापालिकेकडून भरपाई किंवा अमुक इतकी रक्कम मिळावी असे मत मांडणेच्या त्या अनुषंगाने त्यांनी आपल्याकडे केलेल्या मागणीनुसार आपल्या ११व्या महिन्यातील विविध तरुतुदीनुसार आपण ती मागणी फेटाळून लावली आहे.

ठेकेदार आणि महानगरपालिका यांच्यात काही वाद उद्‌भवल्यास ते वाद लवादासमोर अंतिम करावे आणि लवादाचे प्रतिनिधी हे प्रधानसचिव असावे अशी आपल्या करारनाम्यात तरतुद आहे. त्याप्रमाणे त्याने त्या लवादाकडे आपल्या निर्णयाच्या विरुध्द अपिल दाखल केलेले आहे. यापूर्वीसुध्दा ह्या सभागृहातील महासभेत त्या अनुषंगाने निवेदन दिलेलेच आहे. ते विषयपटलावर आहे. त्या अनुषंगाने आम्ही प्रधानसचिवांना हेरिंग लिहण्यासाठी नमुद केलेले होते. परंतु, त्यांना त्यावेळी वेळ मिळालेला नव्हता. त्यांनी आपल्याला इनडायरेक्ट सांगितलेले आहे की, यामध्ये इतर महानगरपालिकेचे आयुक्त किंवा सहसचिव लवाद असल्यास आपल्याला चालेल का? भिवंडी महानगरपालिकेचे आयुक्त यांना जर याच्यामध्ये लवाद म्हणून काम करण्याची परवानगी दिली तर त्यांनी घेऊन कामकाज करावं व त्यांना ते शक्य नसेल तर माननीय प्रधानसचिवांनी ते लवादच कामकाज कराव असा त्या अनुषंगाने महासभेने निर्णय घेऊन महासभेने मान्यता दिलेली आहे. महासभेने मान्यता दिल्याप्रमाणे हा विषय कार्यान्वित आहे. अंतिम चर्चा महासभेतच केली जाते. मग त्या महासभेच्या मान्यतेप्रमाणे प्रशासकीय कार्यवाही त्यामध्ये चालू आहे. अजुन लवादाचे कार्य गठीत झालेले नाही आणि अजुन कामकाज सुरु झालेले नाही. भविष्यात लवादांनी काहीही निर्णय दिला तरी ते महासभेसमोर आणून सादर केले जाईल आणि महासभेने दिलेल्या निर्णयानुसार प्रशासन भविष्यात कार्यवाही करेल तो मॅटर आज या निर्णयाशी संघटीत करणे किंवा सन्मा. सदस्य महोदयांनी मांडलेल्या सुचनेप्रमाणे ठेकेदाराला निविदा न देणे तो एक वेगळा विषय आहे. त्यांनी जर आपला मान ठेवून किंवा आपल्याशी चर्चा करुन तो विषय मागे घेतला तर अजुन त्या विषयामध्ये फलपुर्ती होईल. याला माझी हरकत नाही पण त्याला अट प्रशासनाच्यावतीने घालता येणे योग्य नसल्यामुळे आपण त्याच्याशी निश्चितच चर्चा करायला हवी.

**जयंत पाटील :-**

निविदा फेटाळली असं मी म्हणत नाही.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

आपल्या सर्वांच्या सुचना विचारात घेतल्या जातील.

**जयंत पाटील :-**

अटीशर्ती घातल्या होत्या. तो ठेकेदार त्यांच पालन करीत नाही.

**रतन पाटील :-**

तो अटीशर्ती काहीच मानत नाही.

**जयंत पाटील :-**

तो आपल्या अटीशर्तीच्या विरोधातसुध्दा तो प्रधानसचिवांकडे गेला. आम्ही ज्या अटीशर्ती घालतो त्या अटीशर्तीबद्दल किंवा नविन ठेकेदाराला घालण्यात येणाऱ्या अटीशर्तीबद्दल कोणालाही माहिती नाही. मा. सभापती साहेब, आज आम्ही ठेका मंजुर करणार आहोत. त्यात काय? आणि कुठल्या अटीशर्ती आहेत? ठेका कोणाला दिलेला आहे हे माहिती आहे का?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

अटीशर्ती पब्लिश केलेल्या आहेत.

**मोहन पाटील :-**

अटीशर्ती पब्लिश आहेत.

**जयंत पाटील :-**

कुठल्या अटीशर्ती पब्लिश झालेल्या आहेत? ते आम्हाला माहिती नाही. आपण कुठल्या अटीशर्तीखाली ठेकेदाराला ठेका देतो हे माहित असायला नको का? तसेच स्थायी समितीलाही माहित असायला नको का?

**प्रभात पाटील :-**

त्या अटीशर्ती स्थायी समितीसमोर आलेल्या होत्या.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

आपण प्रारुप नियमासोबत त्या महासभेला सादर केलेल्या आहे.

**जयंत पाटील :-**

आम्हाला कदाचित माहिती नसेलही. साहेब, आपल्या अटीशर्ती ठेकेदार मान्य करीत नाही हे तर तुम्ही मान्य करा.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

आम्ही आपली सुचना विचारात घेऊ.

**जयंत पाटील :-**

आमची सुचना वेगळा भाग आहे. तुम्ही सभागृहाच मत घ्या.

**मोहन पाटील :-**

जेव्हा आपण त्याच्यामध्ये लवाद नेमायचा प्रश्न मांडला त्यावेळी आपण महासभेत हाही प्रश्न उपस्थित केला होता की प्रश्न पुन्हा आमच्याकडे आला आणि कोर्टात गेला तर त्यावेळी आम्ही सुप्रीम कोर्टात जाऊ अशाप्रकारे आपण आपले म्हणणे मांडले होते. त्याठिकाणी त्यांचा लवाद मंजुर झाल्यास तो पुन्हा आपल्याकडे येईल. म्हणजे. महासभेपुढे हा प्रश्न पुन्हा येईल. महासभेला याबद्दल निर्णय देण्याचा अधिकार आहे.

**जयंत पाटील :-**

साहेब, तुमचं म्हणणं बरोबर आहे. परंतु, आज तुमच्याकडे निविदा मंजुरीसाठी आल्यानंतर तुम्ही त्यांच्याशी अन ऑफिशिअली चर्चा करुन घ्या.

**रतन पाटील :-**

तुम्ही त्यांच्याशी चर्चा करुन घ्या.

**जयंत पाटील :-**

साहेब, तुमची इच्छा असेल तर तुम्ही संध्याकाळी त्या ठेकेदाराला बोलावून त्यांच्यांशी चर्चा करुन घ्या आणि उद्या पुन्हा सभा घ्या. आजची सभा इथेच तहकुब करा.

**मोहन पाटील :-**

तो विषय वेगळा आहे. ठेकेदार अटीशर्ती मानत नाही. त्याच्या लवादाबाबत विषय असल्यामुळे तो अटीशर्ती न मानता कोर्टात गेलेला आहे.

**जयंत पाटील :-**

तो १ करोड ६२ लाख तुमच्याकडे का मागतो? त्याच्या म्हणण्यानुसार २१ दिवसात त्याचे नुकसान झालेले आहे. परंतु, आपल्या अटीशर्तीमध्ये काय आहे? त्याचा विचार करा. तो ठेकेदार आपल्या अटीशर्ती मानत नाही.

**मोहन पाटील :-**

तो ठेकेदार आपल्या अटीशर्ती मानत नाही. म्हणून त्याने लवादाची मागणी केलेली आहे.

**जयंत पाटील :-**

तरी तो तुमच्या अटीशर्ती मानेल अशी खात्री आहे.

**मोहन पाटील :-**

त्या ठेकेदाराने लवाद मान्य केलेला आहे. त्या लवादाचा निर्णय झाल्यानंतर आपल्याकडे तो निर्णय येणार आहे.

**रतन पाटील :-**

आपल्याला त्या ठेकेदाराशी बोलून पुन्हा चर्चा करायला हरकत नाही.

**गजानन भोईर :-**

आम्ही ठेकेदाराच्या अटीशर्तीबाबत बोलत आहोत.

**मोहन पाटील :-**

या विषयाशी लवादाचा विषय विसंगत आहे. सन्मा. सदस्य रतन पाटील तुमची सुचना योग्य आहे. आम्ही तुमची सुचना मान्य केलेली आहे. सुचना मान्य केल्याप्रमाणे तुम्ही त्या ठेकेदाराला प्राचारन केलेले होते. मग या विषयाशी तो विषय पूर्ण विसंगत आहे. आता तुम्ही याबाबत आम्हाला सहकार्य करा असे आपण त्यांना सांगु.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

आपण कार्यवाही करु.

**रतन पाटील :-**

विषय विसंगत असला तरी एकच आहे.

**जयंत पाटील :-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील साहेब, मी तुमच्या अटीशर्तीबाबत बोलत आहे. त्याच अटीशर्ती आहेत. जेव्हा आपण त्या ठेकेदाराला मंजुरी देतो. याचा अर्थ त्या ठेकेदाराने आपल्या विरोधात जे काही केलेले आहे, आम्ही त्याला राजमान्यता दिली असा अर्थ झाला.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

आपण त्याच्याशी शेवटपर्यंत भांडू.

**जयंत पाटील :-**

महासभेने भांडण्याचा निर्णय घेतलेला आहे. असे माझे प्रामाणिक मत आहे. तुम्ही त्या ठेकेदाराला बोलावून घ्या.

**रतन पाटील :-**

तुम्ही ठेकेदाराला बोलावून घ्या आणि त्याच्याशी चर्चा करुन घ्या.

**सुधीर नाकाडी :-**

आता निविदा मंजुरीचा विषय आलेला आहे. निविदा मंजुरीच्या विषयामध्ये अशाप्रकारे इम्प्लीमेन्ट करायला प्रॉब्लम होईल. निविदा मंजुर करायची की नाही हा निर्णय प्रथम स्थायी समितीने घ्यायचा आहे. त्यांचे मत घेऊन निविदा मंजुर करु शकतात.

**रतन पाटील :-**

श्री. नाकाडी साहेब, तो विषय वेगळा आहे.

**जयंत पाटील :-**

तुम्ही उद्या परत मिटींग घ्या. निविदा मंजुर करणार नाही असं आम्ही म्हणतच नाही.

**रतन पाटील :-**

तुम्ही आजच्या आज त्या ठेकेदाराशी चर्चा करा.

**जयंत पाटील :-**

आज तुम्ही विषय मंजुर केल्यानंतर आपण केलेल्या चर्चेला काय अर्थ राहणार आहे?

**रतन पाटील :-**

साहेब, शहरामध्ये एक वेगळा मॅसेज जाईल.

**सुधीर नाकाडी :-**

चर्चा केल्यानंतर निविदा निघतील.

**रतन पाटील :-**

तुम्ही लगेच विषय मंजुर करुन घ्या. मी विषयाच्या संदर्भात बोलत नाही.

**जयंत पाटील :-**

तुम्ही चर्चा करणार आहात. तुमच्याबरोबर आमचे सभापती येतील.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आम्ही चांगलेच करणार आहोत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आपण ठराव मांडूया आणि मंजुर करुन घेऊया.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आम्ही जे करातोय ते शहराच्या भल्यासाठी करतोय. शहरात वेगळा मॅसेज जाणार नाही याची खबरदारी घेऊया.

**जयंत पाटील :-**

समजा, लवादांनी निर्णय ठेकेदाराला १ करोड ६२ लाख द्या. आम्ही हायकोर्टात किंवा सुप्रिम कोर्टात गेलो आणि सुप्रिम कोर्टाने आमच्या विरोधात निर्णय दिला तर आपल्या शहराचे १ करोड ६२ लाखाचे नुकसान होणार आहे.

**मोहन पाटील :-**

हा विषय पुन्हा महासभेला जाईल.

**गजानन भोईर :-**

आपल्याला कोर्टाने दिलेला निर्णय पाळावा लागेल.

**जयंत पाटील :-**

कोर्टाचा निर्णय लागण्यासाठी कमीत कमी एक वर्षाचा कालावधी जाईल. आज तुम्ही मंजुरी दिल्यानंतर एक वर्षाचा कालावधी जातो.

**रतन पाटील :-**

श्री. खतगावकर साहेब, जर तो ठेकेदार आज हजर असेल तर तुम्ही आजच्या आज त्यांच्यांशी चर्चा करुन घ्या. आजच्या आज चर्चा करुन जो काही निर्णय असेल तो आजच्या आज होऊन जाईल.

**मोहन पाटील :-**

एखाद्या विषयासंबंधी निर्णय मान्य करायचा असेल तर तुम्ही मान्य करु शकता. पण जर तुम्हाला मान्य करायचा नसेल तर जाऊ द्या.

**जयंत पाटील :-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील साहेब, तुम्ही या विषयाकडे वेगळ्या अँगलने बघू नका.

**रतन पाटील :-**

हा विषय टाळू नका.

**जयंत पाटील :-**

आम्ही हा विषय टाळत नाही.

**रतन पाटील :-**

तुम्ही लवादांना बोलवा. त्या ठेकेदाराशी जे काही बोलायचे ते साहेबच बोलतील. आपण काहीच बोलायच नाही.

(सन्मा. सदस्य श्री. ध्रुवकिशोर पाटील ह्यांनी प्रकरण क्र. २८ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**ग्रिटा फॅरो :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, सर्व सन्मा. सदस्यांच्या सुचना विचारात घेतल्या जातील.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

याच्यापुढे दोन गोष्टी आहेत. एक म्हणजे सन्मा. सदस्य जयंत पाटील यांनी वेगळा मुद्दा मांडलेला आहे आणि दुसरी गोष्ट म्हणजे तो मार्केटिंग करीत आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सन्मा. सदस्य जयंत पाटील यांनी मांडलेल्या सुचनांचा विचार करण्यांत यावा.

**गजानन भोईर :-**

तुम्ही ठेकेदाराला अटीशर्ती देऊ नका.

**जयंत पाटील :-**

मला माझे मत मांडण्याचा अधिकार आहे. तो ठेकेदार आपल्या विरोधात गेलेला. जोपर्यंत तो माघार घेत नाही तोपर्यंत माझा या विषयाला विरोध राहील. नोंद करून घ्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, तुम्ही त्या ठेक्यामध्ये योग्य त्या अटीशर्तीसह अशा ज्या सुचना मांडलेल्या आहेत. त्या सगळ्या सुचना विचारात घेऊनच तुम्ही तो ठेका मंजुर करावा.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

आमच्या म्हणण्याचा उद्देश एवढाच आहे की ठेकेदार जोपर्यंत केस विड्रॉ केली जात नाही तर त्याला ठेका द्यायचा नाही का?

**जयंत पाटील :-**

आपण ज्या विषयावर बोलत आहोत. तो ठेकेदार ठेक्यामध्ये घातलेल्या अटीशर्ती मान्य करत नाही. सगळ्यांना आपल्या खिशात ठेवतो. मंत्रालयात सारख्या फेऱ्या मारतो आणि तो तुम्हालाही फेऱ्या मारायला लावणार आहे.

**प्रभात पाटील :-**

आज तो ठेकेदार गेली कित्येक वर्षे या शहराचा ठेका घेत आहे. ही व्यक्ती तिसऱ्यांदा त्या पदावर कार्यरत आहे. मग त्यानेही समजून घ्यायला पाहिजे.

**जयंत पाटील :-**

आम्ही त्याला ठेका द्यायच्या विरोधात नाही.

**प्रभात पाटील :-**

जर त्या ठेकेदाराला आपल्याकडे राहून धंदाच करायचा आहे. आपल्या शहरामध्ये स्वतःचे मार्केटिंग जमवत असेल तर त्याने निश्चितच आपल्या शहराच्या आचार-विचारांचा आणि फायद्याचा विचार लक्षात ठेवला पाहिजे. त्याला आपल्याबरोबर धंदाच करायचा असेल तर त्याने विरोधात जाऊन फायदा नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, आता आपण ठराव मांडलेला आहे. उद्या जर तो ठेकेदार तुमच्याकडे आला आणि म्हणाला की मला ठेका मागे घ्यायचा नाही. तर तुम्ही काय कराल?

**एस. ए. खान :-**

साहेब, जो काय निर्णय घ्यायचा आहे तो तुम्हालाच घ्यायचा आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, जो निर्णय तुम्हाला योग्य वाटतो तो तुम्ही घ्या.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

त्यांनी जसा ठराव मांडला तसे रुलिंग द्याचे की आम्हाला तुमचा ठेका मंजुर करता येत नाही.

**जयंत पाटील :-**

आपण ठेकेदाराला रु. १ करोड ६२ लाख मिळू नये म्हणून असे करीत आहोत.

**मा. सभापती :-**

पुढे काहीही होणार नाही याची खबरदारी घेतली पाहिजे. आपल्याला हा ठराव बारगाळवायचा नाही म्हणून आपल्याला निर्णय १०० टक्के घ्यायचा आहे. आपण याविषयी आजच चर्चा करुन निर्णय ताबडतोब घ्या.

**जयंत पाटील :-**

आम्ही सभागृहात आहोत. तुम्ही सभागृहाची वेळ वाढवा.

**मा. सभापती :-**

आपण याला विरोध करायचा नाही. आतापर्यंत सभागृह खेळीमेळीच्या वातावरणात चाललेले होते. मग आता कशाला वाद वाढवून सभागृहाच वातावरण बिघडवायचं?

**मोहन पाटील :-**

तुम्ही बोलता ते बरोबर आहे. पण त्याने हा लवाद मंजुर केल्यानंतर विषय कुठे गेला? पुन्हा हा विषय महासभेपुढे येणार.

**रतन पाटील :-**

आपण विषय मागे घेतल्यावर विषय संपतो.

**मोहन पाटील :-**

त्या ठेकेदाराने लवाद मंजुर केल्यावर हा विषय महासभेत जाईल.

**जयंत पाटील :-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील, हा महासभेचा विषय नाही. तुम्ही वेगळे काहीतरी सांगू नका. हा विषय लवाद मंजुरीचा नाही.

**मोहन पाटील :-**

लवाद मंजुर करायचा की नाही हा महासभेचा विषय आहे.

**मा. सभापती :-**

आपण ही सभा उद्यापर्यंत चालू ठेऊ शकतो.

**मोहन पाटील :-**

उद्यापर्यंत चालू ठेवा किंवा १०दिवसापर्यंत सुरु ठेवा, काहीही फरक पडणार नाही. त्याने एखादी केस कोर्टात केली किंवा गर्व्हमेन्टकडे केली त्यात नुकसान आपलं आहे. आपल्या नियमात आरबिटिशन पॉवर्सचा उल्लेख आहे.

**रतन पाटील :-**

ही केस सिव्हिल कोर्टात जाईल.

**मोहन पाटील :-**

तुम्ही त्या ठेकेदाराला तुमच्या अटीशर्ती लावा.

**रतन पाटील :-**

तुम्ही त्या ठेकेदाराला बोलावून आणा. साहेब, तुम्ही आमची भावना समजून घ्या. तुमच्या भावनाही आहेत आम्हाला ते मान्य आहे. आम्ही नाही कुठे म्हणतोय.

**मा. सभापती :-**

आपण हा बाकीचा विषय पुढच्या वेळेला घेऊया.

**प्रेमनाथ पाटील :-**

श्री. खतगावकर साहेब, आपल्याकडे वाहन आणि चालक पाहिजे म्हणून एक निविदा आलेली होती. मागच्या वेळेला जे वाहन आणि चालक पुरवत होते त्यांच्या पेमेन्टचे काय झाले? त्यांना अजुन आठ-आठ महिन्यांचे पेमेन्ट मिळालेले नाही.

**मा. सभापती :-**

आता तो विषय नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, निविदा मागितलेली होती, ती निविदा परवाच्या पेपरला आली होती. त्यांच्याकडे तरतुद नाही मग ते नुसतेच कशाला निविदा मागवतात.

**संजय तायशेट्ये :-**

चार-पाच बिलं होती. एका बिलचे पेमेन्ट केलेले आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

हे वाहन चालक गाड्या घेतात त्यांच्याकडे आठ-आठ महिन्यांचे पेमेन्ट बाकी आहे.

**मा. सभापती :-**

असे किती तरी विषय आहेत. नंतर हा विषय घ्या.

**प्रेमनाथ पाटील :-**

आता नविन वर्षासाठी पाहिजे म्हणून पुन्हा निविदा आलेली आहे.

**संजय तायशेट्ये :-**

तो विषय गाड्या पुरविण्याचा होता. आता गाड्या आणि चालक पुरविण्याचा आहे.

**मोहन पाटील :-**

आता जी निविदा आली ती ठेक्यावर घेण्याबाबत आहे का?

**अजिज शेख (मा. उपायुक्त सो.) :-**

आता जी निविदा प्रसिध्द केलेली आहे, ती वाहने ठेका पध्दतीने घेण्याबाबतची आहे.

**प्रकरण क्र. २८ :-**

सन २००६-०७ या आर्थिक वर्षासाठी जकात वसुलीकामी (जकात अभिकर्ता) निविदा मंजुरी बाबत.

**ठराव क्र. २९ :-**

मे कोणार्क इन्फ्रा. प्रा.लि. यांचा सन २००५/०६ सालातील जकात वसुलीचा करार हद. २२/६/२००६ रोजी संपुष्टात येणार होता. त्यामुळे सन २००६/०७ साला करीता जकात वसुली अभिकर्त्याची नेमणूक करणे करिता खालील प्रमाणे देकार रक्कम निश्चित करण्यात आलेली आहे.

| | | |
|---|---|---|
| सन २००५/०६ सालातील देकार<br>(कालावधी २३/०६/०५ ते २२/०६/०६ पर्यंत) | - | ६०,३०,६०,१११/- |
| शासन जी.आर. प्रमाणे १०% वाढीव रक्कम | - | ६,०३,०६,०११/- |
| सन २००६/०७ सालाकरीता निश्चित केलेली एकूण देकार रक्कम | - | **६६,३३,६६,१२२/-** |
| • शासन G.R. नुसार ५% इसारा रक्कम | :- | ३,३१,६८,३०६/- |
| • शासन G.R. नुसार १६% सुरक्षा अनामत | :- | १०,६१,३८,५८०/- |
| • निविदा फॉर्म फी | :- | १०,००० (प्रतिफॉर्म) |

वरील प्रमाणे सन २००६/०७ सालातील जकात वसुली अभिकर्त्याची नव्याने नेमणूक करणे करिता दि. १७/०५/२००६ रोजी १) दै. सामना, २) दै. दि. इंडियन एक्सप्रेस, ३) दै. सकाळ, ४) दै. नवभारत टाईम्स (हिंदी) आणि ५) दै. सुरज प्रकाश (स्थानीक) वरिल वृत्तपत्रामध्ये जाहिराती देऊन जकात वसुलीकामी निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. त्यामध्ये निविदा फॉर्म विक्रीची, इसारा रक्कम भरण्याची, अंतिम निविदा स्विकारण्याची तसेच निविदा उघडण्याची तारीख व वेळ निश्चित करण्यात आली होती. त्यापैकी मुदतीत दि. ३०/०५/२००६ पर्यंत खालील इच्छुक निविदा धारकांनी निविदा फॉर्म फी रु. १०,०००/- भरुन निविदा फॉर्म विकत घेतले आहेत.

(१) मे. इंद्रदिप कन्स्ट्रक्शन कंपनी
(२) मे. इगल कन्स्ट्रक्शन कंपनी
(३) मे कोणार्क इन्फ्रा. प्रा.लि.
(४) मे. ओमसाई इंटरप्राईजेस
(५) मे. यश इंटरप्राईजेस
(६) मे. वक्रतुंड सर्व्हिस प्रा. लि.
(७) मे. आयडियल रोड बिल्डर्स प्रा. लि.
(८) मे. कोहिनुर इन्फ्रास्ट्रक्चर

वरीलपैकी एकूण दोन निविदाधारकांनी मुदतीत दि. ३०/०५/२००६ रोजी सायं. ४.०० वाजे पर्यंत लखोट्यात निविदा सादर केल्या होत्या.

१) मे. कोणार्क इन्फ्रा. प्रा.लि.
२) मे. आयडियल रोड बिल्डर्स प्रा. लि.

प्राप्त निविदांची निविदा समिती समोर, निविदा उघडण्याची कार्यवाही मुदतीत दि. ३०/०५/२००६ रोजी सायं. ५.०० वाजता सुरु करण्यांत आली. त्यामध्ये दोन्ही निविदाधारकांनी दिलेल्या अटीशर्तीनुसार लखोटा नं. १ मधील बाबींची पुर्तता केल्याचे दिसुन आल्याने दोन्ही निविदा धारकांचे नियमानुसार लखोटा नं. २ उघडण्यांत आले. त्यामध्ये खालीलप्रमाणे देकार रक्कम निविदाधारकांनी निविदेत नमुद केल्या आहेत.

| **अ.क्र.** | **निविदाधारकाचे नांव** | **देकार रक्कम** |
|---|---|---|
| १ | मे. आयडियल रोड बिल्डर्स प्रा. लि. | ६६,३४,६५,०००/- |
| २ | मे. कोनार्क इन्फ्रा. प्रा. लि. | **६६,४५,३३,०००/-** |

वरील उघडलेल्या निविदांची तुलनात्मकरित्या पहाणी केली असता मे. कोणार्क इंफ्रा. प्रा.लि. यांची देकार निविदा सर्वात जास्त रकमेची रु. ६६,४५,३३,०००/- (अक्षरी रुपये सहासष्ट कोटी पंचेचाळीस लाख तेहतीस हजार मात्र) असल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ८ (काधान नियम) कलम ३५ अन्वये सन २००६/२००७ या आर्थिक वर्षासाठी ज्यादा देकर रक्कमेची निविदा स्विकारुन त्याच बरोबर योग्य त्या अटीशर्तीसह करारनामा करण्यांस ही स्थायी समिती सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील.** **अनुमोदन :- श्रीम. ग्रिटा फॅरो.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. २९ चे वाचन केले.)

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

पूर्वी आपल्याकडे कमी तरतुद होती. त्यामुळे जी बिलं आहेत त्याबाबत मी असे सांगेन की साईसिध्दीची बिले तरतुदी अभावी प्रलंबित होती. मागच्या वर्षी साईसिध्दीची बिले दिली गेल्यामुळे आताच्या करंट ठेकेदारांची बिले मंजुर करण्यासाठी अडचण होत आहे. बजेट मंजुर झाल्यानंतर तो प्रस्ताव आपण परत त्यांच्याकडे पाठविलेला असल्यामुळे ती बिलं आता परत लेखा विभागाकडे आलेली आहेत. त्यातील दोन बिलं गेल्या आठवड्यात काढलेली आहेत. साधारणतः ह्या येत्या पंधरा दिवसात त्यांचे निर्णय होतील. त्यांत काही प्रॉब्लम नाही.

**केशव घरत :-**

साहेब, आपल्याकडेसुध्दा वाहने कमी आहेत का?

**मा. सभापती :-**

मागची बिलं शिल्लक राहिल्यासंबंधी आयुक्त साहेबांनी माझ्याकडे माहितीसाठी पत्र पाठवलेलं होते. सर्व विभागाचे मुख्य तुम्हीच राहणार आहात. तुम्ही ह्या बिलाचे उत्तर दिले असते तर तुमच्यावर जबाबदारी आली नसती.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

यावर्षी जी प्रत्येक कामाची बजेट तरतुद आहे त्या तरतुदीनुसार अधीन त्या कामाची जी बिले आणि काही प्रलंबित बिले व काही प्रस्तावति कामे प्रगती पथावर असतील त्याची अमाऊन्ट यावर्षीच्या बजेट तरतुदीनुसार विचारात घेऊन पुढील कामे प्रस्तावति करावी. जेणेकरुन पुढच्या वर्षी असा प्रश्न पुन्हा उद्‌भवणार नाही. यासाठी असे सर्क्युलर आयुक्त साहेबांनी काढलेले आहे. उदा. सर्व बिलं ही बांधकाम विभागाचीच असतील, रु. २५ लाखाची बिलं ऑलरेडी द्यायची असतील तर त्यांनी रु. १ कोटीची तरतुद आहे म्हणून १ कोटीचीच कामे प्रस्तावित न करता फक्त रु. ७५ लाखाचीच कामे प्रस्तावित करावी असा मा. आयुक्त साहेबांचा त्यामागचा हेतु आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, बिल प्रलंबित राहण्याचे कारण काय आहे? कारण आम्ही मागच्या बजेटमध्ये बजेटनुसारच कामे काढलेली होती.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

मी दोन गोष्टी तुमच्या लक्षात आणून देऊ इच्छितो. विकास आणि आर्थिक निधी या दोन महत्वाच्या गोष्टी आहेत. विकास करण्यासाठी प्रत्येकाचीच इच्छा असते.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, खरी गोष्ट आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

काही नागरिकांच्या मागण्या असतात. आपलं मनोदय असते. परंतु, पैसा हा मॉनेटरी आहे, तो फिक्स आहे. तो खर्च करताना आपल्याला काही लिमिटेशन असतात. त्या लिमिटच्या बाहेर जाऊन आपण प्रस्थापित काम करु शकत नाही आणि आपली गंगाजली कमी होऊ नये. हा त्या मागचा चांगला उद्देश आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, मी तुम्हाला आणखीन चांगल उदाहरण देतो. आपले वार्षिक दुकानदार आपल्या मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये किती दुकानदार आहेत? अंदाजे ५० हजार दुकानदार असतील. अंदाजे ५० हजार दुकानदारांची वार्षिक रेन्युव्हलची फी रु. ५००/- असेल. मी तुम्हाला उत्पन्नाबद्दलच सांगतो. आपलं उत्पन्न कसे वाढतं? ते बघा. रु. ११ करोडच्यावर पैसे वाढवू शकतो. आपण फक्त ५० हजार रेन्युव्हल परवानाचे पकडले. आपल्याकडे १० हजार कारखाने आहेत. अंदाजे, कारखान्याची फी रु. ३०००/- आहे. त्यात पाणीपट्टी, रसपान, हॉस्पीटल, डिस्पेन्सरी इ. आहेत. या सर्वांपासून मिळणारे उत्पन्न कमीतकमी रु. १२ ते १३ करोड उत्पन्न वाढू शकते.

**रतन पाटील :-**

परंतु, ह्याच्यावर लक्षच नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

ह्या उत्पन्नावर कोणाचेही लक्ष नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आस्थापना झाली की कामे जास्त वाढतात. खर्च जास्त होतो. त्याचा फायदा होतो.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. उपायुक्त साहेब, ह्या बजेटमध्ये मी अशी सुचना केली होती की आपण जी हाऊस टॅक्सची बिलं देतो, त्याच्याबरोबरच रेन्युव्हलच्या परवानाची बिले द्या. त्याच्यामध्ये आपले उत्पन्न आपोआप वाढेल. आपण जी शॉप, इंडस्ट्रीची, दुकानदाराची हाऊस टॅक्स म्हणून बिले दिली की त्याबरोबर आपले उत्पन्न आपोआप वाढेल. परवाना रेन्युव्हलचे आले की समोरासमोर बिले द्या. ज्याप्रमाणे आपण जन्म-मृत्युचे दाखले देतो. तसे फक्त

डिपार्टमेन्ट करा आणि लगेच देऊन टाका. त्याच्यामुळे रेन्युव्हलसाठी जी लोक येतात त्यांना रु. ३०००/- द्यायचे असतील तर देता येतील.

**रतन पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचा हा सगळा पैसा बाहेर जातो.

**प्रेमनाथ पाटील :-**

गुमास्ता लायसन्स आणि आपले परवाने हे वेगवेगळे आहेत.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा.) :-**

आपल्याकडे परवान्याची फी किती होती?

**प्रेमनाथ पाटील :-**

आपल्याकडे परवान्याची फी रु. ३०००/- आहे. दुकानदाराची फी रु. ५००/- आहे. पानपट्टीची रु. २५०/- फी आहे आणि हॉटेलचे रु. १०,०००/- आहे.

**मिलन पाटील :-**

ठेक्याने वाहने घेण्याबाबत वाहनांचा विषय आलेला होता. परंतु, आपली त्याबाबत काय प्रोसीजर आहे? आपल्याकडे ज्या म्युनिसिपाल्टीच्या गाड्या आहेत. जेव्हा त्या गाड्या आपल्या हद्दीच्या बाहेर जाताना मा. आयुक्त साहेबांची परमिशन घेतात का? अशा किती गाड्या आहेत?

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, तुम्ही ठराव घ्या आणि इम्प्लीमेन्टेशन करा.

**रतन पाटील :-**

साहेब, तुम्ही ठराव कशाला घेता? चर्चा करा.

**प्रभात पाटील :-**

ह्याचा प्रस्ताव येणे आवश्यक आहे.

**रतन पाटील :-**

प्रत्येक वेळेला प्रस्ताव आणावा लागेल.

**प्रेमनाथ पाटील :-**

ही लोक रु. १०००/- च्या पावत्या फाडतात.

**प्रभात पाटील :-**

आपले सचिव काय करतात?

**मिलन पाटील :-**

परमिशन न घेता गाड्या गेल्या असतील त्यांचे काय? आम्ही म्युनिसिपाल्टीच्या ब-याच गाड्या ठाण्याला वगैरे बघतो. मनोरीपर्यंत गाड्या जातात. आपल्या म्युनिसिपाल्टीच्या गाड्या वाड्यापर्यंतसुध्दा जातात. आम्ही तुम्हाला फोटो काढून देऊ का? या गाड्या मालाडला जातात. मोबाईलमधून फोटो काढून देऊ शकतो. परंतु, त्या गाड्या जातात. तुमची परमिशन घेत नाहीत. आपल्या गाड्या नाशिक आणि मुरबाडपर्यंत घेऊन जातात. आम्हाला नक्की परिस्थिती समजु दे. कारण आपल्याकडे ब-याच गाड्या आहेत.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा.) :-**

मी अधिकारी आहे. माझ्याकडे अजुनही गाडी नाही आणि माझ्याकडे गाडीचा विषय आलेला आहे. इथे गाडीसाठी कोणीही प्रयत्न करीत नाही म्हणून मला फ्रस्ट्रेशन वाटायचे. तुम्ही सांगाता म्हणजे मला वाटते ते आहे. जे फॅक्ट आहे ते मी तुम्हाला सांगतो.

**केशव घरत :-**

साहेब, आपल्या गाड्यांची कन्डीशन खुप खराब आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा.) :-**

आपल्या गाड्या बाहेर कुठेही घेऊन जाण्या एवढ्या चांगल्या आहेत का?

**मिलन पाटील :-**

आपल्या भरपुर गाड्या बाहेर जातात. आपण म्युनिसिपाल्टीसाठी एवढ्या गाड्या घेतल्या त्या गेल्या कुठे? आणि आपण जर आता प्रासव्हेट गाड्या घेतल्या तर कुणाला कळणार देखील नाही की, ती गाडी म्यनिसिपाल्टीची आहे की प्रायव्हेट आहे. आज आपण जर या प्रायव्हेट गाड्या घेतल्या तर उद्या कोणीही आपल्या गावाला घेऊन गेले तरी आपल्याला कोणाला कळणार नाही की ती गाडी आपल्या खात्यातली आहे की नाही. आपण जेव्हा त्या गाडीवर मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या नावाची प्लेट वाचतो तेव्हा आपल्याला कळत की ती गाडी महापालिकेची आहे. आजच मी दोघा-तिघांना आमच्या हायवेला त्या गाडीसमोर माझी गाडी आडवी घालून पकडलेले होते. त्या लोकांना विचारले तर ती लोक थरथरतात.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य मिलन पाटील, आता हा विषय घेण्याची काहीही आवश्यकता नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. सभापती साहेबांचे म्हणणे बरोबर आहे. आपण जो ठराव करतो त्याचे इम्प्लीमेन्टेशन होत नाही. आपण मागच्या वेळेला मा. महापौर, मा. उपमहापौर, शिक्षण मंडळाचे सभापती, अभियंता यांना तुम्ही गाड्यांचा ठराव पास केलेला होता. परंतु, गाड्यांची ऑर्डर दिलेली नाही. माझ्या माहितीप्रमाणे एकाच गाडीची ऑर्डर दिलेली होती. आपण जो ठराव पास केला तो प्रशासनाने आणलेला होता.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

आम्ही तो ठराव आणलेला नव्हता.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही आमचा ठराव रिजेक्ट करा किंवा त्या ठरावावर इम्प्लीमेन्टेशन करा.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

मा. सभापती महोदयांनी मला गाडी नको असे स्वतः आयुक्त साहेबांकडे कमिटमेन्ट केलेले होते.

**मा. सभापती :-**

जर आपल्याकडे पाच गाड्या एक्स्ट्रा येत असतील तर मला नको.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही कोणाच्याच गाड्या मागवू नका. सगळ्या गाड्या कॅन्सल करा.

**मा. सभापती :-**

आम्ही शिक्षण मंडळाच्या गाड्या मागितलेल्या आहेत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही एकच गाडी मागितलेली आहे. मग बाकीच्या गाड्यासुध्दा मागितल्या पाहिजेत.

**जयंत पाटील :-**

ह्या ज्या गाड्या बाहेर जातात. जर त्या गाड्यांना बाहेर अपघात झाला तर काय करणार? त्याला जबाबदार कोण आहे? या गाड्या कोण दुरुस्त करणार?

**मा. सभापती :-**

या गोष्टीला प्रशासन जबाबदार राहिल.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

वाहन विभाग प्रमुखाची जबाबदारी राहिल. आपल्याला ही गोष्ट गांभीर्याने घ्यावी लागेल. उद्या काही ॲक्सिडन्ट झाले किंवा काही इश्यु झाला तर तो वेगळा भाग आहे.

**रतन पाटील :-**

मागच्या वेळेला इश्यु झालेला होता.

**प्रभात पाटील :-**

राईला इश्यु झालेला आहे.

**जयंत पाटील :-**

राईला असा इश्यु झालेला आहे आणि एका रात्रीत गाड्या दुरुस्त केलेल्या आहेत.

**प्रभात पाटील :-**

राईल एक मुल गाडीखाली गेलेले होते.

**जयंत पाटील :-**

गाडीला एका रात्रीत पॅच लावून कलर मारुन ठेवलेला होता.

**मिलन पाटील :-**

आपल्या म्युनिसिपाल्टीच्या गाड्या बाहेर जात नाहीत का?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

बाहेर म्हणजे कुठे?

**मिलन पाटील :-**

बाहेर म्हणजे मिरा भाईंदरची हद्द सोडून गाडी जात नाही का? गाडी महापालिकेची हद्द सोडून जात असेल तर त्याला सचिव आणि आयुक्तांची परमिशन घ्यावी लागेल.

**रतन पाटील :-**

जर गाडी प्रशासकीय कामासाठी बाहेर जात असेल तर परमिशनची नक्कीच आवश्यकता असते.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ठाणे आणि मुंबईच्या बाहेर जायलासुध्दा परमिशन घ्यावी लागते.

**प्रभात पाटील :-**

गाडी पालिकेच्या हद्दीत असेल तरी परमिशन लागते.

**मा. सभापती :-**

मुंबई आणि ठाण्याच्या बाहेर गाडी न्यायला परमिशन आवश्यक असते.

**प्रेमनाथ पाटील :-**

श्री. खतगावकर साहेब, तुम्हाला आता इन्कम सोर्सबाबत सांगितलेले. त्याच्यावर कार्यवाही होणार आहे की नाही? इन्कम सोर्स वाढणार आहे का?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो.) :-**

या ठिकाणी वेगवेगळ्या व्यवसायाचे लायसन्स आणि त्याचे रेन्युव्हल कारखाने, पानपट्ट्या, हॉस्पीटल, हॉटेल्स व्यवसाय ह्याच्यासाठी निश्चितच एक महिना जाणार आहे. आम्ही तो अहवाल एक महिन्यानंतर सादर करु.

**प्रेमनाथ पाटील :-**

त्याच्यामुळे इन्कम सोर्स वाढणार आहे.

**प्रभात पाटील :-**

तुम्ही ह्याच्यामध्ये एक गोष्ट मेन्शन करा की मिरा भाईंदर शहरामध्ये खाजगी शाळा किती आहेत? तुम्ही या खाजगी शाळांवर आकारणी करा. कित्येक शाळांवर घरपट्टीची आकारणी केलेली नाही. तुम्ही त्या शाळांवर घरपट्टीची आकारणी करा.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो.) :-**

शाळांना ५० टक्के घरपट्टी माफ असते. आपल्याकडे एज्युकेशन परपजसाठी घरपट्टी दिलेली आहे कि नाही ते महित नाही.

**केशव घरत :-**

शाळांना ५० टक्के घरपट्टी माफ असते. आंम्हालासुद्धा घरपट्टी माफ मिळेल.

**जयंत पाटील :-**

आपल्याकडे बऱ्याच शाळा अनधिकृत आहेत.

**प्रभात पाटील :-**

तुम्ही ५० टक्केसुद्धा अनुदान घेत नाहीत अशा कितीतरी शाळा आहे. तुम्ही अशा शाळांना ५० टक्के टॅक्स लावा.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपल्या शहरात काही मंदिरे आहेत आणि त्या मंदिरांवर हॉल आहेत. ते हॉल व्यवसाय करिण्याकरता लग्न, वगैरे सारख्या कुठल्याही कार्यक्रमाकरिता भाडयाने दिले जातात. तुम्ही त्या हॉलना कर आकारणी करता का?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो.) :-**

प्रत्येकाला काही आकारणी करावी लागते. परंतु, व्यवसाय करण्यासाठी वापरणाऱ्या हॉलला कर आकारणी करणे आवश्यक आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपल्याकडे अशी काही तरतूद आहे का?

**कैलासबेन जानी :-**

आपण ही कर आकारणी पहील्यांदा पास करित आहोत का?

**प्रभात पाटील :-**

सेन्ट फ्रान्सिस सारख्या शाळा संस्थेच्या शाळा आहेत. परंतु,मी खाजगी शाळेविषयी बोलत आहे. कारण तो त्यांचा स्वतःचा बिझनेस आहे.

**केशव घरत :-**

अशा शाळा भरपूर पैसे कमावतात.

**प्रभात पाटील :-**

ती त्यांची खाजगी प्रॉपर्टी आहे.

**केशव घरत :-**

श्री. विजय पाटील, आम्ही टॅक्सचे संपूर्ण पैसे भरतो. आंम्हाला त्याचे अर्धे पैसे रिफन्ड मिळाले पाहिजेत.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो.) :-**

शिक्षण क्षेत्र हे सर्वांसाठी आहे.

**प्रभात पाटील :-**

त्या शाळांचा हॉल भाडयाने देणे वैगरे बिझनेस झाला. ती त्यांची स्वतःची प्रॉपर्टी आहे आणि त्यांचा बिझनेस आहे. तुम्ही ५० टक्के का होईना त्यांच्याकडून घ्या. माझ्या मते तुम्ही त्यांच्याकडून ५० टक्के घरपट्टी घ्यायला पाहिजे.

**केशव घरत :-**

इंग्लिश मिडीयमच्या शाळाकडून संपूर्ण घरपट्टी घ्यायला पाहिजे. आणि मराठी मिडीयमच्या शाळा विना अनुदानित असल्यामुळे प्रश्न येत नाही.

**प्रभात पाटील :-**

आपल्याला सगळया शाळांकडून अनुदान घ्यायला पाहिजे. सेन्ट फ्रान्सिस शाळा, नाझरेथ अशा अनुदानित शाळा आहेत. या शाळा अनुदान देतील.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, पाणी विभागात फाईलवर केलेली सही खरी आहे का? खोटी आहे ते प्रथम सांगा.

**एस. ए. खान :-**

अशी सही करणे चुकीचे आहे.

(सन्मा. सदस्य श्री. केशव घरत यांनी प्रकरण क्र. २९ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**ध्रुवकिशोर पाटील :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**गजानन भोईर :-**

गटार कुठे बांधायचे? रोडची मार्जिन किती आहे?

**दिपक खांबित :-**

सात फुट उंची आहे.

**गजानन भोईर :-**

गटार सात फुटावर बांधायचे आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो.) :-**

श्री. खांबित, त्या भागात झाडे लावून टाका. जर तुम्ही डिमार्केशन केले असेल तर त्या ठिकाणी झाडे लावा.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. उपायुक्तसाहेब, तुम्ही अधिका-यांना बोलावले होते ना.

**प्रकरण क्र. २९ :-**

दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत सन २००६-०७ या आर्थिक वर्षात करावयाच्या विकास कामांना प्रशासकिय व आर्थिक मंजुरी देणे.

**ठराव क्र. ३० :-**

दलित वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत सन २००६-०७ या आर्थिक वर्षात मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत करावयाच्या विकास कामांची अंदाजपत्रके तयार करण्यात आलेली आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १ | रा.म.क्र. ८ वरील प्रभाग क्र. ११ मध्ये जरीमरी तलाव ते डिसोजा वाडी ब्रिजपर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजुस गटार बांधून स्लॅब टाकणे. | रू. ४९,९९,४०१/- |
| २ | घोडबंदर येथे चिचबा देवी मंदिर ते गोवळादेवी मंदिर पर्यंत सी.सी. गटार बांधणे. | रु. ४७,२१,१७८/- |
| ३ | घोडबंदर येथे सग्नाय देवी मंदिर ते डॉवेल्स कंपनी पर्यंत सी.सी. गटार बांधणे. | रू. ४७,२१,१७८/- |

वरील अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मंजुरी देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. केशव घरत.** **अनुमोदन :- श्री. ध्रुवकिशोर म. पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगर सचिवांनी प्रकरण क्र. ३० चे वाचन केले.)

**रतन पाटील :-**

आपण जे जनरेटर मागवलेले आहेत. आपल्याकडे वेळोवेळी पॉवर जात असते. आपल्याकडे नेहमी पॉवर जाते असे नाही. आज आपल्याकडे रिलायन्स सारखी कंपनी आहे. ती त्यांच्यापद्धतीने वीजपुरवठा करते. कधी कधी मध्ये मध्ये पॉवर जाते. आपल्याला त्याच्यासाठी रु. ५० लाख महापालिकेतर्फे खर्च करणे आवश्यक नाही असे मला वाटते. आपण त्याच्यावर तोडगा काढूया. आपण त्यांच्याकडून भाडयावर जनरेटर मागवू शकतो. तसेच आपण पॉवर जाईल तेव्हा ठेका पद्धतीने जनरेटर घेउ.

**प्रेमनाथ पाटील :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील यांनी स्वतःचे मत मांडलेले आहे.

**रतन पाटील :-**

तुम्ही वर्षाला किती महिने जनरेटर वापरणार आहात? ते सांगा.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपली लाईट गेल्यानंतर आपली पॉवर येईपर्यंत आपण फोन करणार का?

**रतन पाटील :-**

आपण रू. ५० लाखाची जी तरतूद करणार आहोत किंवा आपण जे रू. ५० लाख खर्च करणार आहोत. आपण ते रु. ५० लाख खर्च करण्यापेक्षा ज्या पद्धतीने निविदा मागवितात त्या पद्धतीने निविदा मागवून घ्या. मग आपल्याला वर्षाला किती खर्च येतो?

**केशव घरत :-**

आपल्याकडे कधीही पॉवर जाणार नाही का?

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील, आपली मिटींग चालू आहे आणि लाईट गेली तर जनरेटरची आवश्यकता भासेल हा वेगळा मुद्दा आहे.

**केशव घरत :-**

तुम्ही कायमस्वरूपी जनरेटर घ्या.

**रतन पाटील :-**

तुम्ही काय शब्द बोलता?

**एस. ए. खान :-**

मुंबईसुद्धा शट डाउन होणार आहे.

**रतन पाटील :-**

तुम्ही ठेका मागितला तर तुम्हाला कमी ह्याच्यामध्ये ठेका मिळेल. आपण पॉवर जाईल तेव्हा जनरेटर वापरणार आहोत.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपली पॉवर जाणार तेव्हा आपण फोन करून बोलवूया.

**रतन पाटील :-**

आपण ठेका मागितला तर आपल्याला कमी रक्कमेमध्ये ठेका मिळेल. जेव्हा पॉवर जाईल तेव्हा आपण जनरेटर वापरणार आहोत.

**जयंत पाटील :-**

पॉवर आपल्याला सांगून जात नाही.

**रतन पाटील :-**

तुम्हाला रू. ५० लाख खड्ड्यात घालायचे आहेत का?

**मिलन पाटील :-**

आपली आतापर्यंत अशी धारणा होती की आपण मोठे मोठे जेसीबी आणि पोकलन घेतलेले होते.

**केशव घरत :-**

आपल्याला याचे भाडे कधी मिळेल?

**मिलन पाटील :-**

आपण महागातील जेसीबी आणि पोकलन घेतलेले आहेत. रू. ५० लाख ही फार मोठी किंमत होते. आपल्याकडे रोज रोज लाईट जात नाही. वसई, विरारला चार चार तास लाईट जाते.

**रतन पाटील :-**

आपल्या जनरेटरचे लाखभरात काम होईल मेन्टेनन्ससुद्धा लागणार नाही.

**गजानन भोईर :-**

पॉवर गेल्यानंतर लगेच जनरेटरची आवश्यकता आहे का?

**रतन पाटील :-**

आपल्याकडे नेहमी पॉवर जात असते.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो की सन्मा. सदस्य रतन पाटील यांनी खर्च आणि काटकसरीच्या अनुषंगाने स्वतःचे मत मांडलेले आहे. मी या ठिकाणी त्यांना अवगत करू इच्छितो की आपल्या महासभा, स्थायी समिती सभा व इतर समितीच्या सभांचे कामकाज असताना लाईट जाणे किंवा धोरणात्मक व प्रशासकिय बैठका असताना लाईट जाणे हे कामकाजावर परिणाम करण्यासारखे आहे. त्याशिवाय आपल्याकडे असलेले सी.एफ.सी. हे भविष्यात फार महत्वाचे डिपार्टमेंट होणार आहे. भविष्यात त्या ठिकाणी अल्टरनेटिव्ह जनरेटरची सोय आवश्यक आहे. आपल्याकडे फक्त ती बाब नाही. सुरूवातीला ह्याचा सेटअप करण्यासाठी

निश्चितच जास्त रक्कम आहे. परंतु, कालांतराने याचा वापर व्यवस्थित सेटल करून केला जाईल. तुम्ही म्हणता त्याप्रमाणे वसुली करणे इतपत राहिल. उदाहरणार्थ आपण आपल्या कार्यालयातील संपुर्ण पी.सी. विचारात घेतले तर पन्नास पी.सी. च्या वर आपला सेटअप राहणार आहे. त्याच्यातील डेटा ह्याची सेक्युरिटी करण्यासाठी त्याला बॅटरी इन्चार्ज आहेत. बॅटरी बॅकअप सुद्धा आहे. परंतु, याठिकाणी भविष्यात उद्‌भवणारी परिस्थिती या सर्व बाबी विचारात घेता कार्यतत्पर राहण्यासाठी आपण इथे मान्यवरांची बैठक आयोजित केलेली आहे. आमची माहिती जाणे आणि कामात व्यत्यय येणे हे आपल्या एवढ्या चांगल्या विकास कामामध्ये चांगले वाटत नाही. आपला तिथे फेल्युअर सुद्धा होईल. यासर्व बाबींचा विचार करता कार्यकारी अभियंता यांनी सी.एफ.सी. ला जास्त वेटेज देउन महासभेला सर्वात जास्त वेटेज देउन आणि स्थायी समितीला वेटेज देउन उर्वरित ठिकाणी फार लिमिटेड वापर रहावा. साधारणतः एक ट्युब आणि एक फॅन अशा पद्धतीचे त्याचे नियोजन करून त्याचा कमीत कमी वापर कसा राहिल याचा विचार करून कार्यवाही करावी.

**मिलन पाटील :-**

आपण रू. १५ लाख ते रू. २० लाखापर्यंत जे.सी.बी. घेतलेला होता.

**रतन पाटील :-**

एवढा महाग जे.सी.बी. का घेतला?

**मिलन पाटील :-**

त्या जे.सी.बी.ला एक वर्ष झाले नाही तर आपण त्या जे.सी.बी. साठी रू. ७ लाख खर्च केला तो जे.सी.बी. दोन - तीन महिन्यात टाकून दिला. आपले रू. ७ लाख पाण्यात गेलेले आहेत. आपले जे कारागीर आहेत ते जेव्हा वस्तु भाड्याने जाईल तेव्हाच बघणारे लोक आहेत. ही तुमची महाग वस्तु आहे. ही रू. ५० लाखाची वस्तु आहे. तुमची लाईट गेल्यावर ही वस्तु एक दिवसच उपयोगी पडेल. दुसऱ्या वेळेला काही चतुराईगिरी करतील आणि ती बंद पडेल. तुम्ही केस इन्श्युरन्स कराल का? ते जनरेटर बंद झाले तर त्याच्यावर रू. ५० लाख खर्च होईल. तुम्ही खर्च केल्यावर रू. ७ लाखापेक्षा कमी खर्च येणार नाही. आपण ह्याच्याऐवजी तुम्ही सी.एफ.सी. साठी जे एक ५ के.व्ही. चे वेगळे जनरेटर असते ते घ्या. ते कॉम्प्युटर वगैरे ऑटोमेटिक ऑपरेट करते. माझ्याकडे दोन जनरेटर आहेत. माझ्या घरी एक जनरेटर आहे आणि दुसरे जनरेटर शेतावर आहे. ते ऑटोमेटिक आहेत. ते जनरेटर रू. १२ हजारला मिळते. तुम्ही प्रत्येक ऑफिसला एक पंखा, एक जनरेटर आणि पाच ट्युबलाईट द्या. ते जनरेटर चांगल्या क्वालिटीचे आहे. ते जनरेटर रू. १२ हजार एक मिळते. तुम्ही ५ लाखामध्ये सुपुर्ण ऑफिसला जनरेटर देउ शकता. शिवाय ते जनरेटर आठ तास चालते. त्याला मेंटेनन्स काही लागत नाही. फक्त बॅटरी बदलायची आणि तुम्हाला ठेकेदाराला पाच वर्षाचे कॉन्ट्रॅक्ट द्यायचे आहे. जनरेटरसाठी रू. ५ लाख बरोबर आहेत. फार मोठे मेन्टेनन्स करावे लागणार नाही.

**रतन पाटील :-**

आपल्याला फार खर्च होणार नाही.

**प्रभात पाटील :-**

श्री. खतगांवकर साहेब तुमच्या मताशी मताशी सहमत आहेत.

**मिलन पाटील :-**

ते जनरेटर कोणालाही ऑपरेट करता येणार नाही. आपला वॉचमेन ऑपरेट करेल, कुठेतरी शॉर्टसर्किट होईल.

**गजानन भोईर :-**

आपल्याकडे जेव्हा पॉवर जाईल तेव्हा जनरेटर बसवायचा. तो जनरेटर ऑटोमॅटिक चालेल.

**मिलन पाटील :-**

हा जनरेटर डिझेलवर चालणार आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची लाईट गेल्यावर जनरेटर उपयोगी पडतो.

**रतन पाटील :-**

आपली लाईट मुश्किलने कधीतरी जाते. आपल्याकडे फक्त अर्धा-एक तास लाईट जाते.

**मिलन पाटील :-**

जर आपण जनरेटर घेतला तर आपल्याला तो उपयोगी पडेल.

**रतन पाटील :-**

माझ्यामते तुम्ही मोठा जनरेटर घ्या.

**मोहन पाटील :-**

तुम्ही सदस्य या नात्याने विषय आणता. सन्मा. सदस्य सुर्यकांत भोईर यांनी विषय आणल्यानंतर तुम्ही त्याला मान डोलावली किंवा तुम्ही आणलेला विषय योग्य आहे.

**केशव घरत :-**

तुम्हाला जनरेटर नको आहे का?

**मोहन पाटील :-**

मागच्या वेळेलासुध्दा जनरेटरचा विषय आलेला होता. त्यावेळेला सन्मा. सदस्य रतन पाटील यांनी त्या विषयाला विरोध केलेला होता की नाही हे तुम्ही मागची प्रोसिडिंग काढून चेक करा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

जनरेटर ही एक आवश्यक बाब आहे हे आमचेसुध्दा मत आहे.

**केशव घरत :-**

आपली लाईट दोन-तीन वेळेला गेलेली होती. त्यामुळे आपल्याला जनरेटर घेणे आवश्यक आहे.

**जयंत पाटील :-**

मागच्या वेळेला आपली लाईट गेलेली असताना जनरेटर घेण्याबाबत सांगितलेले होते. आपल्याला जेवढे जनरेटर आवश्यक वाटतात. आपण तेवढे जनरेटर घ्यायचे आहेत.

**रतन पाटील :-**

तुम्ही छोटे जनरेटर घ्या.

**मिलन पाटील :-**

मा. सभापती साहेब, आपण रु. ५० लाखाचे जनरेटर घेतले तर त्याला रु. १० हजाराचा ऑपरेटर ठेवावा लागेल. त्या ऑपरेटरला तीन शिफ्टमध्ये काम करावे लागते.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपन मेन्टेन करायचे काम कॉन्ट्रॅक्टरवर सोपवूया.

**मिलन पाटील :-**

या जनरेटरचे मेन्टेनन्स किती होईल? तो किती मोठा आहे? ते बघावे लागेल. त्याचा आवाज किती येईल? ते बघावे लागेल. शिवाय, तो इन्व्हर्टर डिझेलशिवाय बॅटरीवर चालणार नाही.

**दिपक खांबित :-**

आपल्याला त्या जनरेटरचा आवाज कमी करायचा असेल तर साऊंड कंट्रोलर मिळतो. तोच जनरेटर घेऊया.

**मिलन पाटील :-**

इन्व्हर्टर घेतला तर त्याच्यामध्ये साऊंड कंट्रोलरसुध्दा येतो.

**रतन पाटील :-**

जनरेटरचा आवाज मोठा आहे, म्हटल्यावर रक्कमसुध्दा मोठी असते अशी आपली चुकीची समजुत असते.

**मिलन पाटील :-**

या इन्व्हर्टरचा आवाज कमी असल्यामुळे त्याची किंमत जास्त आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मी मघाशी म्हटल्याप्रमाणे महासभा, स्थायी समिती सभागृह मा. आयुक्त साहेब,आणि मा. महापौर यांचे दालन अशा लिमिटेड याठिकाणी याचा वापर असावा. इतरत्र ठिकाणी फक्त एक फोन आणि ट्युबचा वापर केला जावा. या पद्धतीने वर्क-आउट करून जी रिक्वायरमेन्ट होईल त्याची कार्यवाही करावी त्याच्यामधून ईयरली मेन्टेनन्सने लगेच त्याची एजन्सी फिक्स करावी नाहीतर एवढी मोठी ॲसेट आणायची आणि परत द्यायची असे होता कामा नये.

**रतन पाटील :-**

जर कोणी इन्व्हर्टर चा पुरवठा करित असेल तर तुम्ही इन्व्हर्टर घेउन बघा.

**मिलन पाटील :-**

साहेब, आपण हे इन्व्हर्टर घेतले तर लाईट गेल्यानंतर हे इन्व्हर्टर आठ तास बॅटरीवर चालते. जर आपण हे इन्व्हर्टर घेतले तर या इन्व्हर्टर साठी पाच वर्षाचे कॉन्ट्रॅक्ट आहे. भिवंडीला हे इन्व्हर्टर रू. १२ हजारामध्ये बसवलेले आहे. माझ्याकडे सुद्धा हे इन्व्हर्टर रू. १२ हजारामध्ये बसवलेले आहे.

**गजानन भोईर :-**

तुम्ही प्रत्येक डिपार्टमेंटला जनरेटर बसवा.

**प्रभात पाटील :-**

तुम्ही प्रत्येक डिपार्टमेंटला जनरेटर बसविले तरी चालेल.

**मिलन पाटील :-**

तुम्ही प्रत्येक डिपार्टमेंट आणि केबिनला जनरेटर बसविले तरी चालेल.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपल्याला प्रत्येक डिपार्टमेंटला वेगवेगळे मीटर घ्यावे लागतील.

(सन्मा. सदस्य श्री. एस. ए. खान यांनी प्रकरण क्र. ३० च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**मोहन पाटील :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**मिलन पाटील :-**

तुम्ही ठरावात दुरूस्ती करा.

**एस. ए. खान :-**

ठरावात दुरूस्ती करतो.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपल्याला ईयरली मेंन्टेनन्स घ्यायचे आहे का?

**रतन पाटील :-**

सन्मा. सदस्य मिलन पाटील यांचे पंधराच्या खाली इन्व्हर्टर घेण्याचे म्हणणे आहे.

**मा. सभापती :-**

मी तुमच्या मताशी सहमत आहे.

**मिलन पाटील :-**

तुम्ही आम्हाला ठराव आणि भाड्याची यादी द्या.

**मा. सभापती :-**

आपण पंधरा सोळा जनरेटर लावले तर या नगरपालिकेत यायला नको.

**गजानन भोईर :-**

आपल्याला इन्व्हर्टर लावायचे आहेत. आपल्याला जनरेटर लावायचे नाहीत.

**मिलन पाटील :-**

आपल्याला इन्व्हर्टर लावायचे आहेत. आपल्याकडे असलेल्या इन्व्हर्टरला एक बॅटरी असते. हे इन्व्हर्टर प्रत्येक ऑफिसरच्या एका एका रूममध्ये राहू शकते. तुम्ही ते इन्व्हर्टर वापरा. ते इन्व्हर्टर डायरेक्ट बॅटरीवर चालेल.

**रतन पाटील :-**

आपल्याला जेव्हा इन्व्हर्टरची गरज लागेल तेव्हा आपण इन्व्हर्टरचा वापर करू शकतो. असे इन्व्हर्टर देणारेसुद्धा आहेत.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य मिलन पाटील बोलल्याप्रमाणे केले तरी चालेल.

**रतन पाटील :-**

मा. सभापतीसाहेब, इन्व्हर्टरचा प्रश्न वेगळा आहे. तुम्ही बोलता त्याप्रमाणे वसई, विरारला इन्व्हर्टर जास्त प्रमाणात वापरले जातात.

**मिलन पाटील :-**

इन्व्हर्टर आठ तास चालते.

**रतन पाटील :-**

आपण जनरेटर घेउया. एवढा मोठा इन्व्हर्टर घेण्याची काहीही आवश्यकता नाही. आपण इन्व्हर्टर ठेक्याने घेउया. इन्व्हर्टर वार्षिक पद्धतीने घेण्यासाठी किती पैसे लागतील ते काढा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सदर विषयावर विचार करून पुन्हा फ्रेश आणावा कारण ही अमाऊन्ट जास्त वाटते. कार्यकारी अभियंता यांनी या विषयावर डिपली स्टडी करावी.

**मिलन पाटील :-**

ही अमाऊन्ट जास्त वाटते.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

अमाऊन्ट सेट-अप होऊन निविदा आल्यानंतर अमाऊन्ट फिक्स राहील. ही धोरणात्मक प्रशासकीय मंजुरी आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

माझ्या मते तुम्ही अमाऊन्ट थोडीशी करुन घ्या. ही अमाऊन्ट खुप मोठी आहे.

**रतन पाटील :-**

जर वार्षिक भाड्याने कोणी देत असेल तर घ्या. उगीचच रु. ५० लाखाचा खर्च करण्याची आवश्यकता नाही. कोण स्वस्त देत असेल तर घ्या. तो ठेकेदार वार्षिक भाड्याने देत असेल तर तो इथे येऊन राहिल.

**मोहन पाटील :-**

तो ठेकेदार इथे येऊन कसा राहिल?

**रतन पाटील :-**

तो ठेकेदार इथे येऊन राहिल. तुम्ही टेन्डर काढा. तुम्ही निर्णय घ्या.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

परंतु, आपल्याला वार्षिक भाड्याने परवडणार नाही.

**मिलन पाटील :-**

जर रु. ५० लाख इन्व्हेस्ट केले तर तुम्ही त्याच्यावर एक टक्का पकडा. जर त्याला वार्षिक भाडे दिले तर आपल्याला परवडू शकते.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

प्रशासनाने ह्या विषयावर फेरविचार करावा. आम्हाला रु. ५० लाख जास्त वाटतात. माझ्या मते तुम्ही या विषयावर फेरविचार करुन फ्रेश विषय आणावा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपण प्रशासकीय मंजुरी रु. ५० लाखाला देत असाल तर मी चर्चा केल्याप्रमाणे कार्यकारी अभियंता त्यांचे वर्कआऊट करतील आणि आवश्यकतेप्रमाणे टेन्डर काढले जाईल.

**मिलन पाटील :-**

तुम्ही एकदा सॅन्क्शन केले तर हा विषय पुन्हा तुमच्याकडे येणार नाही.

**मोहन पाटील :-**

हा विषय प्रशासकीय आणि आर्थिक मंजुरीचा आहे. त्यामुळे जेव्हा टेन्डर काढणार तेव्हा तुमच्या समोर येईल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आम्ही ज्याप्रमाणे गाड्यांचा ठराव केलेला होता. आपण त्यावेळेला पाच गाड्या मागायला सांगितलेल्या होत्या. परंतु, तुम्ही पाच गाड्या मागितलेल्या नाहीत. ज्याप्रमाणे तो विषय विकसित केला त्याप्रमाणे हासुध्दा विकसित करा.

**मोहन पाटील :-**

आपण या विषयाला आर्थिक आणि प्रशासकीय मंजुरी घ्या आणि नंतर टेन्डर मागवा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपण याच्यावर कार्यवाही करुया.

**दिपक खांबित :-**

आपण २०० किंवा ३०० असे वेगवेगळ्या जनरेटर सप्लाय करणाऱ्याचे रेट मागवूया आणि जे रेट परवडतील ते घेऊया.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तुम्ही आता या विषयाला प्रशासकीय मंजुरी द्या.

**मोहन पाटील :-**

साहेब, हा विषय आर्थिक आणि प्रशासकीय मंजुरीचा आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपण हा विषय इकोनॉमिकली डिसाईड करुया.

**प्रकरण क्र. ३० :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय इमारतीमध्ये Diesel Generater Set (380 KVA) बसविणेकामी प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.

**ठराव क्र. ३१ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत मुख्य कार्यालय इमारतीमध्ये Diesel Generater Set (380 KVA) बसविणे आवश्यक आहे. मुख्य कार्यालय इमारतीमध्ये मा. स्थायी समिती सभा, मा. महासभा तसेच इतर महत्वाच्या सभा वारंवार होत असतात तसेच मुख्य कार्यालय इमारतीमध्ये अद्यावत असे नागरीसुविधा केंद्र सुद्धा आहे. काहीवेळा मे. रिलायन्स एनर्जी लि. कंपनीचा विद्युत पुरवठा खंडीत होत असतो त्यामुळे सभा चालू असताना महत्वाचा निर्णय घेताना अडथळा निर्माण होतो. तसेच वारंवार होणाऱ्या खंडीत विद्युत पुरवठ्यामुळे नागरी सुविधा केंद्रातील तसेच मुख्य कार्यलय इमारती मधील संगणकाचे भाग व वातानुकुलित यंत्राचे भाग निकामी होण्याची शक्यता टाळता येत नाही. तरी सदर कामे पर्यायी व्यवस्था म्हणून आपण Diesel Generater Set (380 KVA) बसविणे आवश्यक असुन सदर कामी तज्ञामार्फत पाहणी करण्यात आलेली असुन त्या कामी अंदाजित रू. ५०,००,०००/- इतका खर्च अपेक्षित असुन सदर खर्चास प्रशासकिय व आर्थिक मंजुरी देण्यात येत आहे. सदर कामी निविदा मागविण्यात याव्यात. तसेच प्रशासनामार्फत 380 KVA पेक्षा कमी क्षमतेच्या जनरेटरचे सुद्धा दर मागविण्यात यावेत.

**सुचक :- श्री. एस. ए. खान.** **अनुमोदन :- श्री. मोहन पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ३१ चे वाचन केले.)

(सन्मा. सदस्य श्री. एस. ए. खान यांनी प्रकरण क्र. ३१ चे ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**प्रेमनाथ पाटील :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**गजानन भोईर :-**

माझा दुसरा विषय असा आहे की, आपण कंपाऊन्ड वॉल बांधणार आहोत. ती जागा कोणाची आहे?

**एस. ए. खान :-**

ती जागा आपली आहे.

**दिपक खांबित :-**

मागच्या मिटिंगमध्ये या विषयाला आर्थिक व प्रशासकीय मंजुरी दिलेली होती आणि ही सगळी कामे त्यातील आहेत.

**गजानन भोईर :-**

आपण जे कंपाऊन्ड वॉल बांधणार आहोत. ती जागा आपल्या ताब्यात आहे का?

**दिपक खांबित :-**

कंपाऊन्ड वॉलची जागा आपल्या ताब्यात आहे.

**एस. ए. खान :-**

ती जागा आपल्या ताब्यात आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपण हा विषय आर्थिक व प्रशासकीय मंजुरीसाठी या ठिकाणी आणलेला आहे.

**गजानन भोईर :-**

आपण जे कंपाऊन्ड वॉल बांधणार आहोत. माझ्या माहितीप्रमाणे ती जागा आपल्या ताब्यात नाही म्हणून मी तुम्हाला विचारतो.

**दिपक खांबित :-**

तुम्ही कुठल्या जागेबाबत बोलता? ते सांगा.

**गजानन भोईर :-**

१ ते ४ ची जागा आहे. ती आपल्या ताब्यात आहे का?

**दिपक खांबित :-**

१ ते ४ जागा आपल्या ताब्यात आहे. आपण त्या जागेला एफ.एस.आय. देऊन ती जागा आपल्या ताब्यात घेतलेली आहे.

**प्रकरण क्र. ३१ :-**

निविदांना मंजुरी देणे. (सार्व. बांधकाम विभाग)

**ठराव क्र. ३२ :-**

| अ.क्र. | कामाचे नांव / ठेकेदाराचे नांव | अंदाजीत रक्कम |
|---|---|---|
| १. | मिरारोड येथे प्रभाग क्र. १४ मध्ये साईबाबा नगरमध्ये चर्चजवळ पाथवे व कंपाऊंड भिंत बांधणे.<br>१) मे. एम. एस. इन्टरप्रायजेस<br>२) मे. गजानन कन्स्ट्रक्शन<br>३) मे. ॲकान इंजिनिअरींग<br>४) मे. स्टार कंन्स्ट्रक्शन | रु. ११,२३,८५३/-<br><br>१५.००% जास्त दराने<br>५.००% जास्त दराने<br>२०.००% जास्त दराने<br>१६.००% जास्त दराने |
| २. | मिरारोड येथे प्रभाग क्र. १४ मध्ये शांतीनगर सेक्टर नं. २ प्रितम बिल्डींग जवळ पाथवे व कंम्पाऊंड भिंत बांधणे.<br>१) मे. एम. एस. इन्टरप्रायजेस<br>२) मे. गजानन कन्स्ट्रक्शन<br>३) मे. ॲकान इंजिनिअरींग<br>४) मे. स्टार कंन्स्ट्रक्शन | रु. १८,२१,९३३/-<br><br>१४.००% जास्त दराने<br>५.००% जास्त दराने<br>१५.००% जास्त दराने<br>१८.००% जास्त दराने |
| ३. | मिरारोड येथे शांतीनगर सेक्टर नं. ४ प्रसन्ना बिल्डींग समोर पाथवे व कंम्पाऊंड भिंत बांधणे.<br>१) मे. एम. एस. इन्टरप्रायजेस<br>२) मे. गजानन कन्स्ट्रक्शन<br>३) मे. सिद्धेश कंन्स्ट्रक्शन<br>४) मे. स्टार कंन्स्ट्रक्शन | रु. ९,७०,५७९/-<br><br>१०.००% जास्त दराने<br>१३.००% जास्त दराने<br>४.९९% जास्त दराने<br>१८.००% जास्त दराने |

| अ.क्र. | कामाचे नांव / ठेकेदाराचे नांव | अंदाजीत रक्कम |
|---|---|---|
| ४. | मिरारोड येथे प्रभाग क्र. १४ मध्ये सर्व्हे नं. २१२ सेंट जोसेफ हायस्कूल जवळ पाथवे व कंम्पाऊंड भिंत बांधणे.<br>१) मे. एम. एस. इन्टरप्रायजेस<br>२) मे. गजानन कन्स्ट्रक्शन<br>३) मे. ॲकान इंजिनिअरींग<br>४) मे. स्टार कंन्स्ट्रक्शन | रु. १२,६६,८५८/-<br><br>५.००% जास्त दराने<br>९.००% जास्त दराने<br>१०.९९% जास्त दराने<br>१९.००% जास्त दराने |
| ५. | काशिमिरा रोडवरील शिवार तलाव करीता वाढीव कंम्पाऊंड भिंत बांधणे.<br>१) मे. एम. एस. इन्टरप्रायजेस<br>२) मे. गजानन कन्स्ट्रक्शन<br>३) मे. ॲकान इंजिनिअरींग<br>४) मे. स्टार कंन्स्ट्रक्शन<br>(दर वाटाघाटीनंतर) | रु. १४,६६,३५२/-<br><br>२१.००% जास्त दराने<br>२१.५०% जास्त दराने<br>२२.००% जास्त दराने<br>२०.००% जास्त दराने<br>(५.००% जास्त दराने) |

वरीलपैकी अ.क्र. १ च्या कामी मे. गजानन कंन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकातील दरापेक्षा ५.००% जास्त दराची निविदा, अ.क्र. २ च्या कामी मे. गजानन कंन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकातील दरापेाा ५.००% जास्त दराची निविदा, अ.क्र. ३ च्या कामी मे. सिद्धेश कंन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकातील दरापेक्षा ४.९९% जास्त दराची निविदा, अ.क्र. ४ च्या कामी मे. एम. एस. एन्टर्‌रायजेस यांची अंदाजपत्रकातील दरापेक्षा ५.००% जास्त दराची निविदा, अ.क्र. ५ च्या कामी मे. स्टार कंन्स्ट्रक्शन यांची दर वाटाघाटी नंतरची ५.००% जास्त दराची निविदा ह्या वाजवी असून मुंबई प्रांतिक महानगरपलिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(क) नुसार मंजूरी देण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. एस्. ए. खान.** **अनुमोदन :- श्री. प्रेमनाथ पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ३२ चे वाचन केले.)

**प्रेमनाथ पाटील :-**

या विभागाच्या अधिकारी कोण आहे.

**रतन पाटील :-**

कुठल्या कुठल्या अधिका-यांना मोबाईल देणार.

**जयंत पाटील :-**

अधिका-यांना मोबाईल द्यायचा त्यांना शोधण्यासाठी आणि आम्हाला अधिकरी शोधण्यासाठी आमच्याकडे काय आहे. अधिका-यांना आमची गरज लागणार नाही आहे का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आम्ही सर्व तुमच्यासाठीच काम करतो.

**जयंत पाटील :-**

आम्ही लोकांसाठी काम करतो.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

लोकांचे जे काम आहे ते तुम्ही आमच्या माध्यमातुन करतात.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मग साहेब आम्हाला सुद्धा मोबाईल लागणार आहे.

**जयंत पाटील :-**

तुम्हाला आमची गरज लागणार आहे.

**प्रकरण क्र. ३२ :-**

पदाधिकारी अधिकारी व कर्मचारी यांना भ्रमणध्वनी (मोबाईल) सेवा उपलब्ध करुन देणेबाबत.

**ठराव क्र. ३३ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका अंतर्गत करण्यात येणा-या विविध विकास कामांमध्ये व नागरिकांना पुरविण्यात येणा-या विविध सेवा यांमध्ये तसेच आपतकालीन स्थितीत कामकाज प्रभावीपणे पार पाडण्याच्या

अनुषंगाने पदाधिकारी, संनियंत्रण अधिकारी व (मोबाईल) सेवा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. सदर सुविधेचा नैसर्गिक आपत्ती नियंत्रणा करीता देखील चांगल्या प्रकारे उपयोग होईल. तसेच तातडीच्या प्रसंगी अधिकारी / कर्मचारी यांना संपर्क करणे शक्य होणार आहे. याबाबत अन्य महानगरपालिकांमध्ये चौकशी केली असता अशाप्रकारची भ्रमणध्वनी (मोबाईल) सेवा त्याठिकाणी उपलब्ध करून दिल्या आहोत.

याबाबत BPL कं. चा प्रस्ताव आलेला आहे. तसेच इतर ही कंपन्यामार्फत प्रस्ताव मागवुन आर्थिक दृष्ट्या फायदेशिर असलेल्या प्रस्तावानुसार सदरचे मोबाईल व कार्ड खरेदी करण्यास व येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. एस. ए. खान.** **अनुमोदन :- श्री. मिलन गो. पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ३३ चे वाचन केले.)

(सन्मा. सदस्य श्री. मिलन पाटील यांनी प्रकरण क्र. ३३ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**एस. ए. खान :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**गजानन भोईर :-**

तुम्ही नेताजी सुभाषचंद्र बोस मैदानात लाल मातीचा थर टाकण्याबाबत तेथील गावकऱ्यांशी चर्चा केलेली होती का? कारण ते मीठ उत्पादक आहेत.

**रतन पाटील :-**

तुम्ही मैदानात मातीचा थर टाकण्याबाबत शिलोत्री मंडळींशी चर्चा केलेली आहे का?

**दिपक खांबित :-**

आपल्या ताब्यात जेवढी जागा आहे. तेवढ्या जागेवर लाल मातीचा थर टाकायचा आहे.

**मिलन पाटील :-**

आपल्या ताब्यात असलेल्या जागेमध्ये लाल मातीचा थर टाका.

**प्रकरण क्र. ३३ :-**

नेताजी सुभाषचंद्र बोस मैदानात लाल मातीचा थर टाकणे कामी प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.

**ठराव क्र. ३४ :-**

भाईंदर (प.) येथे महानगरपालिकेचे नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान असून सध्या असलेल्या मैदानाच्या दक्षिण बाजुस यापुर्वी मातीभराव केलेला आहे. त्याठिकाणी गवत लावणे बाकी आहे. वाढविलेला भाग व सध्या मैदानाचा भाग यामध्ये १० ते १२ इंचाचा फरक आहे. संपुर्ण मैदान समपातळीवर तयार करणे आवश्यक आहे. तसेच सध्या असलेल्या मैदानामध्ये खाच खळगे, उंचसखलपणा, खड्डे पडलेले आहेत. संपुर्ण मैदानाची पातळी समतोल करावा लागणार आहे. मैदानाचे क्षेत्र ३३,०००.०० चौ. मिटर एवढे असुन एकूण २१२० ब्रास लाल माती लागणार आहे. चालू बाजार भावानुसार सदर कामी रू. १७,०६,६००/- एवढा खर्च अपेक्षित असून सन २००६-०७ या वर्षाच्या अर्थसंकल्पात ''सुभाषचंद्र बोस मैदान विकसीत करणे'' या लेखाशिर्षाखली रू. ५०.०० लक्ष एवढी तरतुद उपलब्ध आहे. तरी सदर खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यास येत आहे. सदर कामी पुढील कार्यवाही वन विभागाने करावी.

**सुचक :- श्री. मिलन पाटील.** **अनुमोदन :- श्री. एस. ए. खान.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ३४ चे वाचन केले.)

**प्रेमनाथ पाटील :-**

आम्हाला अवलोकनाच्या विषयावर चर्चा करायची आहे. जर या विषयावर चर्चा झाली नाही तर आम्ही हा विषय पास करायला देणार नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

महासभेमध्ये या विषयावर विस्तृत चर्चा झालेली आहे. त्यामुळे तुम्ही हा विषय पास करुन घ्या.

**प्रेमनाथ पाटील :-**

या गोषवाऱ्यातील रेटमध्ये तफावत आहे. आम्हाला हे रेट मान्य नाहीत.

**गजानन भोईर :-**

तुम्ही महासभेचा विषय स्थायी समितीमध्ये कशाला आणता?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

महासभेत आलेला विषय आणि हा विषय वेगळा आहे.

**मोहन पाटील :-**

तुम्ही हा विषय मंजूरीसाठी तुमच्यासमोर ठेवलेला आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

आम्हाला डायऱ्या मिळालेल्या नाहीत. तुम्ही डायऱ्यांचे पेमेंट केलेले आहे का?

**मोहन पाटील :-**

डायऱ्यांचे पेमेंट केलेले आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

मग डायऱ्या कुठे गेल्या?

**मा. सभापती :-**

प्रत्येकाला एक - एक डायरी दिलेली आहे.

**मिलन पाटील :-**

या ठिकाणी हा विषय अवलोकनार्थ आलेला आहे. साहेबांनी हयाची किंमत तपासलेली आहे का?

**गजानन भोईर :-**

हे कॅलेंडर २रुपये २० पैसे लिहीलेले आहेत.

**मिलन पाटील :-**

या ठिकाणी प्लास्टीकच्या कचरापेटीचे रेट रु.२९५/-, रु.२६०/-, रु.२८०/- असे लिहिलेले आहेत. हयांनी हे रेट जनरल पकडलेले आहे की नाही तेच समजत नाही. तुम्ही हे अवलोकनाचे रेट बघा. मग तुम्हाला समजेल.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपण रु. १५/- ला खराटा घेतो. परंतु, यांनी याठिकाणी खराटयाला रु. ४०/- लावलेले आहेत.

**मिलन पाटील :-**

हा विषय अवलोकनार्थ आला म्हणून रु. ४०/-, रु. ५०/- असे रेट लावायचे का?

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, तुम्ही या गोषवाऱ्यावरील रेट बघा.

**मिलन पाटील :-**

जर हा विषय अवलोकनार्थ होता. तर तुम्ही हा विषय इकडे कशाला आणला? आम्ही रु. ४०/- च्या खराटयाला मान्यता देऊ शकत नाही. खराटा एवढा महाग मिळतो का?

**गजानन भोईर :-**

यांनी सव्वा दोन रुपयाच्या धुरांडा आणला आणि त्या धुरांडयावर लाखो रुपये कमावुन ती श्री. इरकर पुन्हा त्या डिपार्टमेंटला परत येत आहे. त्यांनी एका धुरांडयाचे अकरा धुरांडी केले. त्यांनी एका धुरांडयावर रु. ७/- कमावले.

**प्रभात पाटील :-**

परंतु, ते धुरांडे लावलेले आहेत का?

**गजानन भोईर :-**

त्यांनी ते धुरांडे लावलेले आहेत.

**मिलन पाटील :-**

तुम्ही याचे तुलनात्मक बघितले तर ते रेट हसण्यासारखे आहेत. मा. आयुक्त साहेबांनी गोषवारा देण्यापूर्वी हे रेट बघितले पाहिजेत. मा. आयुक्त साहेबांनी झाडूचे रेट रु. ४०/- बघितलेले आहेत का? कारण रु. ३०/- ते रु. ३५/- पर्यंत झाडू मिळते. मग हे रेट योग्य आहेत का?

**प्रभात पाटील :-**

तुम्ही एवढी लहान बास्केट रु. २००/- ला घ्याल का? तुम्ही बाजारात जाता ना. मग जरा विचार करा.

**मिलन पाटील :-**

याठिकाणी लाकडी पट्टीची किंमत रु.४५/-, रु.५०/-, रु.६०/- अशी लिहिलेली आहे.

**प्रभात पाटील :-**

तुम्ही तुमच्या हिशोबाने कराल तर ते चालणार नाही.

**मिलन पाटील :-**

भांडारपालवाल्यांनी रु.५०/- ला झाडू मिळते का? याचे उत्तर दयावे.

**मा. सभापती :-**

हे सर्व चार्ज लिहून देण्यापूर्वी हा विषय आणलेला आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, माझा दुसरा विषय असा आहे कि माझ्या प्रभागात डेंग्युचे रुग्ण आढळलेले आहेत. मागच्योळेला लेप्टोस्पायरोसीस आणि डेंग्युच्या रुग्णांना औषधपाण्याचा खर्च मिळालेला होता. याप्रमाणे या रुग्णांना औषधपाण्याचा खर्च दिला जाणार आहे का?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

या रुग्णांना औषधपाण्याचा खर्च दिला जाणार नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

या रुग्णांना औषधपाण्याचा खर्च का मिळणार नाही?

**मिलन पाटील :-**

परंतु, आपल्याला या विषयावर चर्चा करायला पाहिजे.

**प्रभात पाटील :-**

साहेब, गेल्यावर्षी दि. २६ जुलैला जे फॉर्म भरले होते त्याचे काय झाले?

**प्रेमनाथ पाटील :-**

शिवाय, गेल्यावर्षी दि. २६ जुलैला फॉर्म भरले होते त्याचे काय झाले?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

गेल्यावर्षी महासभेने लेप्टोस्पायरोसीस आणि डेंग्युच्या रुग्णांना खर्च देण्याचे मा. महासभेने केलेले होते. परंतु, हयावर्षी डेंग्यु आणि लेप्टोस्पायरोसीसचे रुग्ण सापडलेले नाहीत.

**प्रेमनाथ पाटील :-**

परंतु, माझ्या प्रभागात डेंग्युचे अनेक रुग्ण सापडलेले आहेत. तुम्ही त्यांचे काय करणार?

**सुधीर नाकाडी :-**

आपल्याला सफाई कामगारांना याबाबत ताकीद दयावी लागेल.

**मोहन पाटील :-**

आपल्याला मा. महापौर निधी वाढवता येईल.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

जर असे रुग्ण आढळले तर महापौरांकडे चर्चा करुन मदत केली जाईल.

**जयंत पाटील :-**

परंतु, शहरात डेंग्युचे रुग्ण आढळू नये यासाठी तुम्ही खबरदारी घेतलेली नाही असे यावरुन दिसून येते.

**प्रेमनाथ पाटील :-**

आता आपल्याला डेंग्युचा एक रुग्ण सापडलेला आहे. परंतु, याच्यापुढे डेंग्युचा एकही रुग्ण सापडू नये यासाठी उपाययोजना करणे आवश्यक आहे.

**जयंत पाटील :-**

शासन डेंग्युचे रुग्ण दाखवा हजार रुपये कमवा असे बोलते.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

आपण डेंग्युच्या रुग्णांना मदत करणार आहोत.

**जयंत पाटील :-**

तुम्ही डेंग्युच्या रुग्णांना वैयक्तिक मदत करणार आहात का?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

आम्ही डेंग्युच्या रुग्णांना वैयक्तिक मदत करु शकत नाही.

**प्रभात पाटील :-**

दि. २६ जुलै रोजी अतिवृष्टी झालेली होती. त्या अतिवृष्टीच्या काळात ज्या लोकांनी नुकसानभरपाईसाठी फॉर्म भरलेले होते. त्यांचे काय झाले? सन्मा. सदस्य मोहन पाटील तुमच्याकडे ती रक्कम आलेली आहे का? त्यावेळेला पंधरा-वीस दिवसात नुकसानभरपाईसाठी दिली जाईल असे सांगितले होते. आता दुसरी २६ जुलै तारिख आलेली आहे. परंतु, नुकसान भरपाई दिलेली नाही.

**मा. सभापती :-**

प्रकरण क्र. २८ हा जकातनाक्याच्या ठेक्याविषयीचा विषय होता. त्याचा ठराव सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील यांनी मांडलेला आहे आणि सन्मा. सदस्या फॅरो ग्रिटा यांनी त्याला अनुमोदन दिलेले आहे.

मी हया विषयाबाबत सर्वानुमते ठराव पास करतो. दुसरा विषय म्हणजे मी मघाशी अधिकाऱ्यांबाबत बोललो होतो. त्यांची ऑर्डर काढायची आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही अतिक्रमणच्या अधिकाऱ्यांचीसुद्धा ऑर्डर काढा.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

माझ्याकडे जकातीचा विषय आहे. त्यामुळे मी जकातच्या विषयावर निर्णय घेईन आणि अतिक्रमणाबाबत मा. आयुक्तसाहेबांना माहिती देईन.

**प्रकरण क्र. ३४ :-**

मा. आयुक्त सो. यांनी शिफारस केलेल्या निविदेचे अवलोकन करणे. (भांडार विभाग)

**ठराव क्र. ३५ :-**

**विषय क्र. १ :- सन २००६ दैनंदिन व कॅलेंडर छपाई करणे.**

महानगरपालिकेने दि.२८-०१-२००६ रोजि दै. महाराष्ट्र जनमुद्रा प्रकाशन व दै. सुरज प्रकाश या वृत्तपत्रात प्रसिध्द केलेल्या जाहिर निविदा सुचनेनुसार खालील संवर्धात ठेकेदार आपल्या निविदेत मुदतीत सादर केलेल्या आहेत.

| अ.क्र. | तपशिल | श्री. आर्ट | आउली आर्ट | गुरूकृपा आर्ट प्रिंटर्स |
|---|---|---|---|---|
| १ | एक्झीक्युटीव डायरी | रू.३२५/- प्र. नग | रू.३२० /-प्र.नग | **रू.२९८/- प्र. नग** |
| २ | साधी डायरी | रू.२६०/- प्र. नग | रू.२५०/-प्र.नग | **रू.२२५/- प्र. नग** |
| ३ | कॅलेंडर छपाई | रू.२४०/- प्र. नग | रू.२३५/-प्र.नग | **रू.२२०/- प्र. नग** |

मा. आयुक्त सो., यांच्या मान्यतेने व त्यांच्या अधिकारात वरील कामाच्या निविदा मागविल्या असता प्राप्त दराच्या तुलनात्मक तक्ता पाहता मे. गुरूकृपा आर्ट प्रिंटर्स यांनी सादर केलेल्या निविदेतील दर सर्वात कमी आहेत. सर्वात कमी दराच्या निविदेतील दराची तुलना बाजार भावाशी केले असता सदरचे दर वाजवी आहेत. तरी सर्वात कमी दराची निविदा मा. आयुक्त सो., यांच्या मान्यतेने स्विकारण्यात आलेली आहे. तरी सदरचा प्रस्ताव मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ मधील कलम ७३ (ड) अन्वये या सभेपुढे अवलोकनार्थ सादर करण्यात आले .

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ३५ चे वाचन केले.)

**प्रकरण क्र. ३५ :-**

मा. आयुक्त सो. यांनी शिफारस केलेल्या निविदेचे अवलोकन करणे. (भांडार विभाग)

**ठराव क्र. ३६ :-**

**विषय क्र. २ :- महानगरपालिका बालवाडी विद्यार्थी वर्गासाठी शैक्षणिक साहित्य पुरवठा करणे.**

महानगरपालिकेने दि.११-०१-२००६ रोजी दै.वृत्तमानस या वृत्तपत्रात प्रसिध्द केलेल्या जाहिर निविदा सुचनेनुसार महानगरपालिका बालवाडी विद्यार्थी वर्गास शैक्षणिक साहित्य व इतर साहित्य पुरवठा करणे कामी खालील ठेकेदारानी आपल्या निविदा मुदतीत सादर केलेल्या आहेत.

| क्र. | तपशील | निलेश क्रियेशन | मे. ध्रुव कॉम्प्युटर्स | मे. हिना एन्टरप्रायजेस |
|---|---|---|---|---|
| १ | डस्टर | रू. २६/- प्र.नग | रू. २२/- प्र.नग | रू. २८/- प्र. नग |
| २ | टेबल सा. २ ४ | रू.४३५०/ प्र.नग | रू. ३७५०/- प्र.नग | रू. ३८७५/- प्र. नग |
| ३ | खुर्ची प्लास्टिक | रू. ३९५/- प्र.नग | रू. ३५०/- प्र.नग | रू. ३९०/- प्र. नग |
| ४ | कपाट | रू. ८५७५/- प्र. नग | रू. ५०००/- प्र. नग | रू. ७८५०/- प्र. नग |
| ५ | कचरा पेटी | रू. २९५/- प्र. नग | रू. २६०/- प्र. नग | रू. २८०/- प्र. नग |
| ६ | सर्व नेत्यांचे फोटो | रू. २४०/- प्र. नग | रू. २३०/- प्र. नग | रू. २४५/- प्र. नग |
| ७ | कुलुप व चावी | रू. १९५/- प्र. नग | रू. १५५/- प्र. नग | रू. १६५/- प्र. नग |
| ८ | लाकडी पट्टी ३ फुटाची | रू. ६०/- प्र. नग | रू. ४५/- प्र. नग | रू. ५०/- प्र. नग |
| ९ | खराटा | रू. ५०/- प्र. नग | रू. ४०/- प्र. नग | रू. ५५/- प्र. नग |
| १० | झाडु | रू. ५५/- प्र. नग | रू. ३५/- प्र. नग | रू. ४०/- प्र. नग |
| ११ | ब्लॅक बोर्ड कलर १/२ लि. | रू. ११०/- प्र. नग | रू. ९०/- प्र. नग | रू. ९५/- प्र. नग |

| क्र. | तपशील | निलेश क्रियेशन | मे. ध्रुव कॉम्प्युटर्स | मे. हिना एन्टरप्रायजेस |
|---|---|---|---|---|
| १२ | खडु बॉक्स | रू. ३०/- प्र. नग | रू. २०/- प्र. नग | रू. ३५/- प्र. नग |

मा. आयुक्त सो., यांच्या मान्यतेने व त्यांच्या अधिकारात वरील कामाच्या निविदा मागविल्या असता प्राप्त दराचा तुलनात्मक तक्ता पाहता मे. ध्रुव कॉम्प्युटर्स यांनी सादर केलेल्या निविदेतील दर सर्वात कमी आहेत. सर्वात कमी दराच्या निविदेतील दराची तुलना बाजार भावाशी केले असता सदरचे दर वाजवी आहेत. तरी सर्वात कमी दराची निविदा मा. आयुक्त सो., यांच्या मान्यतेने स्विकारण्यात आलेली आहे. तरी सदरचा प्रस्ताव मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ मधील कलम ७३ (ड) अन्वये या सभेपुढे अवलोकनार्थ सादर करण्यात आले .

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ३६ चे वाचन केले.)

**प्रकरण क्र. ३६ :-**

मा. आयुक्त सो. यांनी शिफारस केलेल्या निविदेचे अवलोकन करणे. (भांडार विभाग)

**ठराव क्र. ३७ :-**

**विषय क्र. ३ :- महानगरपालिका शिक्षण मंडळ प्राथमिक वार्षिक परिक्षेच्या प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका छपाई करणे.**

महानगरपालिका शिक्षण मंडळाच्या प्राथमिक शालेय विद्यार्थी वर्गाच्या वार्षिक परिक्षेच्या प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका व इतर छपाई कामी खालील ठेकेदारांनी आपल्या निविदा मुदतीत सादर केलेल्या आहेत.

| अ.क्र. | तपशिल | मे. अस्मिता आर्ट प्रिंटर्स | अनुप्रेम मुद्रणालय | मे. प्रेयस कॉर्पोरेशन |
|---|---|---|---|---|
| १ | १ली ते ७वी प्रश्नपत्रिका (पाठोपाठ) प्रती पेज | रू. १.५०/- प्रती पेज | रू. १.५७/- प्रती पेज | रू. १.६०/- प्रती पेज |
| २ | उत्तरपत्रिका १२ पानी (पाठोपाठ) | रू. १६१/- प्रती शेकडा | रू. १७२/- प्रती शेकडा | रू. १७०/- प्रती शेकडा |
| ३ | पुरवण्या उत्तरपत्रिका (४ पानी ) | रू. ५३/- प्रती शेकडा | रू. ६०/- प्रती शेकडा | रू. ५७/- प्रती शेकडा |

मा. आयुक्त सो., यांच्या मान्यतेने व त्यांच्या अधिकारात वरील कामाच्या निविदा मागविल्या असता प्राप्त दराचा तुलनात्मक तक्ता पाहता मे. अस्मिता आर्ट प्रिंटर्स यांनी सादर केलेल्या निविदेतील दर सर्वात कमी आहेत. सर्वात कमी दराच्या निविदेतील दराची तुलना बाजार भावाशी केले असता सदरचे दर वाजवी आहेत. तरी सर्वात कमी दराची निविदा मा. आयुक्त सो., यांच्या मान्यतेने स्विकारण्यात आलेली आहे. तरी सदरचा प्रस्ताव मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ मधील कलम ७३ (ड) अन्वये या सभेपुढे अवलोकनार्थ सादर करण्यात आले .

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रेमनाथ पाटील :-**

आपले सन्मा. सदस्य श्री. सुर्यकांत भोईर यांचे पिताश्री अनंतराव भोईर यांचे पिताश्री अनंतराव भोईर यांचे वयाच्या ७५ व्या वर्षी अल्पशः आजाराने निधन झाल्याबद्दल शोक प्रस्ताव मांडत आहे.

**रतन पाटील :-**

आपले कर्मचारी श्री. व्ही. जी. राणे यांचा मुलगा याचे निधन झाले तसेच श्री. प्रविण जगन्नाथ म्हात्रे यांच्या मातोश्री यांचे देखिल दिर्घ आजाराने निधन झाले याबाबत दुःखवटा ठराव मांडत आहे.

**दुःखवटा ठराव क्र. ३८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सन्मा. सदस्य श्री. सुर्यकांत भोईर यांचे पिताश्री अनंतराव भोईर यांचे पिताश्री अनंतराव भोईर यांचे वयाच्या ७५ व्या वर्षी अल्पशः आजाराने निधन झाले. मिरा भाईंदर महानगरपालिकेचे कर्मचारी श्री. व्ही. जी. राणे यांच्या मुलाचे निधन झाले. तसेच श्री. प्रविण जगन्नाथ म्हात्रे यांच्या मातोश्री यांचे देखिल दिर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या कुटूंबियांवर ओढवलेल्या दुःखात ही सभा

सहभागी असून मृतात्म्यास चिरशांती लाभो अशी ईश्वरचरणी प्रार्थना करुन त्यांना श्रद्धांजली वाहण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. प्रेमनाथ पाटील.** **अनुमोदन :- श्री. रतन पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

या सभेला उपस्थित असलेले सर्व सन्मा. सदस्य, सन्मा. सदस्या, मनपा अधिकारी वर्ग आणि कर्मचारी वर्ग यांचे हार्दिक आभार मानुन आजची सभा संपल्याचे मी जाहीर करतो.

**सभा संपल्याची वेळ :- सायं. ०६.१५ वा.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**